# अध्याय १० वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

समाजहिताची वासना । ठेवून कुटुंबपालना ॥
करा स्मरून दत्तराणा । भुक्तिमुक्तिदायक जो ॥१॥

दृढ भावें भजतां दत्ता । कार्यसिद्धि येतसे हाता ॥
येई जरी फार कष्टता । तरी ही सेवा न टाकणें ॥२॥

बरा वाईट प्रसंग येतां । भाव न करावा परता ॥
मग दत्त येई आर्ता । कृपा करी पूर्णपणें ॥३॥

इह सौख्य भलें देऊन । आत्मसुखा जोडील पूर्ण ॥
सदा दावी प्रेमळपण । दयाळु दत्त संरक्षी ॥४॥

पूर्वापार आज पर्यंत । हा अनुभव नित्य येत ॥
म्हणून दत्त भगवंत । शुद्ध प्रेमेंच चिंतावा ॥५॥

जरी शुद्ध अंत:करण । परी घडे पापाचरण ॥
तरी होईल निरसन । दत्तस्मरणें सुखानें ॥६॥

आपण नित्य आचरण । करावें विचार करून ॥
विधि निषेध पाळून । धर्माधर्म ठरवावे ॥७॥

कोणी केवढा असो भला । न सोडावें या विचाराला ॥
कल्याणाचा मार्ग चांगला । दत्तचिंतनें धरावा ॥८॥

दत्तसेवेनें शुद्धमति । होऊन घडते उन्नति ॥
बरी वाईट जगीं स्थिती । तरीही दत्त प्रसन्न ॥९॥

वागावें वैराग्य धरून । तें अशक्य वाटेल म्हणून ॥
सर्व कांहीं दत्त भगवान । त्याचेंच कार्य मानावें ॥१०॥

म्हणजें तें करीत असता । दत्त स्मरण होईल चित्ता ॥
दत्तकार्यीं मन वावरतां । दत्तीं मन स्थिर राही ॥११॥

जागेपणीं स्वप्नीं निद्रेंत । मग राहील सदा दत्त ॥
सहज तरावें संसारांत । कर्मबंधन नुरेल ॥१२॥



वाटेल तितकी उन्नति । होऊन आली उच्च स्थिती ॥
तरी विनयें लीन वृत्ति । धरून सदा वागावें ॥१३॥

ना तरी होई अवनती । प्राप्त होईल दु:खस्थिती
ती भोगून मागील भक्ती । पुढें क्षेम करीतसे ॥१४॥

नहुष आला स्वराज्यांत । इंदुमतिआयु तोषत ॥
पुण्यकर्मे यज्ञादि होत । आयु कृतकृत्य बने ॥१५॥

आयुइंदुमति उद्धरून । गेलीं म्हणून नहुष धन्य ॥
पृथ्वीवरी अैश्वर्य भोगून । नहुष सुखी जाहला ॥१६॥

अशोक सुंदरी सहित । नहुष पुण्यकर्मे करीत ॥
त्रिभुवनीं किर्ती फांकत । देव मुनीही संतोषती ॥१७॥

पुण्यप्रतापी होती सुत । संसारीं उणे कांहीं नसत ॥
नहुष असून भाग्यवंत । विनवी धर्मात्मा सर्वदा ॥१८॥

मुनि जन गाती चरित्र । ऐकून होती जन पवित्र ॥
समत्वबुद्धि सर्वत्र । दत्तासह नमन असो ॥१९॥

नहूषाचें दैव प्रबळ । वृत्र हत्येनें इंद्र विव्हळ ॥
दुष्कीर्ति ऐके सदाकाळ । मानसीं गुप्त राहिला ॥२०॥

रितें देवेंद्रसिंहासन । अधर्म वाढती म्हणून ॥
देव मुनी मग जमून । नहुषा इंद्रपद दिलें ॥२१॥

इंद्राचा शोध चालविला । परी पत्ता न लागला ॥
मग नहुष म्हणूं लागला । इंद्राणि ही मम भार्या ॥२२॥

देवता आणि मुनिजन । सांगती धर्माचें बंधन ॥
परकांता विषासमान । अधोगतीस नेतसे ॥२३॥

परी नहुष कामातुर । इंद्राणि म्हणे तूं इंद्र थोर ॥
नवीन वाहन मुनिवर । करून याचें मजकडे ॥२४॥

नहुष अंध कामानळें । मनमोहून त्याचें गेलें ॥
मुनिजनांना भोई केलें । पालखी त्वरें न्या म्हणे ॥२५॥



चाबूक मारी लत्ता प्रहार । करून म्हणे सरसर ॥
चालून वहावें सत्वर । अैकतां अगस्ति कोपले ॥२६॥

त्यांनीं दिला शाप दुस्तर । होशील नहुषा अजगर ॥
ऐकून आला शुद्धीवर । चरण धरी ऋषीचे ॥२७॥

झालों कामानें मतिमंद । उ:शाप देऊन प्रसाद ॥
करून उद्धरा हा इंद्र । टाकूं नको वाणी वदे ॥२८॥

मग अगस्ति वदे वाणी । तुझ्या वंशांत मोक्षदानी ॥
अवतरेल चक्रपाणी । त्याचे भक्त धर्मराज ॥२९॥

तव वंशज युधिष्ठिर । धर्माचरणीं निरंतर ॥
दुर्वाससेवाफल थोर । पांडवरूपें प्रकटेल ॥३०॥

त्यांशीं घडतां संभाषण । शापाचें होईल निरसन ॥
तुला मिळेल स्वर्गस्थान । नको भिऊं जा आतां ॥३१॥

नहुष सर्प योनींत । गेला तरी ज्ञानी असत ॥
उ:शापासम उद्धरत । स्वर्गीं मग सुखी असे ॥३२॥

देवराज्या चालविण्यास । गेला असतां राजा नहुष ॥
त्याच्या पुत्रा ययातीस । नहुषराज्य मिळालें ॥३३॥

धर्माप्रमाणें आचरण । करून सुखवी प्रजाजन ॥
देवयानीसह रमून । राज्यैश्वर्य भोगीतसे ॥३४॥

विष्णु देवांचा पक्षपाती । देव स्वर्गीं सुखी असती ॥
त्यांची घेऊन सदा धास्ती । चाले उद्योग दैत्यांचा ॥३५॥

भृगुपुत्र शुक्रभार्गव । गुरु करिती दैत्य दानव ॥
औषधि व मंत्र प्रभाव । दावून शुक्र सांवरी त्यां ॥३६॥

देवदैत्यांची पाहतां कथा । राजकारण त्यांत सर्वथा ॥
डावास प्रति डाव प्रथा । दक्षतेनें दिसतसे ॥३७॥

दानव होतां हत्‌बल । प्रह्लाद करी देवांशीं खल ॥
असुर दानव दैत्य खल । प्रह्लादाला पुढें करिती ॥३८॥

प्रह्लाद म्हणे नको रण । वागुया आम्ही स्नेह धरून ॥
देवमंडळी आनंदून । प्रह्लादाला गौरविती ॥३९॥

युद्धविचार सोडून । दैत्य करिती तपाचरण ॥
शुक्र गुरु मंत्रसाधन । करी राहून गुप्तपणें ॥४०॥

देवांना लागला तपास । निराश झाले दैत्य राक्षस
परी शुद्ध नसे मानस । गुप्त सिद्धता चालू असे ॥४१॥

शिव इच्छी देवकल्याण । परी तीव्र तप करून ॥
शुक्र मिळवी त्याचेकडून । मंत्रसामर्थ्य विशेष ॥४२॥

तप करी भृगुनंदन । तेथील वृत्त यावें कळून ॥
म्हणून कन्या शुक्रार्पण । इंद्रकरी देवहिता ॥४३॥

जयंती सेवाभाव धरून । तप साहित्य सिद्ध ठेवून ॥
विषयविचार सोडून । सात्त्विक सेवा नित्य करी ॥४४॥

त्यामुळें शुक्राचें तप । योग्य होतसे आपोआप ॥
जयन्तीचा मनांत जप । शुक्र नवरा असावा ॥४५॥

तपश्चर्या जाहली पूर्ण । शिवें दिलें इष्ट वरदान ॥
भार्गव सुप्रसन्न होऊन । जयन्तीला पुसतसे ॥४६॥

ती म्हणे माझी वासना । कळेल ज्ञानेंहि आपणां ॥
आपली धरून भावना । सदा सेवा करीतसें ॥४७॥

तरी पुरवावी कामना । मला करा तव अंगना ॥
या दासीची हीच प्रार्थना । याचना प्रेमें फळूं दे ॥४८॥

शुक्र देई अनुमोदन । गुप्तपणें क्रीडेंत मग्न ॥
बृहस्पति हें जाणून । स्वत: शुक्राचार्य बने ॥४९॥

दैत्यदानव आनंदती । गुरु त्यांना उपदेशिती ॥
जरी आततायी कोणी येती । तरीही हिंसा न करावी ॥५०॥

अहिंसा असे परमधर्म । टाकावें वेदविहित कर्म ॥
शुक्रस्वरूपी गुरू मर्म । दैत्यशिष्यां न सांगती ॥५१॥



खरे गुरुजी शुक्राचार्य । पहाती देव गुरूचें कार्य ॥
शुक्रजींचें प्रेमऔदार्य । दैत्य दानवां पटेना ॥५२॥

ते शुक्रा कपटी म्हणती । म्हणून भार्गव क्रोधावती ॥
शाप दिला दानवांप्रती । अध:पतन पावाल ॥५३॥

हें पाहून बृहस्पती । स्वर्गी गेले तोषून चित्तीं ॥
देवगण दैत्यां जिंकिती । दैत्यदानव पस्तावले ॥५४॥

खऱ्या गुरूस शरण जाती । पुन्हां पुन्हां चुकलों म्हणती ॥
दैत्यांची निरसली भ्रांती । मग द्रवले शुक्रगुरु ॥५५॥

दैत्यांना अभय देऊन । शुक्र वागती पूर्वीसमान ॥
दैत्यराक्षस आनंदून । स्वराज्यांत सुखी असती ॥५६॥

जयंतीला गुप्त ठेवून । येती शुक्र नांदवून ॥
देवांचा द्वेष कमी होऊन । जयंतीकार्य साधलें ॥५७॥

परी देवदैत्य भांडती । देवगुरु बृहस्पती ॥
शुक्रगुरु दानवां प्रती । जाणे शुक्रसंजीवनी ॥५८॥

असुर मरण पावती । शुक्राचार्य मंत्र जपती ॥
मृत दैत्य जिवंत होती । देव कष्टती अहर्निश ॥५९॥

देवगुरु योजून युक्ती । निज पुत्रा कचा विद्यार्थी ॥
करून धाडी शुक्राप्रती । संजीवनी शिकण्याला ॥६०॥

तो अंगीं नम्रता धरून । संतोषवी शुक्राचें मन ॥
नाना विद्या घेई शिकून । दैत्य मनीं चिंतावले ॥६१॥

कच सुंदर सुलक्षण । त्यास मारिती दैत्यगण ॥
मनीं त्याची इच्छा धरून । देवयानी पित्या विनवी ॥६२॥

मग शुक्र मंत्र जपून । करी कचाचें संजीवन ॥
परत कांहीं गेले दिन । दैत्य मारिती कचाला ॥६३॥

छिन्न भिन्न कचा करून । अस्ताव्यस्त वनीं टाकून ॥
आनंदले दानवगण । देवयानी करी चिंता ॥६४॥



शुक्राची कन्येवरी प्रीती । पुन्हां शुक्र मंत्र जपती ॥
कच सावध गृहाप्रती पूर्वीसम येत असे ॥६५॥

दैत्य मग युक्ति योजिती । कचा मारून टाकिती ॥
मदिरेंत त्याला मिसळती । पाजिती कपटें गुरूस ॥६६॥

कच अदृश्य जाहला । कसा अजून नाहीं आला ॥
कन्येस कचाचा कळवळा । शुक्रगुरु चिंता करी ॥६७॥

आणि सांगे देवयानीस । कचा मिसळून मद्यरस ॥
दैत्य पाजिती आपणांस । माझ्या अंगी तो दिसे ॥६८॥

मद्यास माझा शाप दारुण । त्याचें अंगी फार दुर्गुण ॥
मदिरा पिणारा ब्राह्मण । पतित होईल निश्चयें ॥६९॥

कचासाठीं मंत्र जपून । मला कन्यें येईल मरण ॥
त्याची आशा दे सोडून । कच आतां न मिळेल ॥७०॥

देवयानी म्हणे पित्यास । कचाची मला होती आस ॥
जिवंत करीन मी तुम्हांस । मला मंत्र शिकवावा ॥७१॥

शुक्र म्हणे देवयानीस । मंत्र सांगूं नये स्त्रियांस ॥
मजवाचून तो कोणास । मंत्र मुळीं येत नाहीं ॥७२॥

देवयानी बसे रुसून । शुक्राचार्य कळवळून ॥
कन्येस देती मंत्र गहन । मुलगी त्यांची आवडती ॥७३॥

मग मंत्र पुन्हां जपून । कचाचें झालें संजीवन ॥
बाहेर आला पोट फाडून । शुक्राचार्य निमाले ॥७४॥

देवयानी कचा पाहून । आनंदली मनापासून ॥
पित्यासाठीं मंत्र जपून । शुक्राचार्या जिवंत केले ॥७५॥

तीनवेळां मंत्र ऐकून । कचें केलें मंत्रसाधन ॥
मंत्र लाधला संजीवन । देवकार्यास आनंदे ॥७६॥

म्हणे गुरूस हात जोडून । तीन वेळां आलें मरण ॥
दैत्य नाशावर म्हणून । आज्ञा द्यावी घरीं जातों ॥७७॥

आपुल्या कृपें विद्याग्रहण । आतां द्यावें आशीर्वचन ॥
शुक्र म्हणती आनंदून । आशीर्वाद तुला असे ॥७८॥

निघाला काय नमस्कारुन । देवयानी वदे वचन ॥
कोठें जासी मज टाकून । माझें चित्त तुझ्यावर ॥७९॥

दैत्यदानव चिंताक्रांत । तीन वेळां करिती अंत ॥
परी पिता करी जिवंत । माझ्यासाठीं ऋषिबाळ ॥८०॥

कच ह्मणे तुझें कल्याण । मी सदोदित इच्छीन ॥
परंतु तुझें माझें लग्न । गुरुकन्ये न घडेल ॥८१॥

माझे जनक बृहस्पती । देवांचे गुरु ते असती ॥
देवांसाठीं मला धाडती । हें हि तुला ज्ञात असे ॥८२॥

स्वर्गलोकीं माझें गमन । तुझें न तेथें आगमन ॥
काय करावें करून लग्न । जणूं जननी तूं माझी ॥८३॥

ऐकून भावना भडकली । कचा शापवाणी वदली ॥
देवयानी कोपा चढली । निष्फळ विद्या होईल ॥८४॥

कच ह्मणे हें काय केलें । षट्कर्णी मंत्राचें तेज गेले ॥
ऐश्वर्य मिळेल चांगलें । परी वर अब्राह्मण ॥८५॥

कच स्वर्गलोकीं पोहोचला । देवांना आनंद जाहला ॥
शापाचाही उतारा केला । शुक्रआशीर्वाद फळें ॥८६॥

सावर्णि मन्वंतरांत । दैत्यांचा प्रवेश स्वर्गांत ॥
बळीराजाही इंद्र होत । तोंवरी देव सुखावती ॥८७॥

त्वष्टापुत्र तपी त्रिशिर । होईल, तीव्र तपे देवेंद्र ॥
म्हणून इंद्र पुरंदर । शत्रू मानून त्या मारी ॥८८॥

क्रोधानें मग यज्ञ करुन । त्वष्टा करी पुत्र निर्माण ॥
इंद्रशत्रु वृत्र ह्मणून । वृत्र जिंकी इंद्राला ॥८९॥

मग कपटानें देवराव । वृत्रा दाखवी मित्रभाव ॥
संधि साधून घेई जीव । समुद्रफेनें वृत्राचा ॥९०॥



जरी वृत्र होता न्यायी । तरी भगवंत शेषशायी ॥
फेनीं शिरून करी विजयी । स्वभक्त इंद्रा पुरंदरा ॥९१॥

वृत्रासुराचा जगा त्रास । इंद्रदावी त्यास विश्वास ॥
परंतु न पाळी वचनास । म्हणून दुष्कीर्ति जाहली ॥९२॥

मानस सरोवरीं दिली दडी । ब्रह्महत्या इंद्रास पीडी ॥
इंद्राणी, देवीस हात जोडी । देवी दाखवी इंद्र तिला ॥९३॥

देवमुनी बृहस्पती । अश्वमेध यज्ञ करविती ॥
विष्णु प्रसन्न यज्ञाधिपती । निष्पाप करी इंद्राला ॥९४॥

नहुष मातला अनिवार । शाप मिळून झाला दूर ॥
स्वर्ग लोकांत पुरंदर । इंद्र नांदे पूर्वीसम ॥९५॥

इंद्राणीची भीती गेली । आनंदली देव मंडळी ॥
इंद्र-इंद्राणी भेटी झाली । देवनर संतोषले ॥९६॥

जगांतील नाना घटना । कथारूपानें शिकवा मना ॥
दत्तपदीं ठेवून वासना । चित्त निष्काम करावें ॥९७॥

ज्यावर दत्त कृपा करील । त्याचें ज्ञान नित्य निर्मळ ॥
जन्मांतरीं व वंशीं विमल । दत्तकृपा अढळ दिसे ॥९८॥

देवयानी आणि ययाती । त्यापासून यदुउत्पत्ति ॥
श्री दत्ताची सभ्दक्तमूर्ति । दत्तदेवा नमन असो ॥९९॥

सर्व समर्थ एक दत्त । भक्तांचे करावयास हित ॥
दशमाध्याय स्वीकारीत । केला अर्पण दत्तपदीं ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय ११ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

जगाचें पुढें पुढें गमन । चालत असे प्रतिक्षण ॥
म्हणून सिंहावलोकन । करून मेळ साधावा ॥१॥

केवळ प्रवाहपतित । बनावें हा धर्म नसत ॥
सागरीं नावाडी पाहात । दीपस्तंभ ध्रुवतारा ॥२॥

नाव चालवी दिशा आंखून । तसें वागावें जगामधून ॥
आठवावे दत्तचरण । ठेवून त्यावर दृढभाव ॥३॥

मग दत्ता येईल करुणा । शांति देई अंत:करणा ॥
वेळोवेळीं करी प्रेरणा । सांभाळी मोक्षापर्यंत ॥४॥

कधींही दत्त न सोडील । दत्तपदीं भाव अढळ ॥
इहपर त्याचें क्षेम करील । ब्रह्मनिर्वाण अखेर ॥५॥

भार्गवकन्या देवयानी । शुक्रभार्गव ब्रह्मज्ञानी ॥
दत्तकृपा आयुसदनीं । ब्रह्मविद्या गुप्त असे ॥६॥

उभयतांमधून स्त्रवत । अध्यात्मविद्या विकासत ॥
पुढें श्रीकृष्ण भगवंत । श्रीजगद्गुरु जाहले ॥७॥

वृषपर्वा दानव भूप । कन्या शर्मिष्ठा सुस्वरुप ॥
संगें दासी घेऊन खूप । उपवनीं क्रीडा करीतसे ॥८॥

गुरुदुहिता देवयानी । तिला ही नेती बोलावोनी ॥
दोघी खेळती आनंदोनी । सरोवरांत उतरती ॥९॥

वस्त्रें ठेवून कांठावरी । पाण्यांत डुंबती सुंदरी ॥
भवानीशंकराची स्वारी । त्या वाटेनें जात असे ॥१०॥

दोघीही जाहल्या लज्जित । लगबगीनें बाहेर येत ॥
शर्मिष्ठा वस्त्र उचलत । देवयानीचें त्यावेळीं ॥११॥

देवयानी कोपा चढत । टाकून शर्मिष्ठे बोलत ॥
तीही रागावली बहुत । देवयानीची निंदा करी ॥१२॥

आधींच शर्मिष्ठा राजकन्या । त्यांत देवयानीचा शब्द उणा ॥
गर्विष्ठा चढून अभिमाना । देवयानीस जळीं ढकली ॥१३॥

दासींसह महालीं गेली । राखी बातमी गुप्तसगळी ॥
परी दैवाची लीला आगळी । ययाती मृगयेस फिरे ॥१४॥

वनीं तहानेनें व्याकूळ । होऊन शोधी निर्मळ जळ ॥
दैव खेळे अतर्क्य खेळ । त्याच कासारीं पातलासे ॥१५॥

देवयानीस नग्न पाहून । आपला शेला दे टाकून ॥
बाहेर काढी हात देऊन । विधीनें लग्न लाविलें ॥१६॥

चुकत नसे विधिलिखित । देवयानी सुस्मित लज्जित ॥
म्हणे पाणि ग्रहण होत । ययाति म्हणे हें काय ॥१७॥

सकळ वृत्त देवयानी । आणि कचाची शापवाणी ॥
सांगतां ययातीच्या मनीं । दैवलीला स्थिरावली ॥१८॥

शुक्राचार्यास इत्थंभूत । देवयानी वृत्त कथीत ॥
ते म्हणती मी पुरोहित । दैत्य चढले भाग्याला ॥१९॥

त्या राजाची कन्या दांडगी । गर्व ताठा अमित अंगीं ॥
आपण यावेळीं राहून उगी । पुरोहित वृत्ति सोडावी ॥२०॥

असा करून विचार । निघतसे राज्याबाहेर ॥
मग गडबडे नृपवर । मार्गांत घाली दंडवत ॥२१॥

वृषपर्वा विनंति करी । आमचें राज्य लोकांवरी ॥
आपुलें छत्र आम्हांवरी । कृपा करावी टाकूं नये ॥२२॥

शुक्र म्हणे रागावून । तुझ्या मुलीला खूप अभिमान ॥
देवयानीस जळीं लोटून । आमचीही निंदा करी ॥२३॥

राजा म्हणजे क:पदार्थ । तुला सांगतों मी यथार्थ ॥
तप जाणार नाहीं व्यर्थ । विश्वात्मा सुखी राखील ॥२४॥

दानवेंद्र क्षमा मागत । काय करावें सांगा म्हणत ॥
देवयानीस विचारत । आणि शुक्राचार्य म्हणे ॥२५॥



देवयानीची दासी होऊन । तिनें घालवावें जीवन ॥
हें अैकून निष्ठुर वचन । वृषपर्वा चिंतीं पडे ॥२६॥

पित्याचें व्हावें सुकल्याण । असें मनांत ठरवून ॥
शर्मिष्ठा देई आश्वासन । शुक्र गुरु आनंदले ॥२७॥

शुक्राचा कोप झाला शांत । पूर्वींप्रमाणें पुरोहित ॥
म्हणून वृषपर्वा तोषत । शर्मिष्ठा दासी जाहली ॥२८॥

देवयानीचें लग्न झालें । ययातिमन संतोषलें ॥
शर्मिष्ठेनें वचन पाळलें । देवयानी सौख्य भोगी ॥२९॥

देवयानी लावण्यवती । दृढ करी पतीची भक्ति ॥
यदु तुर्वसु पुत्र होती । राजादिक आनंदले ॥३०॥

कामवासना बळवंत । पुत्रइच्छा उचंबळत ॥
ययातीस दासी प्रार्थित । देवयानीस दोन्ही भिती ॥३१॥

परंतु शर्मिष्ठाययाती । कामेच्छा गुप्त पुरविती ॥
दासी झाली पुत्रवती । पति ययाति पासून ॥३२॥

हें जाणून देवयानी । कोपा चढे जसा अग्नी ॥
मागील स्मरण देऊनी । माहेरीं निघून गेलीसे ॥३३॥

ययाति जाई तिच्या मागून । म्हणे मी अपराधी लीन ॥
तरी सकळ विसरून । आतां घरीं चालावें ॥३४॥

शुक्राचार्य सांगे उत्तर । जरा पावे तव शरीर ॥
कोठें गेला तव निर्धार । कशी दासी भोगिली ॥३५॥

ययाति प्रार्थी वारंवार । मग द्रवले मुनिवर ॥
जरा घेईल अन्य नर । तर तारुण्य तुला मिळे ॥३६॥

मग देवयानीस घेऊन । राजा राज्यीं करी गमन ॥
देवयानीचे पुत्र दोन । त्यांना म्हणे जरा घ्यावी ॥३७॥

त्यांनीं रुकार नाहीं दिला । मग शर्मिष्ठेच्या पुत्रांला ॥
ययाति विचारूं लागला । द्रुहयु अनु नाकारिती ॥३८॥



धाकटा पुत्र पुरु नमन । करून देई अनुमोदन ॥
ययातीही हर्ष पावून । जरा देऊन तारुण्य घे ॥३९॥

मग बहुत काळापर्यंत । विषयसुख राजा घेत ॥
पुण्याईनें होई विरक्त । देवयानीस उपदेशी ॥४०॥

देवयानी मनापासून । सेवावया पतिचरण ॥
सदाकाळ सिद्ध राहून । ययातीस सुखवीतसे ॥४१॥

तिच्या संगतींत ययाति । भोगी अैश्वर्य संपत्ति ॥
धर्ममार्गांत त्यांची मति । होती स्थिर सर्व काळ ॥४२॥

यज्ञादि पुण्य कर्म करून । ययाति राजा पुण्यवान ॥
कीर्तीनें भरे त्रिभुवन । धन्य धन्य म्हणती त्या ॥४३॥

पुरूस तारुण्य देऊन । ययाति पावे वृद्धपण ॥
सर्व मुलांना समजावून । व्यवस्था करी मागची ॥४४॥

पुरु राजेंद्र मूर्धाभिषिक्त । इतर बंधु सामंत होत ॥
यदु दक्षिण भारतांत । दत्त भक्तींत सुखी असे ॥४५॥

ययाति सोडी आसक्ति । ईश्वरनिष्ठ केली मति ॥
धन्य पुण्यवान नृपति । उद्धरून गेला असे ॥४६॥

सर्व कांहीं श्रीभगवान । त्याला देवयानी नमून ॥
पतिमार्गास अनुसरून । कृष्णस्मरणें उद्धरली ॥४७॥

यदु वावरे संसारांत । परंतु त्यांत नसे रमत ॥
एकांत जागीं वनीं जात । मन:पूर्वक करी भक्ति ॥४८॥

अमाप त्याचें तप पाहून । दत्तगुरु होती प्रसन्न ॥
अवधूत वेष घेऊन । राज काननीं पातलें ॥४९॥

श्रीदत्त दिगंबर मूर्ती । आनंदी गंभीर शांत वृत्ति ॥
परंतु धुळींत लोळती । पाहून यदु नमस्कारी ॥५०॥

विनयें पुसे हो दिगंबर । आपण कोण गूढवर ॥
येथें अेकांतीं आजवर । अन्य कोणी न पाहिला ॥५१॥

तुम्ही दिसतां आनंदित । पण कांहीं नाहीं करीत ॥
हें दिसतसे विपरीत । शंका माझी निरसावी ॥५२॥

ही विनंती ऐकून दत्त । प्रेमें वदती रायाप्रत ॥
मी केले गुरु अमित । त्यामुळें बनलों यापरी ॥५३॥

जो जो त्याचा घेतला गुण । त्या त्या गुरु मानिला जाण ॥
सर्वांचा आधार ही जमीन । गुरु माऊली बा माझी ॥५४॥

भूमीस खोदिती तुडविती । तिच्यावर घाणही करिती ॥
नानापरी तिला छळिती । परी ती क्रुद्ध न होतसे ॥५५॥

सर्वांना आश्रय देतसे । विविध अन्न पुरवीतसे ॥
प्रेमें सकळां रक्षीतसे । अशी भूमीची थोरवी ॥५६॥

पृथ्वीसम मी वागतसें । अजगर सदा अनायासें ॥
मिळे तें खाऊन राहतसे । तोही माझा असे गुरु ॥५७॥

समीर सर्वत्र वहात । पण कोठें तो न थांबत ॥
हरिण मोहजाला फसत । हत्तीस मारी केसरी ॥५८॥

असे बहुत गुरु केले । म्हणून समाधान मिळे ॥
यदुरायें नमस्कारिलें । प्रेमें लक्षी अवधूत ॥५९॥

दत्त सांगती त्या दासाला । येथें आलों तव प्रेमाला ॥
आळविसी सदा मजला । भक्ति भावें श्रद्धेनें ॥६०॥

तूं बनसी उत्तम भक्त । तुज ताराया येथें येत ॥
असें सांगून अवधूत । आत्मज्ञान उपदेशिती ॥६१॥

यदुरायास मुक्त केला । आत्मस्वरूपीं त्याला नेला ॥
अरण्यांत दत्त धांवला । धरी कळवळा भक्ताचा ॥६२॥

कोठें स्मरो कसेंही कोणी । शुद्ध भाव अंत:करणीं ॥
भक्तवत्सल भक्ताभिमानी । श्रीदत्त तेथें धांवती ॥६३॥

शुद्ध भावना पाही दत्त । महा संकटीं पडे भक्त ॥
तरी त्यालाही वर अर्पित । तारी सुखें करी विजयी ॥६४॥



यदुराजा दुर्गम वनीं । जावोनी दृढ तप करोनी ॥
दत्तीं श्रद्धा पूर्ण ठेवोनी । दत्त कृपें तरलासे ॥६५॥

श्रीगुरु दत्तासी नमावें । मनोभावें दत्ता स्मरावें ॥
म्हणजे दत्त तेथें धावें । भावबल सत्य तत्त्व ॥६६॥

वाटेल त्या स्थानीं जाऊन । किंवा स्वस्थानींच राहून ॥
दत्ता स्मरणें मनापासुन । मग प्रसन्न श्रीदत्त ॥६७॥

मुख्य भाव दृढ असावा । विकल्प मनांत नसावा ॥
अशा भक्तां अनुभव यावा । यांत आश्चर्य न कांहीं ॥६८॥

उत्तम जन्म ब्राह्मणाचा । जरी मिळाला तरी साचा ॥
देव असे भावबळाचा । उगीच कोणा न मिळे तो ॥६९॥

अत्यंज जातींत जन्मला । भावें देवास आळविला ॥
तर देव तेथेंच गेला । अशी साक्ष सनातन ॥७०॥

मिळण्या हवा देव ज्याला । त्याचा भाव असावा भला ॥
जाति धर्म प्रश्न नुरला । सर्वांस रक्षी श्रीदत्त ॥७१॥

सर्व विश्व रची गोविंद । देव न मानी भेदा भेद ॥
ज्याचा भाव असेल शुद्ध । तेथेंच दत्त उगवेल ॥७२॥

यदूला मुक्त करण्याला । दत्त देव वनीं धांवला ॥
तसाच तो भक्तगणाला । प्रसन्न होई निरंतर ॥७३॥

सकळ त्यानेंच निर्मिलें । ह्मणून त्याचीं सर्व बाळें ॥
जें मूल त्यासी भजे भलें । उद्धरी प्रेमें त्या देव ॥७४॥

जसें द्यावें तसेंच घ्यावें । सूर्याचे किरण पहावे ॥
आरशावरी परतावे । विश्वतत्व मनीं उमजा ॥७५॥

सकळ जीव जंतूवर । प्रेम करावे निरंतर ॥
यांत संतुष्ट परमेश्वर । दृढ निष्ठा दत्तपदीं ॥७६॥

लोणी दिसते ताकावर । दह्यांत दोन्ही निरंतर ॥
पण ताक लोणी नंतर । मिसळत नाहीं केव्हांही ॥७७॥



जगासम दिसो वर्तन । दत्तपती ठेवणें मन ॥
तरतम -भाव योजून । नित्य आचरण करावें ॥७८॥

मुख्य ईश्वर भक्ति असे । ती जशी वाढत जातसे ॥
आपोआप मग घडत असे । वर्तन कायेकडून ॥७९॥

अभ्यासांत मन लावावें । सर्व जिवांचे क्षेम इच्छावें ॥
श्री दत्तासी प्रार्थित जावें । योग्य मार्गे ने मजला ॥८०॥

अशी विनंति दृढतर । जो करी त्यासी गुरुवर ॥
वागवी प्रेमें निरंतर । संतवचन अक्षय हें ॥८१॥

स्वदेहाचें उदाहरण । घ्यावें सर्व भूतांकारण ॥
अवयव स्वकर्म करून । नित्य देहा रक्षिती ॥८२॥

सर्व अवयवांचा मेळ । असल्यास देह सबळ ॥
इंद्रियें समान सकळ । जीव सत्य मानितसे ॥८३॥

व्हावें देहाचे संरक्षण । हीच भावना ठरवून ॥
इंद्रियें स्वधर्मासमान । कार्यकर्म आचरिती ॥८४॥

सकळाशीं ठेवून प्रेम । इंद्रियें वागतीं उत्तम ॥
हें निरखावें सूक्ष्म वर्म । वावरतांना जगांत ॥८५॥

हाच मानवांचा धर्म । समाजहित गुणकर्म ॥
श्री दत्तांना प्रिय परम । मर्म सनातन जाणावें ॥८६॥

याच्या उलट आचरण । टाकी समाज विसकटून ॥
असले पापी दुष्ट दुर्जन । त्यांचें नियमन करावें ॥८७॥

जीवन्मुक्त सत्पुरुष । ज्याचा लोकांस नाहीं त्रास ॥
जे न त्रासती इतरांस । तेच बंधनापलीकडे ॥८८॥

त्यांचे विविध आचरण । देई बोध जनांकारण ॥
सज्जनांचें करी रक्षण । व निर्दालन कंटकांचें ॥८९॥

श्री दत्तगुरु भगवान । आजवर पूर्वीपासून ॥
उद्धरिती जनां लागून । त्यांसी नमस्कार असो ॥९०॥

श्री दत्तांची अनसूया माता । पतिव्रता बहू विख्याता ॥
निरसावया भवाची व्यथा । उपाय पुसे पुत्रासी ॥९१॥

दत्त कथिती तिला ज्ञान । आणि सांगती जावें शरण ॥
अत्रि ऋषींस गुरु करून । होसी माते भवपार ॥९२॥

त्यासम ती करी वर्तन । अत्रि उपदेशती ज्ञान ॥
अनसूयेस ब्रह्मस्थान । लाधे सद्गुरुकृपेनें ॥९३॥

संचित प्रारब्ध वर्तमान । यांची गती व्हावया शून्य ॥
वर्तावें वासना सोडून । दत्त चरण आठवावे ॥९४॥

नैष्कर्म्यसिद्धि मिळवून । जीव मिळवी शिवस्थान ॥
आत्मतत्त्वांत सामावून । ब्रह्मनिर्वाण साधतें ॥९५॥

आत्मतृप्त दत्तावधूत । लीलावतारी सदोदित ॥
चारी आश्रमांत दिसत । लीला इतिहास पुराणीं ॥९६॥

श्री दत्तपुत्र निमि गुणी । शुभात्रेया दत्तभगिनी ॥
दत्त सर्वदा तीर्थाटनीं । साधुजनांस तारिती ॥९७॥

गणेश शक्ति दिवाकर । विधाता विष्णु महेश्वर ॥
सकल मतांचें आचार । दत्तमार्गी सामावती ॥९८॥

वैदिक संस्कृतिआचरण । करिता सूक्ष्म निरीक्षण ॥
अष्टांग योग सुलभपण । दिसे सहज सदैव ॥९९॥

दत्तलीला दत्त जाणती । त्यांना असो भावें प्रणती ॥
भक्तहिता श्री दत्त घेती । एकादशाध्याय गोड हा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय १२ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

चंद्रवंशीं आयुनृपती । करी दत्ताची अनन्य भक्ति ॥
दत्त कृपेनें पुत्र होती । नहुष वगैरे आयूला ॥१॥

श्रीदत्तकृपेचा प्रसाद । आयुवंशांत दिसे वरद ॥
भोग भोगून ब्रह्मानंद । ऋषि राजे मिळविती ॥२॥

आयुपुत्र क्षत्रवृद्ध । त्याच्या वंशांत गृत्समद ॥
दीर्घतमा शौनक देव । जाणती ऋषि होऊन ॥३॥

वासुदेवांश धन्वंतरी । आयुर्वेदविकास करी ॥
स्मरणेंच नष्ट रोग भारी । सर्वां नमस्कार असो ॥४॥

दिवोदासादि शत्रुजित । शिवाचे एकनिष्ठ भक्त ॥
शंकराचा वरद सुत । जन्मे संतुष्ट भूपती ॥५॥

बहु प्रतापी भाग्यवंत । ऋतुध्वज सुविख्यात ॥
कुवलयाश्वही म्हणत । राज कुटुंब आनंदलें ॥६॥

न्यायनीती सद्धर्म पालन । असे तेथें सांठतें पुण्य ॥
उत्तम पुरुष उत्पन्न । होऊन किर्ति वाढते ॥७॥

ब्रह्मदेव हरिहर । श्रीदेव दत्त दिगंबर ॥
करून मायेचा विस्तार । विरक्त मार्गही दाविती ॥८॥

विश्व निर्माण करी ईश । संसार करी परमेश ॥
विरक्त राहून विश्वास । चालवी माये कडून ॥९॥

आपला धनी परमेश्वर । आपण आज्ञाधारी किंकर ॥
परिस्थितिसम आचार । करून देवा प्रार्थावें ॥१०॥

मग येतसे प्रचीती । ईश्वर राही सदाचित्तीं ॥
प्राप्त होई सर्वात्मवृत्ती । तेंच नरजन्मसार्थक ॥११॥

जगांतील सौख्य मिळतें । प्रारब्धाचें येई भरतें ॥
वर्तमान पुण्य चरितें । गुणातीत स्थिति मिळे ॥१२॥



शत्रुजित करी प्रतिपाळ । ऋतुध्वज वाढला बाळ ॥
विद्या शिकून झाला सबळ । प्रज्ञाजनही गौरविती ॥१३॥

पातालकेतु राक्षस । सकळां देई फार त्रास ॥
छळिलें गालव ऋषींस । त्यामुळे ते चिंतावले ॥१४॥

इतक्यांत आकाशवाणी । पडली ऋषीच्या श्रवणीं ॥
अश्वही आला स्वर्गांतुन । संतोष झाला तयांना ॥१५॥

या उत्तम अश्वावरून । ऋतुध्वज राजनंदन ॥
पातलकेतूचें हनन । करील सत्य भिऊं नये ॥१६॥

ही ईश्वरवाणी ऐकून । राजगृहीं केलें गमन ॥
ऋषि कथिती वर्तमान । ऋतुध्वजासह परतले ॥१७॥

राज पुत्रास गौरवून । अश्व केला त्याचे स्वाधीन ॥
त्यावर आतां स्वार होऊन । सांगे राक्षसा मार तूं ॥१८॥

गालवमुनीस नमून । घेता झाला आशीर्वचन ॥
निघाला ह्यावर बसून । पळवी राक्षसा मायावी ॥१९॥

राक्षस वराह होऊन । अरण्यांत करी गमन ॥
त्यावर पाळत राखून । ऋतुध्वज बाण सोडी ॥२०॥

दैत्य पळाला पाताळांत । राजा पाठलाग करीत ॥
बाण लागून हैराण होत । लपला दैत्य दिसेना ॥२१॥

दृष्टीस पडे इतक्यांत । उपकर कन्या रूपवंत ॥
तीही त्याला असे पहात । अंतरीं उभय तोषतीं ॥२२॥

मदालसा रतीसमान । ऋतुध्वज जणूं मदन ॥
परस्पत जाती मोहून । कन्यादासी मग सांगें ॥२३॥

ही असे गंधर्वदुहिता । अवचित सांपडे दैत्या ॥
तेणें झुरणी हिच्या चित्ता । आत्महत्या इच्छीतसे ॥२४॥

पाताळकेतु क्रूर दैत्य । म्हणे वरीन हीला सत्य ।
परंतु आम्ही धीर देत । कामधेनु काल सांगे ॥२५॥

उद्यां येईल नृपसुत । तो वरील तुला निश्चित ॥
आणि वधील राक्षसाप्रत । चिंता कांही न करावी ॥२६॥

तसे तुम्ही आज आलेत । विंधिल्यानें राक्षस येथ ॥
दडून राहिलासे गुप्त । विचार आतां बोलावा ॥२७॥

तो म्हणे हें खरें असे । देवाग्नि विप्राविणें कसें ॥
लग्न करावें मी विश्वासें । सखी म्हणे नको चिंता ॥२८॥

तिनें केलें गुरुस्मरण । गुरूंचें झालें आगमन ॥
ऐकून सत्य वर्तमान । लग्न लाविती यथाविधि ॥२९॥

ऋतुध्वज मदालसा । जोडा शोभला सुंदरसा ॥
गुरूंनी दिला भरवंसा । व निघून गेले स्वठायीं ॥३०॥

सखी ही जातसे तपाला । पातालकेतु प्रकट झाला ॥
सोडूं लागला क्रोध ज्वाला । युद्ध झालें भयंकर ॥३१॥

राजपुत्र सावधवीर । पाताळकेतूस केलें ठार ॥
पत्नी सह ये पृथ्वीवर । सानंद वंदी ऋषिवर्या ॥३२॥

गालव देती आशीर्वाद । ऋतुध्वजा अमोल मोद ॥
गेला नगरीं मग आनंद । काय पुसावा वडिलांचा ॥३३॥

राज कुटुंब प्रजाजन । उत्सव करिती आनंदून ॥
सकळ म्हणती धन्य धन्य । शिवप्रसाद श्रेष्ठ भला ॥३४॥

चक्रवाक जोडप्या परी । जोडा शोभे बरवे परी ॥
विलास करी नाना परी । भोगी संसार सुखानें ॥३५॥

वैर साधण्या तालकेतु । ज्याचा बंधू पाताळकेतू ॥
तो मरतां शोक बहुतू । करून वेळ लक्षीतसे ॥३६॥

राजपुत्र मृगये रानीं । गेला असतां तेथें नयनीं ॥
उत्तम आश्रम अवलोकोनी । आंत जातां जाहला ॥३७॥

तालकेतू कपटी परम । बांधिला मायावी आश्रम ॥
ऋषि बनला दंभकाम । ऋतुध्वजास छळावया ॥३८॥



राजाला कुशल विचारी । आणि सांगे नवलपरी ॥
यज्ञ सामुग्री माझी अपुरी । द्रव्याविणें अडलों गा ॥३९॥

जरी तव कंठा मिळेल । यज्ञ सहज पूर्ण होईल ॥
राजपुत्र असे सरळ । कंठा देतसे काढून ॥४०॥

ऋषि म्हणती जरा बसा । वरुणाकडे त्वरितसा ॥
जाऊन येतों पुरली आशा । आणि गेला राजपुरीं ॥४१॥

शत्रु जितास कंठा दिला । म्हणे पुत्र तुमचा मेला ॥
खूण दिधली त्यानें मला । निरुपायानें आलों मी ॥४२॥

सर्वजन शोक करीत । मदालसा देह त्यजीत ॥
राजा अंत्यकर्म करीत । ऋषि मायावी परतला ॥४३॥

सांगे कपटी दुष्ट दैत्य । चलावें होई क्षेम सत्य ॥
कुवलायाश्व मग अगत्य । निघून नगरा पाताल ॥४४॥

सर्व वर्तमान ऐकून । करीतसे दु:ख दारुण ॥
पण करी मनापासून । दुसरें लग्न न करीन ॥४५॥

इंद्रासारखा पराक्रम । तसाच विद्वान उत्तम ॥
रूप असे मदनासम । पण उदास राजपुत्र ॥४६॥

राजकुटुंब प्रजाजन । कष्टती असा त्यापाहून ॥
परंतु त्याचें संयमी मन । थोर असे तो जाणता ॥४७॥

अश्वतर नागाचे सुत । विप्रवेषें भूवर फिरत ॥
पाहून सद्गुणी राजसुत । मित्र बनती तयाचे ॥४८॥

मग कांहीं कालानंतर । त्यांना कळे राजअंतर ॥
मदालसा रत्न सुंदर । मृत म्हणून उदास तो ॥४९॥

त्यांना उत्पन्न झाली कृपा । म्हणती हरूं राजतापा ॥
सकळ वर्तमान बाप्पा । सांगून उपाया वांछिती ॥५०॥

अश्वतरही तसें सांगे । कंबळ नागा घेई संगे ॥
तपश्चर्या करण्या लागे । सरस्वती संतोषली ॥५१॥



गायन विद्या तिजकडून । मिळवून केलें गायन ॥
आणि शिवासी तोषवून । मदालसा मिळविली ॥५२॥

मदालसा पावे मरण । शिवप्रसादें संजीवन ॥
महेश उपदेशिती ज्ञान । ब्रह्मविदा बनली ती ॥५३॥

सांगे मुलांस अश्वतर । घेऊन या राजकुमर ॥
त्याचें कार्य करूं सत्वर । मग भूमिवर ते आले ॥५४॥

ऋतुध्वजास आग्रह केला । स्नेहासाठीं तोही निघाला ॥
नाग पातले स्वगृहाला । नृपनंदना गौरविती ॥५५॥

अश्वतर त्यास विचारी । काय वासना असे अंतरीं ॥
नृप म्हणें स्वधर्माचारीं । मति माझी स्थिर असो ॥५६॥

हे विप्रवेषी तव सुत । नाग म्हणून न जाणत ॥
आतं तव दर्शनें होत । तृप्त निवांत धन्य मी ॥५७॥

अश्वतर म्हणे मागावें । हवें तें सर्वही सांगावे ॥
राजा सद्गदित भावे । मित्रांकडे पहातसे ॥५८॥

त्यांनी कथिला राजहेतु । अश्वतर म्हणजे तथास्तु ॥
सत्कारून त्यास उचितु । मदालसा समर्पिली ॥५९॥

मदालसा व ऋतुध्वज । मग आनंदलीं सहज ॥
निघून आलीं नगरा निज । नागोपकार आठविती ॥६०॥

हें ऐकून सकळ वृत्त । संतोषले जनसमस्त ॥
आनंदोत्सव ते करीत । हर्षभरें चहूंकडे ॥६१॥

धन्य धन्य ते नागपुत्र । त्यांचा जनकही पवित्र ॥
सुखी केला आपुला मित्र । दुर्घटकार्य करोनियां ॥६२॥

अपूर्व असे हें मित्रत्व । थोर भाग्य आदि कर्तृत्व ॥
ईश्वरी अंशाचें अस्तित्व । निरभिमानें उमजावें ॥६३॥

ईश्वरभक्तीचा विकास । संसारांत देतसे हर्ष ॥
निरसून शोक भय त्रास । उत्कर्ष पावे धर्मानें ॥६४॥

शत्रूजित राजानंतर । कुलयाश्व राज्यावर ॥
येऊन चालवी धर्माचार । सर्व प्रजा सुखी असे ॥६५॥

आयूस श्रीदत्तप्रसाद । सत्त्वगुणाची वाढ शुद्ध ॥
संततींत मुलें प्रसिद्ध । पुण्यवान निपजती ॥६६॥

परमेशभक्ति करून । वाढविती सर्वदा पुण्य ॥
संसारीं आनंद भोगून । अंतीं मोक्ष मिळविती ॥६७॥

देव मानव दानव । मायेनें व्याप्त ही सर्व ॥
ब्रह्म माया अनादि दंद्व । असून एकत्व जाणावें ॥६८॥

सत्त्व रज तम त्रिगुण । चालविती जग संपूर्ण ॥
दोघांपेक्षां तिसरा गुण । मुख्य होऊन कार्य करी ॥६९॥

त्रिगुणी व त्रिगुणातीत । श्रीदत्तात्रेय भगवंत ॥
दावून सर्व अशाश्वत । सामान्यांत विशेष करी ॥७०॥

त्यामुळें तेथे जाई मन । घडे परमेशचिंतन ॥
हेंच सौभाग्य सोपान । भवसागर तरावया ॥७१॥

श्रीदत्तपदीं ठेवून मन। कालानुसार आचरण ॥
करून तरतील जन । भयंकर संसारसागरीं ॥७२॥

मदालसा असून ज्ञानी । वागे जशी राजरमणी ॥
राजा म्हणे ही मम कामिनी । राज्यवैभव भोगिती ॥७३॥

झाली राणी गर्भवती । उत्सव समारंभ चालती ॥
ज्ञानें तृप्त मदालसा होती । गर्भास ज्ञानी ती करी ॥७४॥

मदालसा गर्भा म्हणत । प्रारब्धानें देह मिळत ॥
आत्मतत्त्व असे शाश्वत । देह म्हणजे तूं नव्हे ॥७५॥

निर्मळ अससी नित्य मुक्त । आत्मानंदीं सर्वदा रत ॥
कर्मव्यापाचा लेप निश्चित । नाहीं मुळींच हा तुला ॥७६॥

ब्रह्म सदा काळ असत । नाश त्याचा कधीं नसत ॥
तेंच तत्त्व तूं बा असत । कर्म पसारा तुज नाहीं ॥७७॥



देह असतो अशाश्वत । दृश्य तें सर्व नाशवंत ॥
शरीरसुखासाठी अमित । कष्ट करिती लोक हे ॥७८॥

त्यांना सुख नाहीं मिळत । शरीरसुख अशाश्वत ॥
म्हणून सगळे ते पडत । पुन्हां पुन्हां कष्टांमध्ये ॥७९॥

देह म्हणजे वस्त्रापरी । त्या सुख दुःख नानापरी ॥
परी आत्म्याला तें न होई । तो नेहमीं निर्विकल्प ॥८०॥

तोच तूं बाळा अससी । फसूं नको देह कर्मासी ॥
कर्म हवें ज्ञान प्राप्तीसी । सांगते श्रुति माउली ॥८१॥

झाल्यावर आपणां ज्ञान । न राही कर्म-प्रयोजन ॥
हें न कळे लोकां म्हणून । सार सोडून वागती ते ॥८२॥

सर्व माझें माझें म्हणत । पण तें सारें नाशवंत ॥
खरें टिकणारें शाश्वत । आत्मरूपच अक्षय ॥८३॥

आनंद अनादि अनंत । तो करून घ्यावा प्राप्त ॥
परंतु हें जे न जाणत । ते जन मूढ सर्वही ॥८४॥

मन बुद्धि व अहंकार । यांच्याही पलीकडे दूर ॥
ईश्वरी शक्ति अनिवार । जी या विश्वास कारण ॥८५॥

तिच्यावर जें तत्त्व असे । त्याचें वर्णन न होतसे ॥
ब्रह्मानुभव मिळतसे । तेंच मूळ रूप जाणा ॥८६॥

तेंच रूप आपण सर्व । तेथें कसला भेदभाव ॥
शिव स्वरूप सर्व जीव । चैतन्यमय बनताती ॥८७॥

जलबिंदू जळीं पडतां । नये निराळा पुन्हां काढतां ॥
जीवाचें शिवरूप होतां । त्याचपरी घडत असे ॥८८॥

नानापात्रीं जल ठेविलें । तें एकच पाहिजे जाणिलें ॥
या सम समजावें भलें । आत्मरूप सदोदित ॥८९॥

तेंच बाळा तूं रे अससी । मदालसा सांगे बाळकासी ॥
जीवनमुक्त आत्म-संतोषी । म्हणून बोध ठसे तिचा ॥९०॥



योग्य काळीं राणी प्रसूत । होऊन जन्मला राजसुत ॥
राजा प्रजा आनंदभरित । उत्सव दानधर्म चाले ॥९१॥

मदालसा संसारी राणी । असेंच ऋतुध्वज मानी ॥
राजपुत्रास भूषवोनी । विक्रांत नाम ठेविलें ॥९२॥

हें पासून राणी हसली । पण ती वेळ निभावली ॥
तसेंच करी पुढील वेळीं । राजा शंकित जाहला ॥९३॥

द्वितीय तृतीय नंदन । नामें सुबाहु शत्रुमर्दन ॥
त्यांचें होतां नामकरण । पत्नी-हास्य भूप लक्षी ॥९४॥

मग चौथा पुत्र जन्मला । संसाराचा सुख सोहळा ॥
प्रारब्धकर्माचा उमाळा । मदालसा जाणतसे ॥९५॥

राजा सांगे मदालसेला । तूंच नांव ठेव बाळाला ॥
मागें मला अनुभव आला । नांव ठेवितां हससी तूं ॥९६॥

राजधर्मास अनुसरून । तीन मुलांचे नामकरण ॥
करतां जाई माझें मन । कांते तुझ्या हंसण्याकडे ॥९७॥

राजाराणी सुख-संवाद । नांवासाठीं गोड विनोद ॥
राज महालीं संतोष मोद । उपदेश जनां कारणें ॥९८॥

माया म्हणजे नाशवंत । परब्रह्म एक शाश्वत ॥
विश्वपसारा हा चालत । त्यांत ज्ञानी बद्ध नसे ॥९९॥

संचितांत ज्याला गती । त्याला प्रारब्ध म्हणताती ॥
दत्त भक्तहितार्थ घेती । द्वादशाध्याय मोद भरें ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु

# अध्याय १३ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

मदालसा व ऋतुध्वव । नामकरणावेळीं सहज ॥
जरी बोलतीं कांहीं गुज । तरी तें चिंतनीय असे ॥१॥

ऐकून पतीचा प्रिय प्रश्न । मदालसा स्मित करून ॥
पतीचें संतोषवावें मन । म्हणून सांगे संथपणे ॥२॥

विनयें म्हणे ती राजाला । विक्रांत नाम कवणाला ॥
जो क्रांती करील त्याला । सत्य यथार्थ साजेल तें ॥३॥

देह असे हा नाशवंत । आत्मरूप नित्य असत ॥
त्याला ठेवितां नाम विक्रांत । हंसू आलें सहजची ॥४॥

आत्मरूपा आकार नाहीं । मग कोठचे हात पाहीं ॥
सुबाहु नाम योग्य नाहीं । मग कां मी न हसावे ॥५॥

सर्वत्र नित्य आत्मतत्त्व । त्याला नसतें अरिमित्रत्व ॥
शत्रुमर्दन हें कर्तृत्व । ऐकून हसू लोटलें ॥६॥

आतां नव बाळाचे नांव । अलर्क लोकाचारास्तव ॥
अर्थ ही नसे ठेवा नांव । अर्थहानि मग नाहीं ॥७॥

ऋतुध्वजाला सत्य वाटलें । मदालसेनें जें सुचविलें ॥
चौथ्या मुलास नाम ठेविलें । अलर्क असें प्रेमानें ॥८॥

मदालसा राणी ज्ञानी । तीन पुत्रांना करी ज्ञानी ॥
चौथ्या मुलास अज्ञानी । ठेवी भविष्य जाणुन ॥९॥

संचितांत ज्याला गती । त्याला प्रारब्ध म्हणताती ॥
त्याची असे गहन गती । ज्ञानीजन ती जाणती ॥१०॥

गती समान व्यवहार । करितां दिसती नारीनर ॥
ज्ञानी वागती जसे इतर । परी राहाती ज्ञानमार्गीं ॥११॥

आधीं मध्यें अथवा अंतीं । संसारांत देई विरक्ती ॥
ज्ञानी जनांची अशी संगती । दिसते लोकीं सर्वदा ॥१२॥



अधिकार तसा उपदेश । करून जोडिती मोक्षमार्गास ॥
आनंदी वृत्तींत जीवास । ठेवून आनंदीं त्या नेती ॥१३॥

मदालसेला पुत्र झाले । ज्ञानें धाले तीन पहिले ॥
इतरांसमान वाढले । पण दिसती पिशापरी ॥१४॥

राजा असे अंतरीं झुरत । म्हणे नशिबांत मूर्ख सुत ॥
एके दिवशी संबोधीत । अरे विक्रांता मम बाळा ॥१५॥

राजपुत्र तुला म्हणती । आम्हां वाटते चित्तीं खंतीं ॥
वेडेचार तुझे दिसती । टाकून वाग नीटसा ॥१६॥

विक्रांत म्हणे स्वपित्यासी । तव धर्म नाहीं मजसी ॥
कर्म हवें ज्ञानप्राप्तीसी । मग तें ज्ञानीं आटतें ॥१७॥

माताकृपें ज्ञान मिळून । आम्ही तीनही तृप्त पूर्ण ॥
आत्मरूपीं असतों मग्न । नर जन्माचें सार्थक हें ॥१८॥

प्रारब्ध भोगीतसे देह । आमुची स्थिति ही विदेह ॥
पूर्णानंद आमुचे गेह । आईनें ब्राह्मानंद दिला ॥१९॥

कर्माची गतीच संपली । चैतन्य वृत्ति मुसावली ॥
तेथें बरे वाईट बोली । जीवनमुक्ता न लागत ॥२०॥

ऐकून पुत्राचें उत्तर । राजा होतसे निरुत्तर ॥
मदालसा पत्नीस सत्वर । सांगे ज्ञानी अससी तुं ॥२१॥

पुत्रजन्म सार्थक झालें । पण राजकर्म राहिलें ॥
राज्यभार वाहण्या मुलें । प्रवृत्तिमार्गी नसती हीं ॥२२॥

आत्मनंदांत सदारत । तेणें जगीं पुण्य वाढत ॥
राजलक्षणांनीं मंडित । अलर्क बाळ दिसतसें ॥२३॥

पांच उच्च ग्रहांचा योग । दावीतसे राजेंद्र योग ॥
त्याला शिकव प्रवृत्तिमार्ग । अंतीं ज्ञानी तों व्हावा ॥२४॥

आमच्या शिरीं भार आला । राजधर्म पाळणें भला ॥
अंतरीं संयम चांगला । ठेवून न्याय निवडावा ॥२५॥



गुणवंताचा व्हावा मान । लोक संग्रह सांभाळून ॥
सुखी व्हावे संपूर्ण जन । धर्म सनातन हा असे ॥२६॥

शिवप्रसादें ब्रह्मज्ञानी । होसी जाणिलें आज मनीं ॥
लाधसी मला भाग्यखाणी । सर्व माहीत असे तुला ॥२७॥

जी माझी विचार सरणी । ती कथिली तुज लागोनी ॥
तूं राजाची अससी राणी । आणि ज्ञानी धन्य तूं ॥२८॥

मदालसा म्हणे अवश्य । जाणून अलर्कभविष्य ॥
पढवी राजधर्मभाष्य । कठोर धर्म राजाचा ॥२९॥

राजा परम संतोषला । उत्तम मुर्हूत पाहिला ॥
अलर्कास अधिकार दिला । राज्याभिषेक करोनियां ॥३०॥

तपा गेला राजा वनांत । मदालसेच्या संगतींत ॥
ज्ञानी होऊन धन्य होत । मुक्त झालीं राजाराणी ॥३१॥

शिव वरदी राजाराणी । प्रारब्धभोग संपवोनी ॥
योग्य काळीं होऊन ज्ञानी । दाविती वाट इतरांना ॥३२॥

सर्व काळजी ईश्वरास । त्यावर ठेवणें विश्वास ॥
त्यालाच चिंता बहुवस । अनुरूप करी आंखणी ॥३३॥

त्याच्या योजनेसम स्वकर्म । करावें राहून निष्काम ॥
हीच त्याची सेवा परम । देई आराम ब्रह्मपदीं ॥३४॥

ऋतुध्वजा नंतर नृपति । अलर्क शोभे या जगतीं ॥
बंधू पिशासमान वर्तती । पण आदरीं तो त्यांना ॥३५॥

पाहून न्याय आणि नीती । देई प्रजेस सुखशांती ॥
पुत्रां समान प्रजा प्रीती । सज्जनां सुख होतसे ॥३६॥

अधार्मिकांना झाला धाक । म्हणून वाढला विवेक ॥
धर्म पाळिती सर्वलोक । राजा प्रजेला सुखदायी ॥३७॥

शत्रूंवर मिळवी जय । भोगी सम्राट ऐश्वर्य ॥
राजकर्मी रमून जाय । राजैश्वर्य खूप मिळे ॥३८॥

बायको लाधे सुलक्षणी । व पुत्रादिकही सद्गुणी ॥
गढून गेला पुर्णपणीं । ऐहिक भोगीं अलर्क तो ॥३९॥

प्रपंच जाहला उत्तम । धन्य अलर्क पूर्णकाम ॥
लाधण्या परमार्थधाम । ईशयोजना उगवली ॥४०॥

त्याचा सुबाहु नामें बंधु । म्हणे अलर्का द्यावा बोधू ॥
अनित्य सुखीं रमे मूढू । त्यासी सावध करावा ॥४१॥

लौकिक संकट आणावें । आत्महिताकडे त्या न्यावें ॥
आपुलें स्वराज्य मागावें । असें ठरवून सांगत ॥४२॥

अरे अलर्का आम्ही चार । पण तूंच राज्याधिकार ॥
बळकावून निरंतर । वर्तसी हें योग्य नसे ॥४३॥

आमचा भाग दे आम्हांला । निदान माझा भाग मला ॥
देऊन टाक हो तूं भला । उशीर बा तूं न लावणें ॥४४॥

अलर्क म्हणे सुबाहूला । तुम्हांस नाहीं भाग दिला ॥
पिताजींनीं मलाच केला । अभिषेक सर्व राज्याचा ॥४५॥

तुम्हांस नाहीं व्यवहार । न कळे राज्याचा विचार ॥
योग्य वहाण्या राज्यभार । मलाच जनकें नेमिलें ॥४६॥

जर राज्य हवें तुजसी । तरी करणें समरासी ॥
अलर्क आसक्त राज्यासी । लौकिक दु:ख ओढवलें ॥४७॥

सुबाहूनें लटका क्रोध । काढून चालविलें युद्ध ॥
हां हां म्हणतां दु:खखेद । अलर्का प्राप्त झालासे ॥४८॥

सुबाहुपक्ष बळावला । काशीराजाही मिळे त्याला ॥
अलर्क पराजय पावला । गर्व जिराला पूर्णपणें ॥४९॥

मग त्याला स्मरण झालें । मातेनें गुप्त पत्र दिलें ॥
अंत:करण उजळलें । धीट गंभीर जाहला ॥५०॥

मदालसा वनीं जातसे । तेव्हां पत्रिका देतसे ॥
आणि अलर्का सांगतसे । जेव्हां संकट येईल ॥५१॥



तेव्हां वाच ही उघडून । कर तसेंच आचरण ॥
मुळींच भीती नाहीं जाण । अत्यंत गुप्त ठेव ही ॥५२॥

अलर्क झाला सद्गदित । माता वचन आठवीत ॥
सत्य सुखाची खूण घेत । नमून उघडून वाचिली ॥५३॥

संतसंग स्वयें धरावा । गर्व मुळींच न ठेवावा ॥
वासनासोहळा सोडावा । सह्य पर्वतीं चलावें ॥५४॥

तेथें श्रीगुरु दत्तात्रेय । शरण रिघावें नि:संशय ॥
विश्वासें सर्व दु:ख जाय । मिळेल सौख्य शाश्वत ॥५५॥

हें वाचून अलर्क राजा । सोडून सर्व राज्यकाजा ॥
निघे सेवाया सर्व राजा । एकभावें करोनियां ॥५६॥

दत्ताश्रमीं तो पातला । दत्त गुरूला पाहून धाला ॥
भक्तीनें नमन करूं लागला । मुखीं म्हणे दु:ख हारी ॥५७॥

दत्तराज पुसती त्यातें । मदालसा गर्भ रत्नातें ॥
अरे दु:ख असे कोणतें । आणि कोणा सांग मज ॥५८॥

मदालसेचें दुग्धामृत । सेवून जो झाला तृप्त ॥
त्यास दत्तप्रश्नें त्वरित । तत्त्वविचार उगवला ॥५९॥

तो विचार करी स्वत:शी । मी कोण हें तो तपाशी ॥
अशा विचारें कळे त्यासी । देह म्हणजे मी नव्हे ॥६०॥

मन बुद्धि व अहंकार । नव्हेच मी हा निर्धार ॥
आत्मस्फुरण जरी थोर । अमर ब्रह्म मी आहें ॥६१॥

श्रीदत्तांचा कृपाकटाक्ष । समाधिस्थ भूप प्रत्यक्ष ॥
मावळला प्रकृतिपक्ष । आत्मसुखांत सामावे ॥६२॥

अक्षय आनंद अमित । दत्त कृपेनें ज्ञान प्राप्त ॥
धन्य धन्य अलर्क भक्त । वंदन दत्ता प्रेमभरें ॥६३॥

त्यांचें घडो सदा स्मरण । होतील भावें ते प्रसन्न ॥
त्यांची सरी पावेल कोण । नमस्कार त्यांस असो ॥६४॥



म्हणे अलर्क श्रीगुरुला । मातृप्रेमें तव पायांला ॥
वंदून जोडलों सुखाला । दत्ता कृपाळु थोर तुम्ही ॥६५॥

आपलें यथार्थ वर्णन । करण्या समर्थ नाहीं कोण ॥
तव अंत आपुल्यावीण । कोणीही जाणूं न शकती ॥६६॥

गुरुदेवा मी सुखी असें । दु:ख मला मुळींच नसे ॥
तुमच्या कृपेनेंच असें । घडलें दत्ता दयाळा ॥६७॥

स्वरूपाचा मिळाला ठाव । ब्रह्मानंदाचा अनुभव ॥
घेऊन तृप्त झालों हांव । आतां कांहीं न राहिली ॥६८॥

अहंकार आणि वासना । दु:खाच्या याच मूळ खुणा ॥
तेणें विसरें आत्मस्थाना । दत्ता कळे हें तव कृपें ॥६९॥

सुख दु:खाच्या पलीकडे । ब्रह्मरूप गृह रोकडें ॥
तेंच मुख्य साध्य सांपडे । तव कृपेनें गुरुराया ॥७०॥

तूं मी सर्वच एकतत्त्व । ही दाखविली दत्ता मात ॥
सर्वच रूपें आपणांत । आणि आपण त्यांत सदा ॥७१॥

सर्व मिळून एक सत्त्व । नाना रुपें भिन्न दिसत ॥
आकाश एकच असत । परी घटभेदें निराळें ॥७२॥

अशी जाणीव मला झाली । ही गुरो आपली साउली ॥
त्वांच गुरो सर्वां माउली । दाखविली निज सोय ॥७३॥

तुम्ही गुरु मी शिष्य असत । हें आपुल्या कृपें कळत ॥
तव पदीं प्रेमळ प्रणिपात । विनंति सद्गुरु परिसावी ॥७४॥

स्थिर होण्यास आत्मज्ञान । कसें करावें आचरण ॥
जोडले हे तव चरण । नम्र आहें तव पायीं ॥७५॥

हें ऐकून गुरु बोलती । सदा रहा असंग वृत्ती ॥
जरी बनला मुक्तस्थिती । तरी देहकर्म भोगणें ॥७६॥

इतर जन जें मानिती । देहात्मभाव एक असती ॥
तसें जीवन्मुक्त न मानिती । जाणती भिन्न असती ते ॥७७॥

देहपातापर्यंत येती । लौकिक सुख दु:ख स्थिती ॥
त्यांना देह कर्मे मानिती । आणि रमती आत्मरूपीं ॥७८॥

जगीं सुखदु:खाचा मेळ । हा शरीर धर्माचा खेळ ॥
मुक्त न गणीच केवळ । म्हणे निराळा त्यांहून मी ॥७९॥

एकरूप सुख दु:खांत । सदा असे प्रसन्न चित्त ॥
आत्मरूपीं लक्ष असत । कधीं न विसरे तयाला ॥८०॥

जरी मुक्त इतरां परी । तरी त्यांत भेद या परी ॥
म्हणून सांगतों त्यापरी । वागत जावें अलर्का ॥८१॥

मदलसा-गर्भ पुतळ्या । भीति नसे बा माझ्या बाळा ॥
तुझी मति आत्म ठायाला । राहील पाडसा निश्चयें ॥८२॥

शंकरवरदी तुझा पिता । तशीच मदालसा माता ॥
त्यांचा पुत्र तूं आवडता । ब्रह्ममयच बनशील ॥८३॥

भक्तमति व्हावया स्थिर । माझें चरित्र निरंतर ॥
गावें म्हणजे माझ्यावर । अंत:करण स्थिर होतें ॥८४॥

शिष्या विषयां न गणावें । माझ्याकडे लक्ष ठेवावें ॥
यापरी आचरण करावें । मग येई एकाग्रता ॥८५॥

माझ्यावरी अंत:करण । लागून राहील तें पूर्ण ॥
ध्यानीं मनीं स्वप्नींही जाण । मी राहीन दिसत तुला ॥८६॥

देहान्त-समय पातेल । तेव्हां कलेवर पडेल ॥
तव जीव मग येईल । माझ्यापाशींच निश्चयें ॥८७॥

मी करीन त्या ब्रह्ममय । भक्तसेवा स्थान अक्षय ॥
श्रद्धा भक्ति सोपा उपाय । भक्त तरतो भवनदीं ॥८८॥

हें साधन बरवें असे । जशी भक्ति होत जातसे ॥
तशी उन्नति घडतसे । मम भक्ताची सर्वदा ॥८९॥

माझ्या भक्तां ज्ञान देतसें । नित्य त्यांच्या सन्निध वसें ॥
प्रेमें सुधारुन घेतसें । नेहमीं भक्ता अलर्का ॥९०॥



जो माझ्यावरी ठेवी भाव । तोच असतो माझा ठाव ॥
सुखें जिंकी संसार डाव । आणि पोंचे आत्मपदीं ॥९१॥

कधींही वत्सा माझा भक्त । अलर्का नाश न पावत ॥
त्याचें रक्षण सदोदित । रात्रंदिन मी करितों ॥ ९२॥

जो जो करी माझें स्मरण । तेथेच माझें अधिष्ठान ॥
माझे प्रेमळ भक्तगण । मला आवडती सर्वदा ॥९३॥

मी भावाचा सदा भुकेला । माझे भक्त स्तविती मला ॥
तेथें तिष्ठत सर्व काला । भक्त मेळ्यांत रमतों मी ॥९४॥

भक्त-संकटें गुप्त प्रकट । हरून करितों वाट नीट ॥
ही मम खूण भली स्पष्ट । माझे भक्तच जाणती ॥९५॥

कसलीही इच्छा धरून । जो करितो माझें स्मरण ॥
चित्तीं ठेवून भाव पूर्ण । त्या मी न विसरें कधींही ॥९६॥

जितकी निष्ठा माझ्यावर । तितकी कृपा खरोखर ॥
भक्त अनुभवी निरंतर । भक्त जाणती मम लीला ॥९७॥

जो जो सर्वाधार म्हणून । मला होतसे लीन शरण ॥
त्यास मी दत्त जगज्जीवन । उदास न करीं कधींही ॥९८॥

सूक्ष्म कृमिकीटकापासून । अग्रवर्णाचा उच्च ब्राह्मण ॥
जो जो भावें आळवी पूर्ण । त्याला मीच रक्षितो ॥९९॥

श्रीगुरु-अलर्क-संवाद । भक्तां असे सदा सुखद ॥
दत्त देतील नित्यानंद । अध्याय तेरावा दत्तार्पण ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय १४ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

अलर्क शरण श्रीदत्तास । ब्रह्मज्ञान स्थिर होण्यास ॥
उपाय पुसतां त्यावेळेस । त्यांचा संवाद चालला ॥१॥

म्हणती श्रीगुरुदेवदत्त । मला आवडती माझे भक्त ॥
लक्ष देऊन शिष्य ऐकत । अलर्क राजा निष्ठेनें ॥२॥

सर्व जण माझे असती । माझींच लेकरें खरीं तीं ॥
इष्ट निष्ट परिस्थिती । देतसें त्यांना मी सदा ॥३॥

माझे बाळक सुखी व्हावे । मला प्रेमानें आळवावें ॥
त्यांनीं मम प्रेम साधावें । म्हणून जनीं सुख देतों ॥४॥

तरी मला ते विसरती । भलती कडे सुखा जाती ॥
आणि नंतर दु:खी होती । त्यांना निर्मिते खरें सुख ॥५॥

हें सर्व हो उत्पन्न केलें । त्या मी पाळितों माझ्याबळें ॥
यथायोग्य वागवितों बाळें । परंतु तीं मला नेणतीं ॥६॥

मी सर्वांचा आश्रयदाता । सर्वांलागीं इच्छित देता ॥
मजला सोडितां सर्वथा । दु:खीं पडती मम बाळ ॥७॥

सर्वजनां सुख व्हावया । करितों नानाविध उपाया ॥
देतों सर्वांस मीच काया । पण हें ते न जाणती ॥८॥

ज्याला जें जें प्राप्त झालें । तो म्हणे तें माझें सगळें ॥
इतरां पीडीतसे बळें । मला नेणोनी सर्वथा ॥९॥

अशापरी अन्यां छाळीत । त्यांना दंडावें हें निश्चित ॥
हे दु:खीं पडतां म्हणत । देव आम्हांस कोपला ॥१०॥

पण मला ते न स्मरती । नानापरी हाल भोगिती ॥
दु:ख निवारण्या झटती । स्वीकारुन दुष्ट मार्ग ॥११॥

माझा कोणीच शत्रु नसे । शुद्ध मनानें स्मरतसे ॥
तो माझा प्रिय होतसे । त्याचें कल्याण होईल ॥१२॥

पापपुण्यानुसार जन्म । मीच देतों अलर्का जाण ॥
परहित बुद्धि ते पुण्य । परपीडन पाप असे ॥१३॥

असला माझा न्याय असें । तसा सर्वदा वागतसें ॥
दु:ख-पीडितांनीं विश्वासें । मला स्मरावें शुद्धमनें ॥१४॥

भावें अभावें कसेंतरी । जो जो माझें स्मरण करी ॥
तो तो येतसे मार्गावरी । शुद्ध विचारी बनेल तो ॥१५॥

जो ज्या क्रमानें करी भक्ती । त्यासम तो ये मजप्रती ॥
एकदांही दृढ स्मरती । तेही तरती निश्चित ॥१६॥

गुरु म्हणती अलर्कास । येवो सुखकाल जनांस ॥
अथवा भोगीत दु:खास । त्यांचें वागणें सांगतों ॥१७॥

लौकिक सुख स्वीकारावें । पण कोणास न पीडावें ॥
सर्वांलागीं सुख इच्छावें । आणि करावें शक्य तें ॥१८॥

देशकालसम आचार । करीत जावा निरंतर ॥
भावभक्तीनें वारंवार ।मला स्मरत असावें ॥१९॥

लौकिक सुखीं न गुंतावें । लोकद्वारा साह्य करावें ॥
हें अल्पसें भोगून जावें । मम भक्तीनें आत्मसुखीं ॥२०॥

सर्व लोक माझे असती । बरे वाईट जगीं दिसती ॥
परंतु परमात्म्याची ज्योती । सर्वांत एक विकासे ॥२१॥

नेहमीं चिंतावी उन्नति । परपीडक नसावी ती ॥
जर टिके ही मन:स्थिती । आत्मोन्नति साधेल बा ॥२२॥

सर्व कार्य ईश्वर करी । आपण बाहुलें निर्धारी ॥
हेतु टाकून सर्व दूरी । बनत जावें निर्भय ॥२३॥

साध्य होईल जी जी शक्ति । लोकहितास योजावी ती ॥
अंतरांत अखंड शांती । आत्मचिंतनीं रहावें ॥२४॥

चित्तीं कल्याणकारी  काम । पण न सांपडे आत्माराम ॥
आणि घडे देहविराम । तरी अधोगति नाहीं ॥२५॥



या लोकीं तसा परलोकीं । भक्ता जवळ असतों कीं ॥
मम कृपेनें भक्ता झांकीं । अखंड कल्याणीं ठेवितों ॥२६॥

योग्य ठिकाणीं जन्म घेऊन । भक्त करी आत्मसाधन ॥
त्वरेनें जातसे उद्धरून । ब्रह्मनिर्वाण गति मिळे ॥२७॥

जे कवण दु:खी असती । त्यांनींही वागण्याची रीती ॥
ऐक सांगतों तुजप्रती । त्यांना सुद्धां न टाकतों ॥२८॥

त्यांच्या पापाप्रमाणें फल । दु:ख भोग जरी अटळ ॥
तरी ठेवावा भाव निर्मळ । दृढ भक्तीनें भजावें ॥२९॥

कोणा वाईट न चिंतावे । सर्वांचे कल्याण इच्छावें ॥
मजला अखंड प्रार्थावें । सुखी ठेवण्या सर्वांसी ॥३०॥

सदा मला शक्तीप्रमाणें । भावभक्तीनें आळविणें ॥
प्रेमभावें मला स्मरणें । विश्वासून नेहमीं ॥३१॥

परोपकार हें पुण्य । पाप असे परपीडन ॥
हा विचार मनीं आणून । मानस शुद्ध करावें ॥३२॥

देशकालादि ओळखून । करावें लौकिक वर्तन ॥
चिंतन मनन निजध्यासन । मी पाहातों भक्ताचें ॥३३॥

केवळ बाह्य आचरण । नाहीं मम कृपेचें साधन ॥
हे अंतरांत उमजून । प्रयत्न करीत असावा ॥३४॥

मम भक्तीनें जात नाहीं । असलें कधीं पातक नाहीं ॥
मला प्रेमें स्मरतां जाई । भक्तपातक लयाला ॥३५॥

भक्तास जवळ घेईन । पापें त्याचीं नष्ट करीन ॥
जन्मांतरींही न सोडीन । चिदानंद देईन त्या ॥३६॥

बाळ घाणेरडें होतसे । पण माता टाकीत नसे ॥
जवळ घेऊन निर्मळसें । करून वागवी मायेनें ॥३७॥

अशारीतीनें पाप्यालाही । कृपा करितों सर्वदाही ॥
माझ्या भजनें पातकीही । होई भक्त उत्तमसा ॥३८॥



जगांत संपूर्ण पातकी । किंवा पूर्ण पुण्यविवेकी ॥
कधीं न सांपडे अवलोकीं । पुण्यपाप मिश्र असे ॥३९॥

सर्वभूतहित इच्छावें । शक्य असे तें करीत जावें ॥
असल्या भक्ता मी स्वभावें । इहपर प्रेमें रक्षितों ॥४०॥

सामदामदंडभेदानें । लोकसंग्रह चालविणें ॥
हीच अहिंसा पुण्य गणणें । या उलट ती हिंसा पापी ॥४१॥

सदा पुण्यवंत मार्गानें । राज्याधिकार सांभाळणें ॥
अंतरीं उदास रहाणें । मजवर ठेव दृढ भाव ॥४२॥

मी तुला विजय देईन । अंतर्बाह्य नित्य रक्षीन ॥
झालें आहे तुजला ज्ञान । ब्रह्ममय बनसी जा ॥४३॥

हें ऐकून अलर्क म्हणे । श्रीगुरो विनंती ऐकणें ॥
मला राज्यादिक भोगणें । आतां नको मुळींच ॥४४॥

कृपेनें आत्मरूप दाविलें । तेथें माझें मन वेधलें ॥
तसेंच रहाणें आवडलें । कृपा करावी दयाळा ॥४५॥

मग त्याला दत्त वदती । बा रे अलर्का अैक रीती ॥
माझ्या स्मरणें तशी स्थिति । प्रेमळ चित्तें मिळतसे ॥४६॥

एकनिष्ठ भक्तीचा पंथ । श्रेष्ठ असे लोकां गृहस्थ ॥
असंग स्थितींत तूं स्थित । दुसरा मार्ग सांगतों ॥४७॥

यम नियम आसन । प्राणायाम आंवरी मन ॥
प्रत्याहार धारणाध्यान । समाधि अष्टांग योग हा ॥४८॥

षडंग सप्तांग अष्टांग । या नांवाचा हा हठयोग ॥
साधून आनंद अभंग । शांत सेवीत असावें ॥४९॥

आत्मरुपीं वा इष्टदेवीं । चंचलमन स्थिर ठेवीं ॥
त्याशीं एकाग्रता करावी । ध्यान सिद्ध होय तें ॥५०॥

ध्याता ध्येय एकरूप । हेंच समाधीचें स्वरूप ॥
होत असे स्वानंदरूप । अष्टांग योग हा असे ॥५१॥

यासाठीं तूं अलर्का आतां । ठेवून सदा निरिच्छता ॥
अंतरीं गर्व न धरितां । माझीच भक्ति करावी ॥५२॥

प्रेमें माझें ध्यान करावें । मजसी एकरूप व्हावें ॥
नंतर मी तुला स्वभावें । निर्गुण ब्रम्हीं मिळवीन ॥५३॥

असें करितां योगसाधन । नाना प्रकारें येई विघ्न ॥
परी सर्वथा माझें ध्यान । सोडूं नकोच मुळींच ॥५४॥

जर सिद्धींना भुलशील । तर तूं सत्य फसशील ॥
अधोगतीस मग जाशील । सावध पूर्ण असावें ॥५५॥

हा योग असे मना दंड । मौन म्हणजे वाणीस दंड ॥
निरिच्छता हा देहदंड । यांना विसरूं तूं नको ॥५६॥

अणिमा महिमा लघिमा । गरिमा प्राप्ति प्राकाम्या ॥
ईश्वरता ही सप्तमा । वश्यता मिळून अष्टसिद्धि ॥५७॥

अति सूक्ष्म रूप धरणें । मोठ्याहूनही पूज्य होणें ॥
हलकें होणें जड होणें । इच्छिलेलें सर्व मिळे ॥५८॥

इष्ट तें व्यापून टाकणें । सृष्टीवर सत्ता मिळणें ॥
कोणासही वश करणें । प्रति ईश्वरी हे गुण ॥५९॥

आणखीही सांगतों तुला । हवा वस्तु संग्रह चांगला ॥
विद्या किर्ति लाभ भला । किमया जय राज्यप्राप्ति ॥६०॥

इष्ट स्थळीं व्हावें गमन । कवित्व कला कुशलपण ॥
दूरच्या ध्वनींचें श्रवण । सर्व भाषाही समजणें ॥६१॥

वगैरे विविध मनीषा । दुरविण्या योगी धरी आशा ॥
त्याच्या पुरती सर्व आशा । सिद्धिपाशा सांपडें तो ॥६२॥

देवादिक त्याला दिसती । त्याचे मनोरथ पुरविती ॥
मोहपाशीं त्याला पाडिती । आत्मसुखा विसरे तो ॥६३॥

जो अशा सिद्धींस भुलला । त्याला ईश्वर दूरावला ॥
आत्मज्ञान प्राप्त होण्याला । असमर्थ तो योगी ॥६४॥



म्हणून आशा न धरावी । माझ्याकडे सर्व लावावी ॥
मग त्या भक्ता दृढभावी । ब्रह्मरूपांत मिळवीन ॥६५॥

सिद्धिपाशाचा टाळून खड्डा । धरणें मम भक्तीचा अड्डा ॥
तेथेंच सर्व सुखाचा गड्डा । हेंचि सर्वसार असे ॥६६॥

म्हणून तूं अलर्क बाळा । माझ्यावर ठेव जिव्हाळा ॥
दूर लोटून सिद्धिचाळा । माझा लळा धर नित्य ॥६७॥

मग अलर्क करी नमन । सांगे जाहलें समाधान ॥
आज्ञेसमान मी वागेन । तव कृपें सवे जोडलों ॥६८॥

तुझा महिमा कोणी नेणे । तव आज्ञेनें आतां जाणे ॥
पुन्हां नमून कथी मागणें । दत्ता कृपा असावी हो ॥६९॥

अलर्क इतुकें सांगून । स्वराज्यांत करी गमन ॥
सुबाहूस सांगे वचन । घे तूं राज्य सुखानें ॥७०॥

काशीराजा विचारी त्यासी । तूं खरा क्षत्रिय अससी ॥
कां वरिलें भ्याडपणासी । अधर्म बोल टाकावा ॥७१॥

लढतां लढतां मरावें । स्वर्ग लोका निघून जावें ॥
जय होतां इथें भोगावें । राजैश्वर्य सुखानें ॥७२॥

येरू म्हणे कैंचा क्षत्रिय । मी तूं सदा आनंदमय ॥
सर्व आम्ही एक अद्वय । भेद बुडबुडे जिराले ॥७३॥

आत्म सुखांत मी रमत । श्री दत्तकृपें पूर्ण होत ॥
हा उपकार बंधू करीत । लौकिक दु:खें प्रेमानें ॥७४॥

आई बाप वनीं निघाले । सर्व राज्य मला दिधलें ॥
संकटीं वाचण्या पत्र ठेविलें । धन्य माता मदालसा ॥७५॥

लौकिक पराभव झाला । पत्र वाचून मार्ग धरला ॥
मातृकृपें आनंद झाला । श्री दत्तांना शरण गेलों ॥७६॥

हा पूर्वीचा अलर्क नाहीं । मुक्त झालों काल प्रवाहीं ॥
कर्मव्याप संपला पाहीं । चैतन्यपदीं निमालों ॥७७॥



सुबाहूही म्हणे त्यातें । मला राज्य नकोच होतें ॥
तुला द्यावया आनंदाते । अशी युक्ति योजिली मी ॥७८॥

माताकृपेनें आम्ही चार । बंधू जाहलों भवपार ॥
मदालसा करी अमर । माते नमन प्रेमभरें ॥७९॥

हा पाहून ब्रह्मसोहळा । काशीराजा थक्कच झाला ॥
तो म्हणे समजूत घाला । कांहींच मला नकळे हें ॥८०॥

अलर्क म्हणे सुबाहूस । तुझ्यासम बंधु विशेष ॥
भवसागराचा त्रास । चुकविला धन्य सत्य तूं ॥८१॥

आणून संकट लौकिक । नरदेहाचें हें सार्थक ॥
करविलें युद्ध सुरेख । बंधु सार्थ होसी तूं ॥८२॥

राजैश्वर्य सुखांत रूढ । रमत होतो महामूढ ॥
पण चैतन्यसुख गूढ । तवोपकारें मिळालें ॥८३॥

नशिबानें राज्य मिळालें । न्याय नीतीनें चालविलें ॥
योग्यवेळीं सार्थक झालें । माताकृपा श्रेष्ठ असे ॥८४॥

मिळविणें तें मिळविलें । अखंड अभेद सौख्य झालें ॥
दत्तगुरूंनीं ज्ञान दिधलें । आतां राज्य नको मला ॥८५॥

सुबाहु म्हणे अलर्कास । मला राज्य हवें कशास ॥
तूं गेलास ब्रह्मपदास । मी निघालों मम ठाया ॥८६॥

काशीराजासही सांगत । बंधूस व्हावें ज्ञान प्राप्त ॥
म्हणून तुझें साह्य घेत । आणि अलर्का जागविलें ॥८७॥

बंधू बनला ब्रह्मज्ञानी । आतां जातों मी स्वस्थानी ॥
काशीराजा लागे चरणीं । म्हणे मलाही सुखी करा ॥८८॥

अलर्कास राज्य देतसे । दोन्ही बंधूंना नमीतसे ॥
चरणांबुज धरीतसे । सांगे मला उद्धरावें ॥८९॥

मग सुबाहु सांगे त्यासी । आत्मज्ञान-विचारासी ॥
दृढभावानें ईश्वरासी । भजत रहा सर्वदा ॥९०॥

नंतर तूं होशील मुक्त । हें सांगतों वचन सत्य ॥
मनीं ठेवूं नकोच किंत । जा माघारा आनंदें ॥९१॥

नमून काशीराजा परतला । सुबाहु स्वठाया निघाला ॥
राज्याभिषेक स्वपुत्राला । करून अलर्क जात वनीं ॥९२॥

तेथें करून योगाभ्यास । समाधिस्थ रात्रंदिवस ॥
सेवीतसे ब्रह्म सुखास । असा कांहीं काल गेला ॥९३॥

मग नि:संग पृथ्वीवरी । आनंदानें भ्रमण करी ॥
देहकाल भरल्यावरी । काया टाकून मुक्त झाला ॥९४॥

राजा अनुभवी आत्मसुख । थोर त्याचें भाग्य सुरेख ॥
येतां लौकिक संकट दु:ख । अलर्क अमर जाहला ॥९५॥

दत्तभक्त अलर्क राजा । दत्तात्रेय सद्गुरु राजा ॥
सभक्त दत्त-चरणांबुजा । आमुचा प्रणिपात असो ॥९६॥

श्री दत्तात्रेय सर्वगुरु । आम्हांलाही अभय करू ॥
देतील सत्य खरोखरू । त्यांसी नमस्कार असो ॥९७॥

दत्तगुण गात रहावे । प्रेमें नित्य अचल भावें ॥
दत्त-गुरु मग स्वभावें । दृढ रक्षण करतील ॥९८॥

दत्तराज भक्तवत्सल । अलर्क आख्यान प्रेमळ ॥
दत्तलीला बहु रसाळ । शांतवी मना संतोषें ॥९९॥

श्री पुराण पुरुषोत्तम । श्री दत्तगुरु कल्पद्रुम ॥
पुरवी सदा भक्तकाम । अध्याय स्वीकारी चौदावा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय १५ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

श्री दत्तप्रभु दयाळ । त्याचा न कळे कोणा खेळ ॥
जे भाग्यवंत भक्त प्रेमळ । त्यांसह दत्ता नमन असो ॥१॥

काया-वाचा-मनाकडून । जे जे होतसे आचरण ॥
तें तें करावें समर्पण । श्री भगवंत-दत्तराया ॥२॥

इंद्रियें-बुद्धि-अहंकार । यांच्या कडून निरंतर ॥
घडे आणि स्वभावानुसार । घडतें तेंही दत्तार्पण ॥३॥

योजनाबद्ध ठरवून । किंवा अगतिक होऊन ॥
जें जें घडे आपणांकडून । तें तें अर्पावें दत्तराया ॥४॥

अेकनिष्ठ दत्तचिंतन । तेथें कसलें दुजेपण ॥
पण व्यवहार-वर्तन । धर्मशुद्ध नित्य करणें ॥५॥

अनन्यभावें दत्ता भजावें । दु:ख येतांही न सोडावें ॥
आळवून त्या प्रेमाभावें । भजावें दत्ता निरंतर ॥६॥

सुख-दु:खें जगीं असतीं । तीं एकमेकां न सोडिती ॥
म्हणून सदा दत्तभक्ति । अढळ प्रेमें करावी ॥७॥

जरी सुखाची दशा आली । तरी नसावा गर्व मुळीं ॥
परोपकारी सदा काळीं । शुद्ध मानसें करावा ॥८॥

जरी दु:ख-वेळ लागली । तरी हवी वृत्ती चांगली ॥
आळवावी दत्तमाऊली । त्यांत सत्य-सुख आहे ॥९॥

सुख-दु:ख समान मना । मानून स्मरावा दत्तराणा ॥
नम्र विनयें दत्तचरणा । आळवितां होई प्रसन्न ॥१०॥

वाटेल तसा प्रसंग ये । पण दत्ता सोडतां नये ॥
खरा विश्वास ठेवतां ये । अढळ सत्ता मनावर ॥११॥

मन लावून दत्तचरण । भक्तीनें स्मरावे अनन्य ॥
दीनवत्सल तो भगवान । श्रीदत्तगुरु धांवून ये ॥१२॥



ऋग्वेद यजुर्वेद सामवेद । दत्तप्रभूचें शाश्वतपद ॥
तसा चौथा अथर्ववेद । सवेद दत्ता नमन असो ॥१३॥

पृथ्वी केव्हां उत्पन्न झाली । आणि स्थित्यंतरें पावली ॥
तें जाणते दत्तमाऊली । त्यांना नमस्कार असो ॥१४॥

सर्व विश्वांत चैतन्यशक्ति । तीच दत्ताची सगुण मूर्ती ॥
उत्पत्ति वाढ लय स्थिती । करी अखंड दत्तमाया ॥१५॥

द्वैतांत पहावें अद्वैत । तोच दत्त श्री भगवंत ॥
अपरापर द्वैताद्वैत । तोच श्री दत्त परमात्मा ॥१६॥

एकदां शांडिल्य ऋषिवर । उदास बनती अपार ॥
आत्मज्ञानाविणें अंतर । शांत होईना म्हणून ॥१७॥

गुरु देतील आत्मज्ञान । त्यांसी जावे भावें शरण ॥
ही देवाज्ञा मनीं धरून । गेले अथर्व ऋषींकडे ॥१८॥

त्यांना आदरें नमस्कारून । म्हणती आपण अज्ञान ॥
ब्रह्मविद्या मला देऊन । सुखी करणें अक्षय ॥१९॥

जें गुप्तांत अत्यंत गुप्त । तें गुरु शिष्याला सांगत ॥
हें स्मरुन शरणागत । आर्जवें नम्र ते होती ॥२०॥

मग अथर्व प्रेमें द्रवले । भिऊं नको वचन वदले ॥
ब्रह्मविद्या सांगूं लागले । शिष्य शांडिल्य ऐकती ॥२१॥

प्राप्त व्हावया ब्रह्मज्ञान । उपाय भक्ति श्रद्धा ध्यान ॥
नरदेह-सार्थक पूर्ण । ज्ञान प्राप्तीनें होतसे ॥२२॥

बुद्धींच्या-पलीकडे ब्रह्म । म्हणून तें ज्ञानगम्य ॥
तेथें इंद्रियांचें नाहीं काम । निर्धार मनीं ठेवणें ॥२३॥

ब्रह्मा पासून हे जगत । निर्माण झालें घे लक्षांत ॥
याचें ज्ञान जरी लाभत । अन्य जाणणें न उरे पै ॥२४॥

तें सर्वव्यापी सर्वाधार । सर्व शक्तींचें धाम स्थिर ॥
एकरूपाचें निरंतर । ज्ञानमय सर्व साक्षी ॥२५॥

एकरूप सदा शाश्वत । म्हणून सत् नाम वदत ॥
सम निर्दोष सदोदित । बदलत नाहीं केव्हांही ॥२६॥

जगरूप हें अशाश्वत । नित्य वरवर बदलत ॥
म्हणून मिथ्या नाम देत । हीच माया ईश्वराची ॥२७॥

सागरीं लाटा उद्‌भवत । वाढून त्या जलीं विरत ॥
जलाविणें त्या कधीं नसत । यापरी विश्व हें नटे ॥२८॥

सर्वदा करी रूपांतर । जगांतील सुख अस्थिर ॥
सुखदुःखापासून दूर । शांति असते नेहमीं ॥२९॥

जगताचें आदिकारण । एकलें ब्रह्म हें तूं जाण ॥
तें विश्वास उत्पन्न करून । पोषी आणि संहारी ॥३०॥

असें असे जें आत्मतत्त्व । तेंच आपण आहों सत्य ॥
हेंच ज्ञान श्रीगुरु देत । वेदीं हेंच कथिलेंसे ॥३१॥

त्याचें साधन घे ऐकून । देहेंद्रियां विरक्तिपूर्ण ॥
आत्मरूपा आसक्ति जाण । यम नियम म्हण याला ॥३२॥

बाह्य सृष्टीपासून मन । अंतरीं वळवावें पूर्ण ॥
त्याला म्हणती स्थिर आसन । साधून प्राणायाम कर ॥३३॥

सपाट जागा योगा घ्यावी । तेथें गडबड नसावी ॥
दर्भादि आसनें बरवीं । त्यांवर निश्चिंत बसावें ॥३४॥

शरीर शीर्ष समरेषेंत । दृष्टि लावावी भ्रूमध्यांत ॥
निरोध करावा सतत । प्राणापान वायूंचा ॥३५॥

प्राणायामाचे प्रकार तीन । वारा मात्रा लघुप्रमाण ॥
चोवीस मात्रा मध्यम जाण । उत्तम छत्तीस मात्रांचा ॥३६॥

लघूनें येतसे घाम । करीतसे कंप मध्यम ॥
ने ब्रह्मरंध्रीं तो उत्तम । प्राणायाम समजावा ॥३७॥

पूरक तो आंत घेणें । कुंभक तो आंत ठेवणें ॥
रेचक बोहेर सोडणें । अभ्यास सावध करावा ॥३८॥



आंत घेण्या जितका वेळ । त्याच्या चौपट कुंभककाळ ॥
पूरकाच्या दुप्पट वेळ । रेचक संथ करावा ॥३९॥

प्राणायाम साधल्यावरी । मन ताब्यांत ये सत्वरीं ॥
कफादिदोष होती दूरी । शरीररक्षण करी तो ॥४०॥

आवडो आत्मतत्त्व ग्रहण । तेथें करावें स्थिरमन ॥
अन्य टाकणें हें तूं जाण । पूरक कुंभक रेचक ॥४१॥

करणें प्राणायाम वाढ । विषयां पासून इंद्रियें काढ ॥
हाच प्रत्याहार दृढ । मन लावणें आत्म्याशीं ॥४२॥

हें उत्तम साधल्यावरी । धारणेला प्रारंभ करीं ॥
आत्म्यांत मन स्थिर धरीं । मग साधेल धारणा ॥४३॥

मीच आत्मा असें चिंतन । करितां ध्यान चित्पावन ॥
ब्रह्ममय वृत्ति बनुन । समाधि पूर्ण होतसे ॥४४॥

जीव शिवांत ऐक्य पावून । नरजन्मसार्थक पूर्ण ॥
नरदेह उत्तम साधन । जाण शांडिल्या निश्चयें ॥४५॥

ईश्वरें नरदेह योग्य । दिला होण्या चैतन्यमय ॥
तरी करतसा उपाय । सच्चिदानंदत्व लाधसी ॥४६॥

उद्धरण्यासी सर्व जन । ब्रह्म साकारलें पूर्ण ॥
श्री दत्तगुरु भगवान । भक्तांस नित्य तारिती ॥४७॥

गुरुदत्त असे दयाळ । दत्तकथा बहु रसाळ ॥
भाव धरावा लडिवाळ । दत्तगुण गावे सदा ॥४८॥

मग होईल एकाग्रता । दत्त प्रभूस भक्तचिंता ॥
ते निवारिती भवव्यथा । ब्रह्ममय करतीलच ॥४९॥

शांडिल्य ऋषी हें ऐकून । करिती अथर्वास नमन ॥
त्यांच्या उपदेशास मान । शरण गेले दत्तपदीं ॥५०॥

श्री दत्तात्रेय सद्‌गुरु । आपुला देती कृपाकरु ॥
शांडिल्य ऋषीस भवपारू । करिती अत्यंत प्रेमानें ॥५१॥



विविध रूपें नानाकाळीं । दत्त धरिती महाभलीं ॥
उद्धरिती भक्तमंडळी । अनुभव नित्य येतसे ॥५२॥

त्या दत्तांना नमन असो । त्यांची सेवा सदा गवसो ॥
त्यांच्या पदींच भाव वसो । सदा निर्मळ भक्तीनें ॥५३॥

त्यांनीं आम्हां कृपा करोनी । घ्यावें अक्षय सुधारोनी ॥
त्यांस जोडून दोन्ही पाणी । हेंच प्रेमें प्रार्थितसें ॥५४॥

भक्तांस दत्त देतसे धीर । अधार्मिकां क्षोभवी फार ॥
भक्तकीर्ती वाढवी अपार । संतसज्जनां तो सुखवी ॥५५॥

अशा सद्‌गुरु दत्तात्रेया । पावगा देव गुरुराया ॥
तुझ्या सत्तेची नरदेह काया । तवपदीं प्रेमें स्थिर असो ॥५६॥

स्वायंभुव मन्वंतरापासून । विश्वांत फेरफार महान ॥
सर्व सृष्टीस सूक्ष्म कारण । हिरण्य गर्भा नमन असो ॥५७॥

हिमप्रलय जलप्रलय । घडवून आणी आदित्य सूर्य ॥
संकर्षणशक्ति अद्वय । आदित्यमंडळीं सर्वदा ॥५८॥

मणिमय सर्व विश्वांत । हीच शक्ति कार्ये करीत ॥
द्वैतांतून अद्वैत येत । अनुभवास ज्ञानियांच्या ॥५९॥

चैतन्यानें विश्व भरलें । तेथें काय असे निराळें ॥
मीतूंपण हें हरपले । एकच दत्त परमात्मा ॥६०॥

दत्तमुनींचे अवतार । झाले असती होणार ॥
भक्तां देऊन कृपाकर । चैतन्यमय सदा करिती ॥६१॥

त्याची जाणीव ऋषिमुनींस । तशी सद्भक्त मंडळींस ॥
त्या सर्वांसह श्रीदत्तांस । नमस्कार नित्य असो ॥६२॥

केवळ भारत देशांत । वैदिक परंपरा दिसत ॥
परंतु सर्व जगीं असत । पूर्वीं नांदत ही प्रथा ॥६३॥

मन समाधींत मग्न । तेथें स्फुरे वैदिक ज्ञान ॥
कोण्या युगीं कसें निर्माण । झालें नकळे सर्वदा ॥६४॥

वैदिक ज्ञानाची संपत्ति । असलेले ऋषि गुप्त होती ॥
परी द्रष्टें ऋषि पहाती । आणि शिकविती पुन्हां ते ॥६५॥

विपुल वैदिक वाङ्.मय । अंतरिक्षांत विरून जाय ॥
ज्ञानी मुनी व्यास सदय । त्यांतील कांहीं संग्रहिती ॥६६॥

चार प्रकारें वर्गीकरण । करून करिती अध्यापन ॥
चार वेदांत सर्वज्ञान । वेदव्यास सांठविती ॥६७॥

अनंत वेदज्ञान असे । पण सहसा तें न गवसे ॥
ऋषिगण दत्तां नमीतसे । त्यांना नमन सर्वांसह ॥६८॥

अनसूयेची प्रिय भगिनी । शांति अथर्वऋषिकामिनी ॥
दत्तप्रेमळ महामुनी । भक्तांस प्रेमें तारिती ॥६९॥

ऋषिमुनी तपी संन्यासी । सर्व नम्र दत्त पदांसी ॥
दयेची राशी सद्भक्तांसी । श्रीगुरुदत्त अखंड ॥७०॥

सर्व असे चैतन्यमय । बरे वाईट शब्द द्वय ॥
विरती जेथें तें अक्षय । परमात्मरूप दत्ताचें ॥७१॥

जो जो ज्ञानाधिकारी झाला । तो तो दत्तभक्त चांगला ॥
दत्त देती त्यास चित्कळा । आणि नेती ब्रह्मपदीं ॥७२॥

दत्त नेहमीं अवधूत । सदा करिती भक्तहित ॥
आत्मसाक्षात्कारी संत । दत्तस्वरूप पावती ॥७३॥

जें नाहीं तें असत नाहीं । जें आहे तें सर्वदा राही ॥
कालासमान रूप घेई । ब्रह्ममाया एक नित्य ॥७४॥

स्वायंभुवविधीचा सुत । त्यास सद्गुणी दोन सुत ॥
उत्तानपद प्रियव्रत । पुरातनश्रेष्ठ भूपति ॥७५॥

उत्तानपादासी दोन कांता । सुनीती आदर्श पतिव्रता ॥
सुरुचीवर प्रसन्नता । राजयाची जास्त असे ॥७६॥

सुनीतीचा ध्रुव बालक । जरी वाटला योग्य सुरेख ॥
तरी नृपास आवडे लेक । सुरुचीचाच उत्तम ॥७७॥



मनास नावडे सुनीती । सुरुचि-सुखें आवडती ॥
तेणें मिळते अधोगती । सुनीती करी कल्याण ॥७८॥

सुरुचि-संगतींत मग्न । राजा करी ध्रुवापमान ॥
सुरुचि सांगे मम नंदन । झाल्यास कौतुक भूप करी ॥७९॥

राजाकडून अपमान । त्यांत सुरुचीचे वाग्बाण ॥
गेला तडक तो निघून । आणि मातेस कवटाळी ॥८०॥

स्फुंदस्फुंदून वर्तमान । ध्रुव कथी मातेकारण ॥
सुनीती म्हणे श्रीभगवान । भलें करील रडूं नकोस ॥८१॥

ध्रुव म्हणे दाखव देव । माता म्हणे तो वनीं सदैव ॥
ध्रुवाचा जडला देवीं भाव । देवदर्शना जात वनीं ॥८२॥

राव पावला पश्चात्ताप । म्हणे ध्रुवा हा पापी बाप ॥
फीर मागें टाक संताप । सर्व राज्यही घे तुला ॥८३॥

ध्रुव म्हणे जगज्जनक । करील माझें कोडकौतुक ॥
तो देईल अढळ भाक । त्यासी भेटण्या जातों मी ॥८४॥

राजाचा उपाय हरला । सुनीतीनें वागूं लागला ॥
देवें नारदा पाठविला । उपदेश देण्या ध्रुवाला ॥८५॥

नारद सांगती ध्रुवबाळा । जगीं एकच देव भरला ॥
त्या भगवंत वासुदेवाला । भक्तीनें नमस्कार कर ॥८६॥

पांच वर्षांचा ध्रुव बाळ । दिव्यत्वाची त्या तळमळ ॥
श्रीनारायण भक्तवत्सल । प्रसन्न झाले ध्रुव बाळा ॥८७॥

सुनीतीचा मुलगा कृश । वनीं पावला फार क्लेश ॥
भगवंताचा शंखस्पर्श । उत्तेजित त्याला करी ॥८८॥

ध्रुवानें केली विनवणी । अपमान न करी कोणी ॥
ठेव मला अशा ठिकाणीं । दीन दयाळा भगवंता ॥८९॥

वासुदेव वदती वाणी । सुनीती बाळ सदा चरणीं ॥
राज्य भोगून तारांगणीं । अढळ राहील माझ्याकडे ॥९०॥



विष्णूचा प्रेमळ आशीर्वाद । ऐकून ध्रुवाला दिव्यानंद ॥
जोडी पाणी, परमानंद । ओसंडला ध्रुव देहीं ॥९१॥

भगवंताचें आशीर्वचन । घेऊन राज्यीं आगमन ॥
करितां सुखावती जन । उत्तानपादही आनंदला ॥९२॥

समारंभ झाला बहुत । सुनीती माता भाग्यवंत ॥
राजकुटुंब संतोषयुक्त । वागे धर्माप्रमाणें ॥९३॥

मग ध्रुवही यथाकाळीं । राज्य चालवी धर्मबळी ॥
अढळस्थान ध्रुवमंडळीं । विष्णुपदीं तो पावला ॥९४॥

सुनीतीचा मार्ग चांगला । दृढ प्रेमें धरावा भला ॥
तोच संसारांत तरला । अंतींही पावे सद्गति ॥९५॥

सुनीतीपंथ कष्टकर । पण अक्षय कल्याणकर ॥
ध्रुव नारायणास कर । जोडुया अचल श्रद्धेनें ॥९६॥

जगीं एक देव दयाळ । तोच विष्णु प्रेमळ ॥
त्याचा जगीं चाले खेळ । नमस्कार त्यास असो ॥९७॥

संसारांत सुख होण्यास । आणि जाण्या मोक्षपदास ॥
गावी ध्रुव कथा सुरस । सौख्य इहपर होतसे ॥९८॥

अनंत लीला आजपर्यंत । करून ठेवी श्री भगवंत ॥
त्याच्या कथा त्याला कळत । इतरीं प्राणिपात करावा ॥९९॥

ब्रह्मानंदीं वसे श्री दत्त । करावयास भक्तहित ॥
स्वीकारी श्रीगुरुदेव दत्त । कृपें अध्याय पंधरावा ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय १६ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:।।

स्वायंभुव मनूचा सुत । प्रियव्रत महाबळवंत ।।
पराक्रमी व देवभक्त । सात भागांत भू वांटी ।।१।।

नदी समुद्र पर्वत । स्वाभाविक सीमा ठरवीत ।।
सात पुत्रां वांटून देत । सप्तद्वीपा वसुंधरा ।।२।।

जंबुद्वीप आग्नीध्रास । प्लक्ष क्रौंच पुष्कर कुश ।।
शाक शाल्मल इतरांस । प्रियवत राजा देतसे ।।३।।

मंडोद शुद्ध इक्षु क्षार । रस मधु क्षीरसमुद्र ।।
सप्तद्वीपें सप्तसागर । तेव्हां असती भूवरी ।।४।।

ध्रुवाचें तप सहामास । ध्रुवप्रदेशीं सूर्यप्रकाश ।।
अखंड मिळे सहामास । स्पष्ट गूढ अर्थही ।।५।।

त्याकाळीं उत्तर पृथ्वीवर । मनुष्य सुखी निरंतर ।।
ध्रुव प्रदेशाखालीं सुंदर । सूर्य मार्ग सत्य दिसती ।।६।।

सात महिने सात सूर्य । नांवें सांगती ऋषिवर्य ।।
पण एकच दिसे सूर्य । अन्वर्थक सात नांवें ।।७।।

पांच मास सूर्य न दिसे । सात मासांत सूर्य दिसे ।।
त्यांत मध्यें अखंड दिसे । त्र्याहात्तर पूर्ण दिवस ।।८।।

पांच मासां-नंतर । दक्षिणे दिसेदिनकर ।।
पूर्व पश्चिम फिरे  भास्कर । वर्तुलाकार सप्तमार्ग ।।९।।

पांच मासांत उषा सुंदर । बहु दिवस निरंतर ।।
तिचें वर्णन मनोहर । ऋषिवर्य गाती प्रेमानें ।।१०।।

सात मासांत रवग भास्कर । अस्त उदयांत रोज अंतर ।।
फार थोडे म्हणून सुंदर । नभीं सूर्य-मार्ग दिसती ।।११।।

सात परिधि त्यांना म्हणती । अेकावर अेक असती ।।
वर्तुळांत वर्तुळें दिसती । वर्तुळाकार सप्तमार्ग ।।१२।।



चौदा पक्ष सात मासांत । प्रथम परिधि एक चौदांत ।।
द्वितीय परिधि दोन तेरांत । असे मार्ग हे जाणावे ।।१३।।

फार मोठें विषुववृत्त । अति लहान ध्रुववृत्त ।।
उत्तरोत्तर लहान होत । विषुववृत्तापासून पृथ्वी ।।१४।।

त्यामुळें शीत भागालगत । पश्चिमेस भास्करअस्त ।।
होऊन, लगेच पूर्वे दिसत । सात मासांत सूर्य नभीं ।।१५।।

सकाळच्या सूर्यप्रकाशांत । आरोग्याचे किरण जास्त ।।
तोच विचार शीत देशांत । सप्तमासांत आरंभीं ।।१६।।

प्रथम मासांत आरोग्य सूर्य । दुसरा तेजस्वी भ्राजसूर्य ।।
तिसऱ्या मासीं पटर सूर्य । पटरा-समान धोटा असे ।।१७।।

वस्त्रीं विणतां आडवें सूत । डावा उजवा धोटा फिरत ।।
तसा सूर्य तृतीय मासांत । दिसे म्हणून पटर तो ।।१८।।

त्र्याहात्तर दिवसांमधील । चतुर्थ मासीं फार तेजाळ ।।
सूर्य उंच अखंड उज्वल । म्हणून पतंग त्या म्हणती ।।१९।।

पंचम मासीं जणु सुवर्ण । सूर्याचे प्रदीप्त किरण ।।
दिसतो म्हणून सूर्य स्वर्ण । मग पर्जन्य पडे तेथें ।।२०।।

त्या दिवसांत दिव्यासमान । दिसे सूर्य नांव म्हणून ।।
षष्ठ मासीं ज्योतिषीमान । ऋषिवर त्याला ठेविती ।।२१।।

हळूहळू सौम्य किरण । सातव्या मासीं होती म्हणून ।।
विभास सूर्य सर्वां नमन । आमचें असो सद्भावें ।।२२।।

तीन ऋतु तेथें असत । वसंत ग्रीष्म आणि शरद ।।
यज्ञानें यज्ञदेव करीत । यज्ञरूपकें ऋषि गाती ।।२३।।

पूर्व देव साध्य असती । सुखी वैदिक संस्कृती ।।
पहिले धर्म ऋषि सांगती । त्या सर्वांना नमन असो ।।२४।।

तत्त्व ज्ञान सत्य सुंदर । सूर्य-दृष्टांत मनोहर ।।
तमाच्या पलीकडे दूर । पुरुष मोठा रहातसे ।।२५।।



आदित्य वर्णाचा तो पुरुष । सर्वांना चैतन्य विशेष ।।
देऊन जगीं सौख्य हर्ष । नांदवी त्याला नमन असो ।।२६।।

अयन मार्ग हा शाश्वत । त्या शिवाय मार्ग नसत ।।
हें जाणून विद्वान होत । अमृत लाधे गुरुकृपें ।।२७।।

उत्तर ध्रुवा खालील देश । आजही पटवी साक्ष विशेष ।।
वाचून वैदिक वर्णनास । मन भारावे अत्यादरें ।।२८।।

उत्तरेस नव्वद अंश । तो जाणावा ध्रुव प्रदेश ।।
त्याच्या खालचा जो प्रदेश । सत्तर अंशां जवळचा ।।२९।।

तेथें पूर्वी उष्णतामान । आतां पेक्षां जास्त म्हणून ।।
मनुष्य वस्ती तेथ होऊन । सौख्य भोगी निरंतर ।।३०।।

पृथ्वी सूर्याभोवतीं फिरत । पूर्वी जेथें विषुववृत्त ।।
पृथ्वीवरच्या या भागांत । आतां कांहीं बदल दिसे ।।३१।।

सहस्त्र सहस्त्र वर्षांत । थोडा थोडा फरक होत ।।
परंतु संशोधन-कार्यांत । त्यामुळें लाभे चेतना ।।३२।।

भू भाग, नद्या सागर । लोपल्यानें विसरे नर ।।
नवीन रचना पृथ्वीवर । सदाकाळ चालतसे ।।३३।।

उत्तर ध्रुवाखालील देश । स्वायंभुव मनु  प्रदेश ।।
तेथून पुढें खालीं प्रवेश । झाला असें स्पष्ट दिसे ।।३४।।

मरीचि अत्रि अंगिरस । पुलस्त्य पुलह ऋतु वसिष्ठ ।।
सप्त ऋषि जाहले श्रेष्ठ । सृष्टिकर्ता ब्रह्मदेव ।।३५।।

त्यांचें व्हावें सदा स्मरण । म्हणून आकाशीं त्यांना स्थान ।।
नक्षत्रांना नामाभिधान । ठेवून दिलें आदरें ।।३६।।

सात तारका आकाशांत । त्यांना सप्तर्षि म्हणत ।।
त्या खालीं भूप्रदेशांत । वस्ती तेव्हां चालू असे ।।३७।।

पृथ्वी पाण्यांत आदियुगांत । वराह पृथ्वीस वर काढीत ।।
स्वायंभुव मनूस देत । राज्य करण्या भगवान ।।३८।।

सत्तर अक्षांश प्रदेशांत । सात मास सूर्य दिसत ॥
त्याचे खालच्या प्रदेशांत । दहा मास सूर्य दिसे ॥३९॥

या उत्तर पृथ्वीवर । उषा संध्यांचा काल फार ॥
म्हणून तेथें निरंतर । अस्त बुध ग्रहाचा ॥४०॥

चंद्रमा उभा दक्षिणेस । मंगळ गुरु शनिग्रहांस ॥
लोक पहाती पण शुक्रास । तेथें तेजत्व दिसेना ॥४१॥

रोहिणी तारा गुरुवर । तेथून दिसे मनोहर ॥
जोडा शोभे म्हणती नर । गुरूची पत्नी रोहिणी ॥४२॥

पुढें अयन प्रदेशांत । चंद्रपिधान तारे दिसंत ॥
बुध ग्रहही स्पष्ट नभांत । चंद्रपुत्र बुध झाला ॥४३॥

चंद्र पृथ्वी भोवतीं फिरे । पृथ्वी सूर्याभोंवती फिरे ॥
सूर्यशक्तीनें पृथ्वी कसरे । सूर्य करी संकर्षण ॥४४॥

उत्तरायण दक्षिणायन । यांचे आरंभ व मध्यदिन ॥
चार दिशांचे चार दिन । महत्त्वाचे नित्य असती ॥४५॥

उत्तरायण मध्य वसंत । दक्षिणायन मध्य शरद ॥
विषुवृत्तावर संपात । होती सहा महिन्यांनीं ॥४६॥

अयन मध्य एक नाभि । अयनारंभ दोन नाभि ॥
मिळून पृथ्वीच्या तीन नाभि । यांत भ्रमण पृथ्वीचें ॥४७॥

त्रिनाभीच्या प्रदेशांत । कश्यप सृष्टी पूर्वी घडत ॥
कश्यप हा मरीचिसुत । वंशविस्तार बहु याचा ॥४८॥

अत्रिपुत्र राजा सोम । नाभिकमळीं त्याचा भ्रम ॥
ब्रह्मदेवास चंद्र नाम । उत्पत्तीस कारण सदा ॥४९॥

स्वारोचिष अग्निकुमर । त्याचें दुसरें मन्वंतर ॥
त्यांत श्रीदत्त योगेश्वर । सप्तर्षींत कार्यरत ॥५०॥

ऊर्ज स्तंभ प्राण अत्रि । अंगिरापुत्र बृहस्पति ॥
भृगूपुत्र च्यवन असती । त्या मनूंत सप्तर्षि ॥५१॥



ध्रुवप्रदेशापासून । खालीं खालीं दिसे वसंत ॥
विश्वमित्र ऋषि महान । चालू मन्वंतरीं असे ॥५२॥

त्याची प्रतिसृष्टि वसत । त्रिशंकू तारे तेथून येत ॥
डोक्यावर त्या प्रदेशांत । दक्षिणार्धांत पृथ्वीच्या ॥५३॥

पूर्वीपासून आजवर । दत्तलीला असंख्य फार ॥
ते फिरती सर्व भूवर । सर्वांसह नमन त्यांना ॥५४॥

प्रतापी भूप प्रियव्रत । स्वरूपांत होतसे रत ॥
स्वायंभुववंश वाढत । विधि संतुष्ट होतसे ॥५५॥

एका पत्नीपासून त्यास । पुत्र आग्नीध्रादि दक्ष ॥
त्यांतील तीन परमहंस । सप्तपुत्र राजे होती ॥५६॥

दुसऱ्या पत्नीपासून सुत । उत्तम तामस रैवत ॥
ते क्रमानें मनु होत । तृतीय चतुर्थ पंचम ॥५७॥

प्रियवतकन्या उर्जस्वती । भृगुपुत्र भार्गव वरिती ॥
त्यांची कन्या बहु आवडती । देवयानी प्रसिद्ध जी ॥५८॥

थोर राजा ध्रुववंशांत । चक्षुचाक्षुष पुढें जन्मत ॥
सहावा मनु चाक्षुष होत । सहा मन्वंतरां नमन ॥५९॥

विषुववृत्ताखालीं जवळ । येतां आरोग सूर्य तेजाळ ॥
लोक उत्तर ध्रुवाखालील । प्रथम स्पष्ट पाहती ॥६०॥

आरोग भास्करापासून । उत्तरेस वसती जन ॥
सात सागर सीमा ठरून । सप्तद्वीपें बनविलीं ॥६१॥

प्रियव्रत भाग करीत । क्षारोदाने परिवेष्टित ॥
त्याला जंबुद्वीप म्हणत । आग्नीध्र राजा त्यावरी ॥६२॥

इक्षुरसपूर्ण प्लक्ष द्वीप । सुरोदधींत शाल्मली द्वीप ॥
घृत सागरांत कुश द्वीप । क्रौंच क्षीरसमुद्रीं ॥६३॥

दधिमंडवेष्टित शाक । पुष्करा वेष्टी शुद्धोदक ॥
बर्फाखालीं असे उदक । क्षीर सागर जाणावा ॥६४॥



बर्फवृष्टीं दधिमंडसागर । बर्फ दाटे तो घृत सागर ॥
गोड पाण्याचा इक्षुसागर । यापरी ते जाणावे ॥६५॥

ईश्वरानें विश्व निर्मिलें । मध्यें भूलोका ठेविलें ॥
या खालीं सप्त पातळें । भूवरती सहा लोक ॥६६॥

ऊर्ध्व लोकीं इंद्रादि देव । पाताळांत नाग दानव ॥
भूवर वस्ती मानव । चौदा भुवनें ब्रह्मांडीं ॥६७॥

ग्रहादि नक्षत्र मंडल । हें ब्रह्मांड सुमंगल ॥
परमेशाचें रूप विमल । विलसे नित्य चिदंशें ॥६८॥

ईश्वरा स्मरून भावें । हें सर्व सुमनें शोधावें ॥
चिंतनें देवा संतोषवावे । मग तो नेई स्वरूपीं ॥६९॥

सर्व जग ईश्वरें केलें । तोच चालवी त्यासी स्वबळें ॥
म्हणून देवा भजा भलें । मुख्य मर्म हें असे ॥७०॥

मणिद्वीप दिसे आकाश । सर्वांत चिन्मय-प्रकाश ॥
चिदंशांत आत्मसंतोष । सर्वात्मका नमन असो ॥७१॥

सर्व भाव ईश्वरावरी । घाला सदा दृढ निर्धारीं ॥
एकदम न साधेल जरी । तरी श्रद्धा न सोडणें ॥७२॥

यत्नें हळुं हळुं वागावें । देव-साह्य मागत जावें ॥
मग तो नेतसे स्वभावें । सन्मार्गानें स्वदासाला ॥७३॥

जी जी कांहीं विद्या गवसे । सर्वहिता ती योजा हर्षे ॥
स्मरोनियां शुद्ध मानसें । परमेशा सदाकाळीं ॥७४॥

अधर्मा बगल देऊन । प्रतिकारही योग्य करून ॥
संकटकाळीं संरक्षण । शक्य तें अवश्य करावें ॥७५॥

पराचें कराया धजन । विनोदेही न करा चिंतन ॥
सर्वांचें कल्याण इच्छून । गुप्त प्रकट वागावें ॥७६॥

ईशस्मरण श्रद्धापूर्वक । भक्तीनें करावें आंतरिक ॥
मग तो देई जसा विवेक । तसे लौकिकीं वागावें ॥७७॥

स्वार्थ-निरपेक्ष परहित । बुद्धीनें वर्तावें सतत ॥
परमेश-चिंतनें नित्य । प्राप्त सन्मार्गे चालावें ॥७८॥

हेचिं सर्व सद्धर्मसार । ईशगुण वर्णावे फार ॥
ईश-प्रेमानंद अपार । सर्वात्मका नमन असो ॥७९॥

मरीची ब्रह्मदेवाचा सुत । त्याला पुत्र कश्यप होत ॥
अदिति भार्या कश्यपाप्रत । सूर्यपुत्रास जन्म दे ॥८०॥

पुराण-प्रसिद्ध सूर्यसुत । श्राद्धदेव मनु विख्यात ॥
त्याची कन्या इला असत । लाभे नरत्व पितृतपें ॥८१॥

त्याला प्रद्युम्न म्हणती । अेकदां गेला वनाप्रती ॥
त्याला शापी पूर्वी पार्वती । या वनीं नर होवो स्त्री ॥८२॥

उमा-शापाचा परिणाम । बने नारी इला पद्युम्न ॥
दैवगतीचा मनोरम । विलास चिंत्य पहावा ॥८३॥

सोमराजा अत्रिकुमर । पृथ्वी-भोवतीं निरंतर ॥
फिरतांना तो मनोहर । रोहिणीकडे दिसतसे ॥८४॥

त्यांच्या कृपें बुध जन्मत । अयन प्रदेशीं तो दिसत ॥
चंद्रमन गुरु-बुद्धींत । बुध बोध प्रकाशतो ॥८५॥

बुध भोगी प्रद्युम्न इलेसी । ती प्रसवे पुरूरव्यासी ॥
त्याची कांता अप्सरा उर्वशी । चंद्रवंश वर्धतसे ॥८६॥

दक्षकन्या सत्तावीस । झाल्या भार्या सोमराजास ॥
रोहिणी तारेच्या रम्य चंद्रास । क्षय-शाप अन्य देती ॥८७॥

करावया शापमोचन । चंद्र करी तप दारुण ॥
त्यास केलें बरें पावन । सोमनाथानें सौराष्ट्रीं ॥८८॥

चंद्र-पृथ्वी-स्थान आकाश । तसा भूवर चंद्रवंश ॥
प्रभास पत्तनीं उमेश । श्रीदत्तस्थान गिरनारीं ॥८९॥

निसर्ग-नियम सुंदर । जाणून घटना मनोहर ॥
अन्वर्थक वर्णिल्या फार । पुराणग्रंथीं लोकहिता ॥९०॥



त्याचा नाहीं एकच अर्थ । त्यांचे जाणून अन्वयार्थ ॥
प्रत्यक्ष आणि दिव्य अर्थ । पुराण कथा सांगती ॥९१॥

पुन्हां श्राद्धदेव मनूनें । नरत्व एक मास तपानें ॥
दिलें पुत्रा कृपाळु मनें । दुसरे मासीं स्त्रीत्व पुन्हां ॥९२॥

अशी इला प्रद्युम्न स्थिति । त्याही स्थितींत पुत्र होती ॥
ते उत्कलादि राजे होती । दक्षिणेस प्रतिष्ठानीं ॥९३॥

मनुश्राद्धदेवाप्रत । इक्ष्वाकू आदि पुत्र असत ॥
त्यांना सूर्यवंशी म्हणत । पुण्यवंत ते प्रतापी ॥९४॥

चालू मन्वंतर वैवस्वत । सूर्य चंद्रवंश प्रख्यात ॥
वर्णाश्रम-धर्म पाळीत । वैदिक संस्कृति धन्य असे ॥९५॥

त्यांचीं चरित्रें पुण्यकारक । वर्णिती कवि व्यास वाल्मीक ॥
तसे अन्य अधिकारी लोक । त्या सर्वांस नमन असो ॥९६॥

नियतीचा खेळ चालत । उत्पत्ति स्थिति नाश होत ॥
त्रिगुणी व त्रिगुणातीत । श्री दत्तांस नमन असो ॥९७॥

आपुल्या ज्या ज्या वासना । त्यांचीही धरून कामना ॥
श्रीदत्तपदीं दृढ प्रार्थना । अनन्यभावें करावी ॥९८॥

सकाम भक्तीनें एकाग्रमन । झालें तरीही दत्त प्रसन्न ॥
दुर्दैव जातसे वितळून । श्रीदत्त भक्ता रक्षिती ॥९९॥

नानाविध जुनी माहिती । षोडशाध्यायांत लिहविती ॥
अर्पण करितां हातीं घेती । भक्तहितार्थ श्रीदत्त ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय १७ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

उचै:श्रवा अश्वावर बसून । रेवेंत भास्कर-नंदन ॥
घ्यावया श्री विष्णूचें दर्शन । गमन करीं वैकुंठीं ॥१॥

लक्ष्मीसह श्री भगवंत । तेथें असती आनंदांत ॥
अश्वास पाहून श्रीचित्त । बंधुप्रेमें भारावलें ॥२॥

विष्णु लक्ष्मीस विचारिती । परी स्तब्ध कमला सती ॥
मग भगवंत शाप देती । घोडी हो तूं मृत्युलोकीं ॥३॥

लक्ष्मी आली शुद्धीवर । आणि प्रार्थी जोडून कर ॥
कोप करावा वल्लभा दूर । स्वल्पापराध क्षमा करा ॥४॥

विष्णु म्हणती मज समान । जेव्हां होई तुला नंदन ॥
तेव्हां येशी वैकुंठीं जाण । रमे चंचले भिऊं नको ॥५॥

लक्ष्मी अश्विनी होऊन । कालिंदी तमसा पुण्यस्थान ॥
तेथें राहून तपाचरण । करी एकाग्र मनानें ॥६॥

श्री विष्णु समाधींत मग्न । नित्य करिती शिवध्यान ॥
विष्णु प्रिया हें जाणून । गौरी-शंकरा भजतसे ॥७॥

भवानी-शंकर प्रसन्न । होऊन देती तिला दर्शन ॥
काय हेतु मनीं धरून । तपाचरण सांग म्हणती ॥८॥

लक्ष्मीस आला गहिंवर । आणि सांगे हवा कुमर ॥
म्हणून येथें लक्ष्मीवर । सत्वर यावे तव कृपें ॥९॥

महेश्वरें सकळ जाणून । दिलें लक्ष्मीस आशीर्वचन ॥
तुझी कामना सफल संपूर्ण । त्वरें होईल नको चिंता ॥१०॥

विसरसी परमेश्वरी ध्यान । म्हणून झालें शापवचन ॥
तरी राहून सावधान । नित्य लक्ष्मी वर्तावें ॥११॥

रमेस दिलें आश्वासन । शंकर पावले अंतर्धान ॥
वैकुंठीं दूत पाठवून । विष्णूस प्रेरणा ते करिती ॥१२॥

मनोहर अश्व होऊन । अश्विनीस विष्णुदर्शन ॥
परस्परांना आकर्षण । होऊन संगम जाहला ॥१३॥

लक्ष्मी झाली गर्भवती । सुंदर पुत्र प्रसवें ती ॥
मानवी तेजस्वी बालमूर्ती । विष्णु-अंशें जन्मली ॥१४॥

अश्विनी-रूप पालटलें । परी पुत्राचें प्रेम राहिलें ॥
वैकुंठीं जावया विमान आलें । रमेश म्हणती चलावें ॥१५॥

हें बालक इथेंच ठेवावें । तें होईल प्रतापी बरवें ॥
तूर्वसु राजास तें द्यावें । अशी योजना केली असे ॥१६॥

तो पुण्यवान भूपती । पुण्य क्षेत्रीं करून वस्ती ॥
रात्रंदिवस माझी भक्ती । पुत्रासाठीं करीतसे ॥१७॥

हें ऐकून लक्ष्मीदेवी । भगवंत-पदीं भाव ठेवी ॥
सोडून बाळ-चिंता बरवी । वैकुंठीं सेवी नारायणा ॥१८॥

तुर्वसूस आशीर्वचन । देई प्रसन्न नारायण ॥
आणि सांगे दिला नंदन । ममांश एक-वीर तुला ॥१९॥

कालिंदी-तमसा-संगम क्षेत्र । आहे भूलोकांत पवित्र ॥
तेथें जाऊन घ्यावा पुत्र । कल्याण तुझें असावें ॥२०॥

विष्णु पावले अंतर्धान । राजा हर्ष भरित होऊन ॥
जाऊन आणी पुत्ररत्न । राजा राणी सुखावली ॥२१॥

तुर्वसु राजा पुण्यवंत । संसारीं सौख्य भोगी सतत ॥
योग्य वेळीं पुत्रास तख्त । देऊन मुक्त होतसे ॥२२॥

अेकवीर सद्गुरुभक्त । त्या मंत्र श्री दत्त देत ॥
चिच्छक्तीनें ब्रह्मांड व्याप्त । तिची सिद्धी त्यास मिळे ॥२३॥

एक राजा यज्ञ करीत । त्याला अग्नि प्रसन्न होत ॥
आणि सुलक्षणी कन्या देत । एकावली भाग्यवती ॥२४॥

ती राजाची बहु आवडती । लेक लाडकी लाड अती ॥
उपवर झाली तिला प्रीती । वनीं विहार करावा ॥२५॥



राजा करी संरक्षण । संगें ठेवून रक्षक गण ॥
तिच्या जवळ सखीजन । वनीं जातसे प्रियबाळा ॥२६॥

मग तेथें संधि साधून । तालकेतु पाताळांतुन ॥
येऊन मारी रक्षकगण । आणि पळवी राजकन्या ॥२७॥

तिची सखी यशोवती । संकटीं योजीतसे युक्ती ॥
अेकावलीस नसे भीती । चतुर सखी असल्यानें ॥२८॥

तालकेतु करी समजून । अेकावली त्याला वदत ॥
एकवीर वर निश्चित । पुर्वींच मनीं केलासे ॥२९॥

राक्षस सांगे यशोवतीस । करीं मैत्रीण मला वश ॥
त्यांची व्यवस्था अेक बाजूस । राक्षस करी गुप्तस्थळीं ॥३०॥

सखी करी अनुष्ठान । तिला असती दत्त प्रसन्न ॥
त्यांचें तिला मंत्रवरदान । त्रैलोक्यतिलका कृपा करी ॥३१॥

देवीच्या सूचनेसमान । निघे गुप्त पातळांतून ॥
एकवीरास ती पाहून । दीन मुखें रूदन करी ॥३२॥

तो पुसे कां गे रडसी । ती सांगे वर्तमानासी ॥
आणि घेऊन जाई त्यासी । देवकृपेने पाताळीं ॥३३॥

तेथें होई प्रचंड संग्राम । तालकेतु वीर परम ॥
अेकावलीचें धरितां प्रेम । रणीं राक्षस निमाला ॥३४॥

अेकवीर अेकावलीस । सोडवून देई पित्यास ॥
विधियुक्त अेकवीरास । राजा कन्यादान करी ॥३५॥

एकावली एकवीर । तरती करून संसार ॥
यशोवती सखी चतुर । दत्तकृपेनें लाभली ॥३६॥

श्री दत्तात्रेय भगवान । सुख देई संकटें हरून ॥
दत्त सद्गुरु बोध करून । उद्धरी भक्तगणाला ॥३७॥

हें आख्यान संसारांत । सदा सुखदायी असत ॥
संकटांतून देवीदत्त । मुक्त करून सुख देती ॥३८॥



देवयानी ययाति । यांच्यावंशीं श्रीदत्तभक्ति ॥
पूर्वजांपासून ओघवती । सर्वा प्रेमें नमन असो ॥३९॥

एकवीर वंश हैहय । त्यांत भूपति कृतवीर्य ॥
यदुवंशांत भूप हैहय । असेंही वर्णन आढळतें ॥४०॥

पुराणांतील वर्तमान । जिवंत राहिलें मुखातून ॥
त्यामुळें कांहीं कांहीं भिन्न । वर्णन आढळे पूर्वींचें ॥४१॥

परंतु मुख्य वृत्तकथन । सत्य असतें त्याला धरून ॥
भाव ठेवावा मनापासून । तेथें दत्तकृपा करी ॥४२॥

कृतवीर्य राजा झुरत । नानाव्रतें भावें करीत ॥
व्हावा आपणां दिव्य सुत । हीच आशा मनीं असे ॥४३॥

शीलधरा राणी पुसे । मैत्रेयीला व्रत उत्तमसें ॥
ती दत्तव्रत सांगतसे । राजाराणी तें करिती ॥४४॥

व्रतें संतोषले श्रीदत्त । राणीला सांगती स्वप्नांत ॥
दिला तुला उत्तम सुत । जीवन्मुक्त सम्राट ॥४५॥

संतोषे शीलधरा राणी । पतीस सांगे दत्तवाणी ॥
कृतवीर्य दत्तचरणीं । नमन करी आनंदें ॥४६॥

राजाराणी दत्ता स्मरत । दत्तवाणी सफल होत ॥
सर्व लोकही उल्हासयुक्त । म्हणती कार्य साधलें ॥४७॥

गर्भवती राणी प्रसूत । होऊन पुत्रा जन्म देत ॥
राज्यामध्यें उत्सव होत । अर्जुन नाम ठेविलें ॥४८॥

देवादिकही संतोषती । आकाशीं दुंदुभी वाजती ॥
म्हणती विख्यात नृपती । सहस्रार्जुन हा होईल ॥४९॥

कार्तवीर्यार्जुन थोर झाला । तसा सुज्ञही महाभला ॥
कृतवीर्य कृतार्थ बनला । निजकालीं देह सोडी ॥५०॥

अर्जुना पौरजन म्हणती । राज्यसूत्र धरावें हातीं ॥
अर्जुन वदे लोकांप्रती । राज्यभार मला नको ॥५१॥

यथान्याय न वर्तणें । मग राजा नरकीं जाणें ॥
असलें राज्य स्वीकारणें । घडणार नाहीं लोकहो ॥५२॥

अर्जुन उत्तर ऐकून । गर्ग गुरूनें केला प्रश्न ॥
काय इच्छितें तुझें मन । नि:संकोचपणें सांगावें ॥५३॥

अर्जुन म्हणे मान्य गुरुजी । मी न्यायानें राज्य सहजीं ॥
करूं इच्छित मनामाजी । परंतु उपाय सुचेना ॥५४॥

तेव्हां गुरुजी त्या सांगत । असे श्रीगुरुदेवदत्त ॥
त्या भजूनि असा वर प्राप्त । करून घ्यावा आरंभीं ॥५५॥

सह्यपर्वतीं तो असत । तव इच्छेसम अमित ॥
तुला देईल शक्ति सत्य । चिंता चित्तीं नको धरूं ॥५६॥

दत्त असती फार गूढ । निष्ठा पाहती तुझी दृढ ॥
तसें वागावें भीती काढ । प्रसन्न करी दत्ताला ॥५७॥

दत्तप्रसादें तुझा जन्म । त्याचें तूं धरावे चरण ॥
त्यायोगेंच होशील धन्य । मम वचन ठेव मनी ॥५८॥

दत्त नाना वेष धरील । तुला भीती बहु वाटेल ॥
परी चित्तीं रहा निर्मळ । मग कार्य तुझें होई ॥५९॥

हें ऐकून गुरुवचन । भूपति कार्तवीर्यार्जुन ॥
दत्ताश्रमीं गेला निघून । सर्व राण्यास नमस्कारी ॥६०॥

श्रीगुरुदेवदत्ता पाहून । हर्षनिर्भर भूपमन ॥
यांचेंच दास्य प्रतिदिन । करावें असें चिंतीतसे ॥६१॥

दृढभावानें सेवा करी । दत्त निर्भत्सिती अपारी ॥
परी तें न मानी अंतरीं । शुद्ध प्रेमें स्तवीतसे ॥६२॥

दत्तगुरूचे पाय चुरी । फुलें आणून माळा करी ॥
इष्ट वस्तु अर्पण करी । निश्चियें करी दत्तभक्ति ॥६३॥

श्रीदत्तांचें उच्छिष्ट अन्न । राजा करी प्रेमें ग्रहण ॥
दत्त पाहती त्याचें मन । युक्ति योजिली नवलाची ॥६४॥



दत्तांच्या दृष्टिपातें करून । अर्जुन हात पडती गळून ॥
दत्त करिती राया कथन । आम्ही भ्रष्ट फार असों ॥६५॥

आमुचा तूं संग केला । म्हणून असें झालें तुला ॥
अजूनही नससी गेला । तर पोरा मरशील ॥६६॥

राजा म्हणे दत्ता समर्था । तुज जाणावया सर्वथा ॥
शक्य कोणां नसतां वृथा । कांहो गुरुजी करितां असें ॥६७॥

जो आपणासम असेल । त्याचीं परीक्षा घ्यावी सकळ ॥
मी आपूला अडाणी बाळ । ममता धरा गुरुवर्या ॥६८॥

आपण पूर्णरूपीं रत । कोणा नकळे तुमचा अंत ॥
लोकाचार तुम्हां नसत । भक्तवत्सला भगवंता ॥६९॥

दीन दयाळा प्रेमळ हस्त । दासावरी ठेवा सतत ॥
तव पायीं शरणागत । सांभाळ करा गुरुराया ॥७०॥

दत्त अनंत संतोषती । इष्ट तें सारें माग म्हणती ॥
प्रसन्न असें गेली भीती । प्रीतीनें बाळा सांगतों ॥७१॥

शुद्ध प्रेमाचे भक्तजन । मला आवडती पूर्ण ॥
त्यांचें करितों नित्य रक्षण । शासन होंतें इतरांना ॥७२॥

मग अर्जुन नम्र होत । सांगे इष्ट हेतू समस्त ॥
प्रजापालन मी इच्छीत । यथान्यायें करावया ॥७३॥

जे माझें स्मरण करिती । तेथें असावी माझी गती ॥
सर्व लोकांच्या मनोवृत्ती । मला समजाव्या सर्वदा ॥७४॥

माझें व्हावें सर्वत्र जाणें । ऐश्वर्य अपार मिळणें ॥
धर्मबुद्धि सदा असणें । सहस्त्र बाहु मला हवे ॥७५॥

द्रव्य-खंड कधीं नसावा । अतिथि लाभ सदा व्हावा ॥
मम स्मरणें नष्ट मिळावा । दृढ भक्ति तव चरणीं ॥७६॥

अधर्म-वर्तन घडेल । सुधारणा व्हावी प्रेमळ ॥
शत्रूंचा मी कर्दन काळ । नीती न्याय समजो मला ॥७७॥



योग्य काळीं मला मरण । मजपेक्षां जो कीर्तिमान ॥
समरांत त्याच्या हातून । यांवे, मिळो मुक्तिला ॥७८॥

असें मागे भक्त अर्जुन । दत्त देतसे वरदान ॥
सप्तद्वीप राज्य देऊन । सुखी बनविती राजाला ॥७९॥

मग दत्त महाराजांना । नमून माघारा फिरे राणा ॥
कुलगुरुसही नमना । करून सांगे सर्व कथा ॥८०॥

सुमुहूर्तीं राज्याभिषेक । त्याला करिती विप्र वैदिक ॥
अर्जुन राज्यभारवाहक । पौरजन सुखावले ॥८१॥

ग्रामपाल ते सेनापति । राज्यपाल अधिपति ॥
सर्व बने स्वयें नृपति । दत्त-प्रसादें अर्जुन ॥८२॥

जो त्याचें स्मरण करी । त्याचें तोच रक्षण करी ॥
सत्यासत्य कळे अंतरीं । धाक दुष्टांस जाहला ॥८३॥

सकळ कामें ठरवून । देतसे राजेंद्र अर्जुन ॥
तयापरी वागती प्रजाजन । कलह मुळांत खुंटले ॥८४॥

न्याय नीतीचें आचरण । करून सुखी प्रजाजन ॥
प्रत्येकाचें अंत:करण । धर्म-मार्गांत स्थिरावलें ॥८५॥

कांहीं अुद्भक्तां संकट । स्वत: भूप निवारी नीट ॥
कोण स्मरती त्याची वाट । राजाच पाही सर्वदा ॥८६॥

कोणास केव्हां दु:ख नसे । अवर्षण अतिवृष्टि नसे ॥
सृष्टिक्रमही उत्तमसे । सर्व जनता सुखावली ॥८७॥

राजा प्रतापी पुण्यवंत । आदर लोकांचे मनांत ॥
कोणी तसें आजपर्यंत । सुखी राज्य केलें नसे ॥८८॥

त्यानें यज्ञ केले बहुत । देव ब्राह्मण संतोषत ॥
सर्व कांहीं स्वधर्मयुक्त । दत्तचरणीं नम्र असे ॥८९॥

सहस्त्रार्जुन सदाचारी । अधर्माचा नाश करी ॥
श्रेष्ठ गुणज्ञ राजा भारी । विश्वासू प्रजाजनांचा ॥९०॥

दत्तप्रसादें त्याच्या चित्ता । अणुमात्रही नसे चिंता ॥
ऋद्धि सिद्धि राज्यीं राबतां । उणें कशास पडेल ॥९१॥

करावया जनकल्याण । विकास योजना परिपूर्ण ॥
लोकहितार्थ अंत:करण । राजकार्य सफल असे ॥९२॥

राजाचें यथार्थ वर्णन । न होई करून लेखन ॥
सर्व प्रजा सुखी संपूर्ण । मुख्य वर्म यांत वसे ॥९३॥

लंकापति दैत्य रावण । अर्जुन ओळखे पूर्ण ॥
राजाशीं करितां रण । रावण कैदी जाहला ॥९४॥

त्याच्या पित्यानें मग त्यासी । मागून घेतलें रायापाशीं ॥
कार्तवीर्यार्जुन राण्यासी । देवही भीती सर्वदा ॥९५॥

स्नानासाठीं नर्मदा नदी । प्रवाहांत अर्जुन बांधी ॥
नदी-प्रेमें धांवे जलधी । त्यालाही त्यानें शासिलें ॥९६॥

त्याचा पराक्रम प्रखर । भेदिले म्लेंच्छ दैत्य असुर ॥
राजा असे सम्राट थोर । भाग्यवंत सत्त्वगुणी ॥९७॥

विष्णु अंश अर्जुन नृपति । दशदिशा जाहली ख्याति ॥
जिकडे तिकडे त्याची कीर्ति । स्वस्ति स्वस्ति बोलणें ॥९८॥

दत्तकृपेचा अगाध ओघ । नाश करी सर्वदा अघ ॥
श्रीदत्तचरणीं भक्तरीघ । त्या सर्वांना नमन असो ॥९९॥

दत्त लीला फार गहन । श्रीदत्तप्रभु सुप्रसन्न ॥
अध्याय सतरावा दत्तार्पण । कल्याण करी भक्तांचें ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय १८ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

कृतवीर्यपुत्र अर्जुन । सतत करी दत्तदर्शन ॥
भक्तिभावें करी नमन । अनन्यभाव दत्तपदीं ॥१॥

भला भक्त राजा अर्जुन । उदास झाला एकदिन ॥
मनास शांति नाहीं म्हणून । दत्तसेवेस राहिला ॥२॥

अर्जुनानें भक्ति केली । प्रसन्न त्यासी दत्त माऊली ॥
भूप वासना पुरविली । परी तो इच्छा ज्ञान प्राप्ति ॥३॥

दत्त फार गूढ असती । त्यांची माया कोण जाणती ॥
ते राजालागीं न पुसती । असती दंग स्वरूपीं ॥४॥

श्रीदत्तांना भक्त पुष्कळ । सेवा करिती सदाकाळ ॥
कष्टतो अर्जुन भूपाळ । सेवी इतरांप्रमाणें ॥५॥

राजा रंक समान भक्त । भेद भाव तेथें नसत ॥
सकळांचें हर्षित चित्त । सेवितीं दत्ता दयाळा ॥६॥

कोणी फुलें फळें आणिती । कोणी समिधा तोडिती ॥
कोणी दर्भ नीट करिती । जमविती यज्ञ साहित्य ॥७॥

कोणी दत्तांना स्नान घाली । कोणी त्यांना वसनें लेई ॥
कोणी गुरूंना पाणी देई । आचमनाकारणें ॥८॥

कोणी त्यांचीं वस्त्रें धुती । कोणी स्वयंपाक करिती ॥
कोणी बागेंत श्रम करिती । फुलांफळां कारणें ॥९॥

कोणी चंदन झरविती । कोणी अंगण साफ करिती ॥
नानापरी कामें चालती । भक्तांकडून भक्तीनें ॥१०॥

आनंदानें दत्ताश्रमांत । भक्तगण सेवा करीत ॥
सर्व शिष्य विनम्रचित्त । विविध प्रकारें प्रार्थिती ॥११॥

त्यांची कोण करी गणती । सर्वही सेवेंत रंगती ॥
दीननाथ श्रीगुरुमूर्ती । दावी भक्ता वत्सलता ॥१२॥



कृपाळु सद्गुरु दत्तात्रेय । घेती सुधारून अक्षय ॥
गुरुरायाचे तारक पाय । सांभाळ करिती भक्तांचा ॥१३॥

श्रीदत्त चरणांचा आश्रय । सदा करी भक्ता निर्भय ॥
जोडून भावें पाणिद्वय । अद्वय स्थान मिळे भक्ता ॥१४॥

नृपेंद्र कार्तवीर्यार्जुन । सेवीतसे गुरुचरण ॥
परंतु श्रीदत्त भगवान । त्याला कांहीं न विचारिता ॥१५॥

मग गुरुलागीं विनवित । शांत तप शिष्य सांगत ॥
भूपति येऊन कष्टत । दया करणें तयावरी ॥१६॥

दत्तगुरु हंसूं लागले । प्रसन्न वदनें बोलले ॥
तुला अभीष्ट असें दिलें । आतां काय हवें रे ॥१७॥

दीन मुख करून अर्जुन । म्हणे कस करावा पूर्ण ॥
शांत नाहीं अंत:करण । अतृप्त मीं ज्ञानाविणें ॥१८॥

मम इष्ट सगळें दिलें । परी समाधान नाहीं झालें ॥
सुख नाहीं अनुभविलें । ज्ञान प्राप्ति मला हवी ॥१९॥

तव कृपेनें नसे उणें । परंतु आत्मज्ञानाविणें ॥
माझें मानस शांत होणें । न घडे ही तव कृपा ॥२०॥

गुरो आपण ज्ञानमूर्ति । भूत भविष्य चालू स्थिति ॥
सकळ परमात्म्याची ज्योति । आपुल्याविणें न अन्य ॥२१॥

विश्वाचा आधार अससी । सर्वांना प्रेमानें पाळिसी ॥
ज्ञान देसी मुक्त करिसी । ऐसा श्रीगुरो समर्थ तूं ॥२२॥

तत्वचरणांही विनंति । द्यावी मजला आत्मस्थिति ॥
तिच्यासाठीं झुरतों चित्तीं । दासाला या उद्धरावा ॥२३॥

मग दत्तगुरू वदती । पाहिली तुझी भाव भक्ति ॥
भिऊं नको बा आतां चित्तीं । कृपा तुजवरी होईल ॥२४॥

तूं अससी भक्त माझा । शुद्ध भाव अंतरीं तुझ्या ॥
नको भिऊं बाळा माझ्या । तुझें कार्य होईल रे ॥२५॥

यापरी राजाला सांगून । अष्टांग योग उपदेशून ॥
लिंग शरीर दाखवून । आत्मज्ञान दिलें तया ॥२६॥

राजाची समाधि लागली । चैतन्य ओळखी पटली ॥
सारी तळमळ निमाली । अंत:करण शांत झालें ॥२७॥

मग कांहीं काळानंतर । समाधि उतरी राजेंद्र ॥
दत्ता स्ववीतसे अपार । तूं मी एकरूप म्हणे ॥२८॥

जें परब्रह्म निर्गुण । त्याचा अनुभव आला पूर्ण ॥
गुरु माऊली देई ज्ञान । धन्य कृतार्थ मी झालों ॥२९॥

समाधींत निर्गुण ब्रह्म । पुढ्यांत असे गुरुब्रह्म ॥
गुरुशिष्या कर्तव्यकर्म । नुरलें भाग्यवान असें ॥३०॥

मग दत्त वदती त्यासी । न सांगावें हें कवणासी ॥
श्रद्धा ठेवील खरी त्यासी । उद्धरावें राजेंद्रा ॥३१॥

आतां सांगतों तसें करीं । वर्तावें प्रारब्धानुसारीं ॥
जीवन्मुक्तपणें संसारीं । राहून घेई राज्यभोग ॥३२॥

कोठें न ठेवावी आसक्ति । योगस्थ राहून पाळ क्षिति ॥
धर्माचारें यथास्थिति । वर्तावें तूं सदोदित ॥३३॥

तूं झालासी विदेही जाण । मम रूपीं सायुज्यपूर्ण ॥
सतत ठेव माझें स्मरण । भिऊं नको तूं जा आतां ॥३४॥

लोक वागती श्रेष्ठाचारीं । म्हणून वाग धर्माचारीं ॥
लोकांसाठीं आचार करीं । भवार्णवीं तूं तरलासी ॥३५॥

साधुजनांसी संरक्षणें । दुष्टालांगीं शासन करणें ॥
हेंच कार्य करीत जाणें । कार्तवीर्या तूं आता ॥३६॥

अज्ञान घालविण्यासी । श्रेष्ठ अधर्म वर्तनासी ॥
करिती परंतु सर्वासी । तो आचार सत्य नसे ॥३७॥

सर्वच ज्ञानरूप असे । त्याला कर्माचा लेप नसे ॥
आचार पाळून विश्वासें । सर्वदा जावें स्वरूपीं ॥३८॥



परी आचारीं न गुंतावें । देवाला नित्य आळवावें ॥
हें मुख्य सूत्र न सोडावें । चित्तीं पाहिजे सर्वदा ॥३९॥

अशा निश्चयी वर्तनानें । आपोआप सद्गुरु मिळणें ॥
आणि भवसमुद्रीं तरणें । नित्य सत्यत्वें होतसे ॥४०॥

हा अक्षय धर्माचार । पाळीत जावा निरंतर ॥
बोध जनांस हा सत्वर । तुझ्या वर्तनें मिळावा ॥४१॥

असें सदा वर्तत जावें । मदमत्सरां तूं टाकावें ॥
ठावें असे तुला बरवें । मद्रूपीं येसी जा आतां ॥४२॥

मग अर्जुन नमी दत्ता । सांगे गुरूजी जातों आतां ॥
असावी कृपा वत्सलता । राजा गेला स्वराज्यीं ॥४३॥

नीती न्यायानें राज्य करी । सर्वहि आज्ञा बरोबरी ॥
पाळीत होत्या नरनारी । धन्य राजा तो असे ॥४४॥

अपमृत्यु कधीं न येती । गाई पुष्कळ दूध देती ॥
ओले सुके दुष्काळ नसती । विपुल धान्य दे भूमी ॥४५॥

परस्परांसी पूरक । राज्यीं नांदती नाना लोक ॥
प्रत्येक व्यक्ति भोगी सुख । उत्कर्षमार्ग मोकळे ॥४६॥

राजा धर्मात्मा पुण्यवंत । श्रीदत्त प्रसाद मिळत ॥
जन कल्याणासी झटत । त्याची सय नये कोणा ॥४७॥

ईश्वराचीं सर्व लेकुरें । मानव धर्म करी बरें ॥
लक्षांत घेऊन तत्त्व खरें । वागे अर्जुन योगस्थ ॥४८॥

त्याचें आदर्श शुद्ध वर्तन । पाहून भ्याले देवगण ॥
राजा घेईल स्वर्गस्थान । असें बोलती आपसांत ॥४९॥

मग त्याचें सत्त्व हराया । ते पाठविती रविराया ॥
तो धरून ब्राह्मण काया । ठाकला कार्तवीर्याकडे ॥५०॥

राजा यथोचित स्वागत । करून जोडी दोन्ही हस्त ॥
म्हणे आपण मम दैवत । काय कामना उदेली ॥५१॥



विप्र म्हणे देई वचन । इष्ट कामना पुरवीन ॥
अर्जुन वदे सत्य भाषण । मग ब्राह्मण बोलला ॥५२॥

वृक्षलतादि झाडझूड । सुकवून दे भोजन गोड ॥
काय पाहसी शंका सोड । राजा म्हणे रूप दावा ॥५३॥

विप्र स्वरूप दाखवी । राजा म्हणे बरवें रवी ॥
तुजसमान विप्र घेई । दान माझ्या कडून ॥५४॥

त्यामुळें झालों देवा धन्य । परी वृक्षादि सुकवून ॥
देण्यास शक्ति नाहीं जाण । तसें बल द्या मजला ॥५५॥

मग भास्कर देई त्याला । अक्षय बाण भात्यांला ॥
अर्जुन हर्षित जाहला । घेई धनु पांचशें ॥५६॥

चढविली दोरी त्यांचेवर । सूर्यासम तेज प्रखर ॥
असे सोडी बाण सत्वर । वनश्री झाली कोरडी ॥५७॥

सर्व अर्पिलें सूर्य विप्राला । दिनमणि अग्नि जाहला ॥
भराभर जेवूं लागला । शुष्करान भस्म झालें ॥५८॥

संतोषलें दिन दैवत । राजाची वाहवा करीत ॥
सूर्य ब्राह्मण झाला गुप्त । राजाही मानी धन्यता ॥५९॥

इकडे वसिष्ठ आश्रमांत । ऋषि समाधि उतरीत ॥
सभोंवार दृष्टि जात । बघी वृक्षादि भस्म झाले ॥६०॥

त्यांना अनिवार कोप आला । सहस्त्रार्जुनाला शाप दिला ॥
म्हणती तुझी सत्त्वकळा । परि अनुचित हे केलें ॥६१॥

कां रे उन्मत्त जाहलासी । शास्ता नाहीं काय तुजसी ॥
पुत्र जन्मेल जमदग्नीसी । परशुराम तुझा हन्ता ॥६२॥

वशिष्ठ शाप राजेंद्राला । राजा मस्त होऊं लागला ॥
करी उन्मत्त वर्तनाला । ज्ञानी असून भूप तो ॥६३॥

सत्यद्वीपाचा अधिपती । नृप असे विदेह स्थिति ॥
सत्त्व पालन झाले अति । ह्मणून गति भवपार ॥६४॥

राजा ज्ञानी असे म्हणून । जरी करी उन्मत्त वर्तन ॥
तरी अधोगती त्यापासून । जीवास नाहीं सत्य हें ॥६५॥

देहानें कर्म आचरिलें । त्याचीं देह भोगील फळें ॥
आत्म्यास लेपन कसलें । लागत नाहीं कधींही ॥६६॥

हेतुपूर्वक नाहीं पाप । त्याचा विचारी देव ताप ॥
ईश्वर असे मायबाप । तोच संरक्षी सर्वदा ॥६७॥

शरीराचें कर्म केवळ । त्याचा न लागे कदा मळ ॥
आत्मतत्त्व सदा निर्मळ । तत्त्व मनांत असावें ॥६८॥

अंतरीं नसता कपट । लौकीक कर्म जरी वाईट ॥
ईश्वर त्याचा कधींही वीट । मानीत नाहीं सत्य हें ॥६९॥

जो ज्ञान अनुभवीत । तो अधोगतीस नाहीं जात ॥
तो अक्षय मुक्त असत । तसाच अर्जुन भूपति ॥७०॥

आत्यंतिक सत्त्वपालन । सुखानें अशक्य म्हणून ॥
ओघा आले शापवचन । देह प्रारब्ध संपवाया ॥७१॥

ही ईश्वराची लीला असे । ती कोणा चुकत नसे ॥
तीच सर्व घडवितसे । असें ज्ञानी मानिती ॥७२॥

राजानें जो वर घेतला । तसा विचार उगवला ॥
स्वभक्तास मारावयाला । देवची येई आपण ॥७३॥

ऋषिशाप निमित्त झाले । राजवर्तन बिघडले ॥
लोभ द्वेषादिक उदेले । अधर्म संचरे राज्यांत ॥७४॥

अष्टसिद्धि अर्जुनदासी । कोणी न तुळे त्याचे बळासी ॥
अैसा अतर्क्य शक्तिराशी । थोर प्रतापी धनुर्धर ॥७५॥

जो जीवनमुक्त जाहला । त्याचें बळ कोण वदला ॥
सर्व स्वाधीन चित्कळा । पूर्ण बळीया भूपेंद्र ॥७६॥

त्यासी जिंकावें गुरुवरें । तेथें अन्य सर्व पामरें ॥
सहस्रार्जुन दत्तवरें । प्रतिदत्त बनलासे ॥७७॥



तो राज्या क्वचित प्रसंगीं । त्रास देई इतरां लागीं ॥
अधर्म संचारला अंगीं । देहपात करण्याला ॥७८॥

इंद्र शचीसह रमून । विमानीं होता तेथें जाऊन ॥
अर्जुन नेतसे पकडून । असा उद्धट भूप बने ॥७९॥

सुविचारी कार्तवीर्यार्जुन । परी भ्रष्टलें आचरण ॥
जरी नये असें घडून । कसा मृत्यु येईल त्या ॥८०॥

त्यानें मागितला वर । अधिक कीर्तिमान नर ॥
त्यानें करावें मला ठार । समरांगणीं मिळो मुक्ती ॥८१॥

हें खरें करण्यासाठीं । पदरीं हवी पापगांठीं ॥
ती मारील रणीं काठी । घडवील भेटी मृत्यूची ॥८२॥

राजाचा अंतकाळ आला । म्हणून राजेंद्र चळला ॥
इकडे इंद्रादिक विष्णूला । शरण गेले रक्षणार्थ ॥८३॥

भगवान प्रसन्न झाले । अवतरून येतों वदले ॥
अमर सर्व आनंदले । नमन असो नारायणा ॥८४॥

जीवन्मुक्त राजा अर्जुन । त्याचें करण्या वरदान पूर्ण ॥
मुकुंद जाहला ब्राह्मण । कीर्तिमान वीर भला ॥८५॥

शिवांश जमदग्नीपिता । गौरीअंश रेणुका माता ॥
भार्गवराम अधर्मशास्ता । अर्जुना हन्ता होतसे ॥८६॥

ती कथा येईल आतां । ऋचीक नामें ऋषि होतां ॥
त्या तपोवृद्ध भृगुसूता । संसार इच्छा उदेली ॥८७॥

कान्यकुब्ज देशावर । राजा गाधीचा अधिकार ॥
त्याची मुलगी उपवर । असे सुंदर सत्यवती ॥८८॥

ती मागें ऋचीक ऋषिवर । भूप मानसीं करी विचार ॥
हा वृद्ध परी तपस्वी थोर । काय उत्तर त्या द्यावें ॥८९॥

माझी कन्या सुकुमार । याला देता कष्ट अपार ॥
पावेल म्हणून नकार । देतां शापील हा ऋषि ॥९०॥



नंतर योजून विचार । गाधिराजा देई उत्तर ॥
मी केला पण प्रखर । सुंदर कन्ये कारणें ॥९१॥

जो सहस्त्र श्यामकर्ण । देईल मजला आणून ॥
त्यासी मी संतोषवीन । अर्पून कन्या सत्यवती ॥९२॥

ऋषि ह्मणती पण पसंत । श्यामकर्ण आणून त्वरित ॥
देऊ आयति करा समस्त । लग्न सोहळा करावया ॥९३॥

वरुणलोकीं केलें गमन । वरुणा सांगें वर्तमान ॥
त्यानें केला ऋषिसन्मान । परंतु चित्तीं भीतसे ॥९४॥

दिले सहस्त्र श्यामकर्ण । ऋचीकसखा राजावरुण ॥
ऋषि असती बलवान । गाधिराजाकडे येती ॥९५॥

सहस्त्र अश्व श्यामकर्ण । घेऊन केलें कन्यादान ॥
जामातकर्तुत्व पाहून । राजा संतुष्ट जाहला ॥९६॥

ऋषि ऋचीक सत्यवती । संसारीचे भोग भोगिती ॥
तें पाहून अमरपती । इंद्रही चकित होतसे ॥९७॥

ईश्वर लीला असे धन्य । तिचें करावें निरीक्षण ॥
धागे असती अन्य अन्य । परी गुंफण अेक त्यांची ॥९८॥

कारण कार्य परिणाम । स्थूल आणि सूक्ष्म परम ॥
विचार करितां मनोरम । चित्त तल्लीन होतसे ॥९९॥

आठवून दत्तचरण । अठरावा अध्याय दत्तार्पण ॥
त्यामुळें होई भक्तकल्याण । दत्त प्रसन्न दयाळू ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु

# अध्याय १९ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

सत्यवतीचा सुखी संसार । पाहून गाधिनृपवर ।।
म्हणे मुलीचें भाग्य थोर । जामात श्रेष्ठ लाभला ।।१।।

तरी त्याला मनाची खंती । सांगावी म्हणून नृपती ।।
विचार करीतसे चित्तीं । राणीही योग्य म्हणतसे ।।२।।

जामाता गाधि नृपवर । सांगे झुरतो निरंतर ।।
आपणांसी हवा कुमर । पुत्रकामना पुरवावी ।।३।।

हे ऐकून श्वशुरबोल । ऋचीक वदे पुत्र होईल ।।
आणि भार्येसह तत्काळ । निघाला पितृदर्शना ।।४।।

पित्यास करी नमस्कार । भृगु महर्षि तपी थोर ।।
आश्वासून दिधला धीर । आशीर्वचन मिळालें ।।५।।

पित्यास सर्व वर्तमान । सांगे ऋचीक ब्राह्मण ।।
सत्यवतीही उत्तम सून । आदरें नित्य वर्ततसे ।।६।।

सुनेचे सद्गुण पाहून । सासरा जाहला प्रसन्न ।।
त्यामुळें आनंद पावून । पुत्र सून सुखी होती ।।७।।

मग भृगु व्रत सांगती । होण्या उत्तम पुत्र प्राप्ती ।।
आणि चरू मंत्रून देती । मायलेकीस भिन्न भिन्न ।।८।।

ब्रह्म तेजस्वी सुनेस सुत । व्हावया संस्कार करीत ।।
क्षात्र तेजस्वी चरू देत । तिच्या जननी कारणें ।।९।।

व्रत संपूर्ण करून । आपापला चरू भक्षण ।।
करण्यास तिला सांगून । पाठवी माहेरीं आनंदें ।।१०।।

पित्याचा निरोप घेऊन । सत्यवतीसह निघून ।।
सासुरवाडीस येऊन । ऋचीक पुत्रोपाय कथी ।।११।।

राजाराणी आनंदती । माता दुहिता व्रत करिती ।।
मुलीस उत्तम पुत्रप्राप्ती । होणार राणी मनीं म्हणे ।।१२।।



केली चरूची अदलाबदल । सत्यवती मन निर्मळ ।।
भक्षिता चरू मंत्र सबळ । झाल्या दोघी गर्भवती ।।१३।।

कांहीं दिवसांनंतर । भृगूंना कळलें अंतर ।।
सांगती येऊन सत्वर । भक्षिला चरू भिन्नभिन्न ।।१४।।

राजकांतेस विप्रअंश । सत्यवतीस क्षत्रियांश ।।
संस्काराचा पुत्र विशेष । नि:संशय होईल ।।१५।।

मातापराध क्षमा करीं । प्रार्थून सून चरण धरी ।।
पुत्र व्हावा ब्राह्मणापरी । म्हणून विनवी श्रद्धेनें ।।१६।।

भृगु करिता तसा संस्कार । पण दिलें तिला उत्तर ।।
नातू होईल क्षत्रियवीर । चरुससंस्कार न चुकेल ।।१७।।

असें सांगून भृगु गेले । योग्य काळीं पुत्र जन्मले ।।
गाधि व ऋचीक तोषले । करिती उत्सव हर्षभरें ।।१८।।

गाधिपुत्र विश्वामित्र । जमदग्नि ऋचीकपुत्र ।।
विश्वामित्र तप पवित्र । करून बनती ब्रह्मर्षि ।।१९।।

जमदग्निऋषि बळवंत । कामधेनु प्रसन्न असत ।।
पुत्र विष्णुअवतार ख्यात । क्षत्रकर्मा परशुराम ।।२०।।

जमदग्नि ऋषि रुद्रांश । तपस्वी ज्ञानी ते विशेष ।।
ऋषिभार्या पार्वतीअंश । रेणुका रेणुराजकन्या ।।२१।।

नांदलें दंपत्य उत्तम । त्यांचें पुत्र राम पंचम ।।
विष्णु अंश भार्गवराम । भूभारहरणा जन्मती ।।२२।।

माधवमासीं शुक्लपक्षांत । पुनर्वसु नक्षत्र युक्त ।।
तृतीयेस अवतार होत । तेव्हां माधव ज्येष्ठ असे ।।२३।।

दशदिशा होती प्रसन्न । पुष्पें वर्षती देवगण ।।
दुंदुभी स्वर्गी वाजवून । अमर उत्सव करिताती ।।२४।।

सृष्टिमाता असे प्रसन्न । हर्षित होती ऋषिगण ।।
जातकर्म संस्कार करून । जन्मसोहळा होतसे ।।२५।।



सगळीकडे आनंद भरे । जेथें भगवान अवतरे ।।
तेथें उत्साह वितरे । स्वस्ति शद्बें जयघोष ।।२६।।

पुत्राचें नाम परशुराम । सज्जनांस मिळे आराम ।।
मातापित्या मोद परम । धन्य, त्यांना नमन असो ।।२७।।

सर्व जीवांचा पालनकर्ता । विष्णु सात्त्विक सुखकर्ता ।।
दुष्ट जनांचा असे शास्ता । साधुरक्षण तो करी ।।२८।।

जशी परिस्थिति येतसे । तसा अवतार होतसे ।।
दुष्टघाला चुकवीतसे । साम दाम दंड भेदें ।।२९।।

राम उत्कृष्ट पितृभक्त । जनकाची सेवा करीत ।।
रानांतून राम आणीत । फुलें फळें समिधादि ।।३०।।

वेदपारंगत पंडित । तशी रणविद्याही जाणत ।।
ब्रह्मक्षत्रबली बनत । शापादपि शरादपि ।।३१।।

सकळांसी सदा आराम । देत असती भार्गवराम ।।
राम राम परशुराम । कीर्ति फांके चहूंकडे ।।३२।।

राम सकळां आवडत । मात्यापित्याचें प्रेम अमित ।।
बंधुमातापिता तोषत । धन्य विष्णु अवतार ।।३३।।

रेणुकादेवी अेकेदिनीं । नदीवर आणण्या पाणी ।।
जातसे घरीं जमदग्नि । वाट पाहाती उदकाची ।।३४।।

तेव्हां तेथें येई रमत । पद्ममाली स्त्रियांसहित ।।
नदींत क्रीडा त्यांची होत । रेणुका क्षणभर ती पाही ।।३५।।

नदीमधील थाटमाट । राजैश्वर्य दिसे अफाट ।।
पाहून शंकली रेणुका धीट । परी पाणीं आश्रमीं ने ।।३६।।

शंकेनें तिचें ब्रह्मतेज । झालें असे लुप्त सहज ।।
तें तपस्वी जमदग्निद्विज । पाहून ज्ञानें सर्व जाणी ।।३७।।

कोपून भार्येचा पुनर्जन्म । करावा असें मनीं योजून ।।
हाकारी पुत्रा भडकून । वसुमाना ये इकडे ।।३८।।

म्हणे मातेस करीं ठार । तो भीतीनें कांपे थरथर ॥
आईस मारण्या नाहीं धीर । बाप म्हणे भस्म हो तूं ॥३९॥

सुषेण वसु विश्वावसु । हे ही न येती पुढें तसू ॥
म्हणून झाले अविश्वासू । पिता त्यांचें भस्म करी ॥४०॥

इतक्यांत राम पातला । तेंच ऋषि सांगती त्याला ॥
राम वंदी पितृपदांला । तोंडी मस्तक मातेचें ॥४१॥

मग निवाला जमदग्नि । परशुरामा आलिंगोनी ॥
म्हणे पुत्रा वर घे झणीं । माग काय हवें तें ॥४२॥

राम वदे वाणी बरवी । बंधूंसह आई उठावी ॥
विजयश्री सदा मिळावी । दीर्घायुषी मी व्हावें ॥४३॥

जमदग्नि तथास्तु म्हणत । रेणुकादि सर्व जिवंत ॥
रामासही वर लाभत । थोर बळ त्या ऋषीचें ॥४४॥

त्या सर्वांना असो नमन । वरवधूचें होतां लग्न ॥
अेकनिष्ठ पाहिजे मन । अन्य तेथें तुच्छ सर्व ॥४५॥

सतीधर्माचें आचरण । रेणुका करी मनापासून ॥
मन शंकतां गेला प्राण । देहांत योग्य प्रायश्चित ॥४६॥

पतिव्रता तेज महान । पुन्हां सती जिवंत होऊन ॥
सेवीतसे पतिचरण । पतिनिष्ठा अभंग तिची ॥४७॥

नरनारीचें ऐक्य बळ । परम पवित्र मंगल ॥
त्यांचें नित्यचरणकमळ । निर्मळ भावें वंदावें ॥४८॥

मग मिळतें आशीर्वचन । त्यामुळें विघ्नें विरघळून ॥
जाती आणि घडे कल्याण । संसार सार्थ बनतसे ॥४९॥

ऋणधन वीज एकता । पावतां मिळते उष्णता ॥
सदा सूर्यदेव सविता । पुरवी पृथ्वीस कल्याणा ॥५०॥

निव्वळ शरीर सुखासक्ति । धरितां येतसे आपत्ति ॥
उभयमनें एकत्र येती । तेथें सद्गति अखंड ॥५१॥



जमदग्नीच्या आश्रमांत । कर्में चालती वेदविहित ॥
राम सर्वां आनंद देत । नमस्कार त्यांस असो ॥५२॥

थोर पुरूषांचें चरित्र । वाचून होतें चित्त पवित्र ॥
या मनाची गति सर्वत्र । देहात्मबुद्धीस नकळे ती ॥५३॥

इहलोकींच्या वासना । संकुचित असती नाना ॥
त्यांत आसक्ति नको मना । सर्व सत्ता श्रीहरीची ॥५४॥

त्यांला सर्वही समर्पून । सदा असावें तत्पदीं लीन ॥
मग तो वैकुंठ भगवान । स्वपदीं क्षेम ठेवीतसे ॥५५॥

इहपर होऊन क्षेम । जें ब्रह्म निर्दोष सम ॥
त्यांत अंतीं मिळे आराम । विश्वात्म एकता शाश्वत ॥५६॥

एकदां सहस्त्रार्जुन । चतुरंग सेना घेऊन ॥
अरण्यांत करी गमन । तेथें आश्रम देखिला ॥५७॥

तो पहावया नृप जात । जमदग्नि करी स्वागत ॥
आश्रम मनोरम शांत । ऋषिकुटुंब सुखी असे ॥५८॥

राजा करी ऋषीची स्तुती । कुशल संभाषणें होती ॥
जमदग्नि भोजन देती । सैन्यासह सहस्त्रार्जुन ॥५९॥

उत्तम पक्वान्नांनी युक्त । भलें भोजन मिळे त्वरित ॥
नृपति आश्चर्यचकित । वृत्तांत पुसती ऋषीला ॥६०॥

मग जमदग्नि सांगती । आपणा नसे चिंता चित्तीं ॥
इच्छित पदार्थ मिळती । कामधेनु प्रसादानें ॥६१॥

पाहुणचार स्वीकारून । राजादि पावले समाधान ॥
परंतु भ्रंशलें राजमन । कामधेनु मागतसे ॥६२॥

सांगे देतों पुष्कळ धन । धेनु द्यावी कृपा करून ॥
ऋषि वदती धन देऊन । कामधेनु न मिळे पै ॥६३॥

आमचें असे हें ऐश्वर्य । तुम्हांस असे राजैश्वर्य ॥
ईश्वरदत्त शिरोधार्य । मानून चालणें उत्तम ॥६४॥



राजास नावडे हें उत्तर । योजी करावा बलात्कार ॥
काय करील ऋषिवर । म्हणोन धेनु पळविली ॥६५॥

ऋषि ज्ञानी धीर गंभीर । तशीच रेणुका पुत्र चार ॥
कोणी न करिती प्रतिकार । देवा वंदून शांत ठेले ॥६६॥

इतक्यांत राम रानांतून । आश्रमीं येतां वर्तमान ॥
बंधू सांगती तें ऐकून । परशुराम क्रोधावले ॥६७॥

उद्गारती अरे अर्जुना । कां रे करिशी अशा वर्तना ॥
सीमा झाली दुराचरणा । करितों तुझें कंदन ॥६८॥

मातापित्यास राम म्हणे । सत्वर मला असे जाणें ॥
सर्व जाळीन एकाक्षणें । मग राजाची काय कथा ॥६९॥

कां मी अवतार घेतला । पृथ्वीस दुष्टभार झाला ॥
अहंकार अपार चढला । आतां प्रकट मी होतों ॥७०॥

कार्तवीर्यार्जुन राजास । करितों ठार यावेळेस ॥
कामधेनुसहित घरास । येतों जयश्री घेऊन ॥७१॥

राजा उन्मत्त दुराचारी । कोप ये रामा अनिवारी ॥
मातापित्यास नमस्कारी । भार्गवराम निघाला ॥७२॥

नगरासमीप राजा मत्त । जाणार परी इतक्यांत ॥
परशुराम हांकारीत । म्हणे स्थिर उभा रहा ॥७३॥

अरे झालासी फार मस्त । सारासार नाहीं पहात ॥
वाटेल तसा तूं वर्तत । करितों ठार सज्ज हो ॥७४॥

लोकांचा छळ करावया । काय मातसी तूं क्षत्रिया ॥
करितों तुझी भग्नकाया । जिनें यापरी वागसी ॥७५॥

अर्जुन मनीं दचकला । अजून कोणी उभा न राहिला ॥
देवदैत्यांनी पळ काढिला । असाच वीर मी धन्य ॥७६॥

परंतु याचें तेज प्रखर । भासे मला विष्णु अवतार ॥
केलें जरी थोर समर । तरी यश न ये हाता ॥७७॥

पूर्वीं दत्तानें दिला वर । तसा येतसे हा प्रहर ॥
युद्धा धाडी सैन्य अपार । परन्तु राम नाटोपे ॥७८॥

मग स्मरे गुरुचरणा । तोषवावया देवराणा ॥
हातीं घेई धनुष्यबाणा । युद्ध अनिवार तो करी ॥७९॥

बाणापाठीं बाण सोडून । टाकिलें रामास झांकून ॥
सिंहनाद विजयखूण । करी रामही संतुष्टे ॥८०॥

म्हणे धन्य असे नृपती । फांकवी बाण हातोहाती ॥
रामहस्तलाघव अती । छेदिले हस्त राजाचे ॥८१॥

वर प्रसादें हात आले । पुन्हां ते तोडून टाकले ॥
परत हस्त उगवले । मग अग्न्यस्त्र योजिलें ॥८२॥

अग्नि जाळी सहस्रहस्त । अर्जुनाचें बळ संपत ॥
म्हणे अंतकाळ निश्चित । देहपात समय हा ॥८३॥

श्रीदत्ताचें स्मरण केलें । इतक्यांत शीर पडलें ॥
राजभाग्य श्रेष्ठ ठरलें । मुक्तीस गेला अर्जुन ॥८४॥

मनांत श्रीगुरुदेवदत्त । श्रीनारायण भगवंत ॥
भार्गवराम ब्रह्म पुढ्यांत । थोर भाग्य अर्जुनाचे ॥८५॥

देवभक्ति दृढ करावी । ईश्वर कृपा संपादावी ॥
मग वर्तन भवार्णवीं । कसेंही घडो प्राक्तनें ॥८६॥

जगताला उदाहरण । देईल देव भगवान ॥
चैतन्यमय जीवप्राण । चैतन्यांत सामावती ॥८७॥

देवालागीं स्मरत जावें । योग्य मार्गानें ने म्हणावें ॥
दृढभावानें त्या भजावें । मग तो होई प्रसन्न ॥८८॥

जो विदेही संपूर्ण झाला । तो जरी अधर्मे वागला ॥
तरी त्याचा दोष त्याला । लागत नाहीं मुळींच ॥८९॥

तो चैतन्यरूपी विलसे । त्याला देहांची पर्वा नसे ॥
देहा सुखदु:ख होतसे । ते तो न मानी कदापि ॥९०॥



त्यासी मिळवायचें नुरलें । सर्वही त्यानें मिळविलें ॥
देहाचें जें कर्म उरलें । तें देह भोगी तो म्हणे ॥९१॥

आपलें वस्त्र फाटत । आपण न फाटों निश्चित ॥
त्या परी तो मानी सतत । देहदु:खाकारणें ॥९२॥

देहकर्म न भोगी देही । बरें अथवा वाईट ही ॥
मुक्त पुरुष काल प्रवाहीं । अशा भावानें वागतसे ॥९३॥

देह असे हा नाशवंत । कोण म्हणेल शाश्वत ॥
कधीं तरी जाईल सत्य । अक्षय तो न टिकेल ॥९४॥

आह्मी संसारी मानव । संसारी सुखाचा रव ॥
मिळविण्यासाठीं जीव । कासावीस करीतसों ॥९५॥

म्हणून कष्ट फार होत । परन्तु त्यांची पर्वा नसत ॥
मुक्त आत्मानंदीं रत । देहस्थिति न गणी तो ॥९६॥

सिद्धपुरुष गुणातीत । देहाकडून भोगवीत ॥
देहकर्मफल समस्त । नित्य लोकसंग्रहासी ॥९७॥

तसा असे सहस्रार्जुन । देहपात व्हावा म्हणून ॥
करीतसे अधर्माचरण । देहप्रारब्ध संपवाया ॥९८॥

अर्जुनालागीं मारण्याला । श्री विष्णूच स्वयें आला ॥
ही वरमागणीची लीला । क्षत्रकर्म घोर असे ॥९९॥

त्या सर्वांना असो नमन । अेकोणिसावा अध्याय पूर्ण ॥
केला दत्तपदीं अर्पण । घेती कृपाळु भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय २० वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:॥

मागील अध्यायीं कथन । झालें कार्तवीर्याचें हनन ॥
सत्य व्हावया वरदान । विष्णुअंश प्रकटला ॥१॥

न घडे अधर्माचरण । मग अर्जुना मारी कवण ॥
जरी त्याला न मारी कोण । अर्जुना मृत्यु न येई ॥२॥

सिद्धमहंत आचरण । देई बोध जनांकारण ॥
उपदेश घ्यावा उमजून । मानस शुद्ध करावें ॥३॥

भूत भविष्य वर्तमान । स्थितीचें सिद्धां असे ज्ञान ॥
नियतीचे नियम पाळून । ज्ञानी जनही वागती ॥४॥

अर्जुन राजा थोर झाला । त्याचा अंतकाळ आला ॥
देहपातासाठीं चळला । त्याचा काळ परशुराम ॥५॥

राजा पडला समरांत । सैन्य चेंदामेंदा होत ॥
मग भार्गवराम नेत । कामधेनु स्वगृहाला ॥६॥

अर्जुना मारिला यास्तव । ऋषि देव आणि मानव ॥
पावले समाधान सर्व । क्षेम इच्छिती रामाचें ॥७॥

पुष्पें वर्षती सुरवर । स्वस्ति म्हणती ऋषिवर ॥
जयजयकारें गर्जती नर । राम विजयी महाविष्णू ॥८॥

कामधेनु हंबरली । ऋषिकुटुंबीं पुन्हां आली ॥
विजयपताका फडकली । शास्ता राम अधर्माचा ॥९॥

राम बळिया धनुर्धर । वदनीं वेद हातीं शर ॥
परशूही त्याचें हत्यार । भक्तां अभय देतसे ॥१०॥

जगीं जरी सर्व नश्वर । तरी मर्यादा परमेश्वर ॥
घाली त्यापरी आचार । करून आपण रहावें ॥११॥

चित्तीं असावें समाधान । करावें ईश्वरचिंतन ॥
कामक्रोधाचा वेग सहन । करून देवा प्रार्थावें ॥१२॥

ज्ञानयोगें बंध तुटला । कर्मभोग नसे सुटला ॥
संसारांत आचरणाला । धर्माप्रमाणें करावें ॥१३॥

आपल्या प्रकृतिसमान । ज्ञानीही करिती वर्तन ॥
ज्ञानी जनांचें आचरण । कळे ज्ञानी लोकांना ॥१४॥

सर्व असे ईश्वरीलीला । ज्ञानी लोकां संशय नुरला ॥
त्यांचा मार्ग त्यांना भला । इतरीं त्यांना वंदावें ॥१५॥

लोकांचें व्हावया कल्याण । देव निर्मी संतसज्जन ॥
ऋषिमुनी साधुजन । ज्ञानी लोकां नमन असो ॥१६॥

शेषशायी श्रीभगवंत । सदा पाळितो हें जगत ॥
त्याकडेच असावें चित्त । सर्वसत्ता श्रीहरीची ॥१७॥

ही जगरहाटी विसरून । काम क्रोधानें भारावून ॥
कर्माकर्माचा अभिमान । धरिती द्वेषें मत्सरें ॥१८॥

सर्वभूतहित चिंतून । करावें सदा आचरण ॥
पापाचा पश्चात्ताप पावून । सहकार्यिनें रहावें ॥१९॥

सदाचरणारचा अभिमान । असावा सदा स्वाभिमान ॥
परंतु अतिमान धरून । इतरां तुच्छ न गणावें ॥२०॥

सहस्रार्जुनाचे नंदन । सूड घेण्या दक्ष टपून ॥
पित्याचें अधर्माचरण । खोल रुजलें दिसतसे ॥२१॥

आघातास प्रत्याघात । हा जगाचा नियम शाश्वत ॥
जगीं वैर त्यामुळें वाढत । नाश उभयपक्षांचा ॥२२॥

शांति क्षमा तपाचरण । जमदग्नीचें ठीक वर्तन ॥
परी ईश्वरी अनुसंधान । चुकत नाहीं कवणाला ॥२३॥

जमदग्नि रामा सांगत । राजहत्त्या पाप बहुत ॥
निरसन करावें त्वरित । विजयी राम तसें करी ॥२४॥

एकदां रेणुका जमदग्नि । एकटींच होतीं सदनीं ॥
रामादिक पुत्र काननीं । कांहीं कामा गेले होते ॥२५॥



बरे रामाचा सर्वत्र धाक । अर्जुनाचे पुत्र दांभिक ॥
ज्याला कांपले देवादिक । त्याला विप्रलेक मारी ॥२६॥

लाजिरवाणें हें आम्हांस । म्हणतीं करावें युद्धास ॥
आणि निघती सूड घेण्यास । वनांत ऋषिआश्रमीं ॥२७॥

परशुराम तेथें नव्हते । रेणुकाबोध न ऐकती ते ॥
जमदग्नि ऋषिविर्यातें । ठार करून निघाले ॥२८॥

एका हातीं न वाजे टाळी । म्हणून स्मरावा वनमाळी ॥
जगांत बऱ्या वाईट काळीं । इहपर सखा श्रीहरी ॥२९॥

राम येतसे रानांतून । त्यासी होती अपशकून ॥
आश्रमीं कळे वर्तमान । घोर कोपून निघाला ॥३०॥

झणीं राजपुत्रां मारून । राम येतसे परतून ॥
फेडावयास पितृऋण । घोर पण उच्चारिला ॥३१॥

अधर्मी राजांचें हनन । त्रि:सप्तपर्यंत करीन ॥
त्यांचें रक्त जमा करून । करीन तर्पण पित्याचें ॥३२॥

अनिवार राम नंतर । पित्या हळहळे अपार ॥
सकळां सांगून विचार । दु:ख गिळून शांतवी ॥३३॥

राजास दिलें अन्न उत्तम । त्याचा पहावा परिणाम ॥
ईश्वरलीला श्रेष्ठ परम । सहज सर्वांना खेळवी ॥३४॥

ईश्वराचा पाळून नेम । करावें आपापलें काम ॥
त्यामुळें मनास आराम । हेंच वर्म उमजावें ॥३५॥

रामास म्हणे माता रेणुका । अर्जुन दत्तभक्त निका ॥
त्याचा कोप येईल फुका । आधी संतुष्ट कर त्यांसी ॥३६॥

कावडींत शव घालून । आणि मलाही बसवून ॥
दत्ताश्रमीं करीं गमन । और्ध्वदेहिक कर तेथे ॥३७॥

भार्गवराम तसें करी । चालूं लागला भराभरी ॥
कान्य कुब्ज देशमाधारी । सोडून सह्यपर्वतीं ये ॥३८॥



येतां समीप दत्ताश्रम । आकाशवाणी ऐके राम ॥
तेथें थांबला परशुराम । आणि दत्ता नमन करी ॥३९॥

श्रीदत्त भ्रष्टरूप धरी । भार्गवराम सांगे तरी ॥
पितृअंत्यकर्मसंस्कारीं । आचार्यत्व पत्करावें ॥४०॥

दत्त म्हणती अरे रामा । मी काय जाणतों त्या कामा ॥
फार भ्रष्ट असें अधर्मा । जाण निश्चयें तूं साच ॥४१॥

राम वदला असा दत्ता । कां लोटिसी मला परता ॥
तुला धर्म कसा कोणता । निश्चित असे सांग बरें ॥४२॥

पाळावयास लोकाचार । हवा धर्माचा अंगीकार ॥
उपेक्षा बोल टाक दूर । चल स्वीकार आचार्यत्व ॥४३॥

रेणुकाही म्हणाली दत्ता । कां बोलसी तुं असें वृथा ॥
भ्रष्टरूप टाक आतां । सती जाणे असे मला ॥४४॥

सर्वही गेलें पालटून । दत्त करिती रेणुकास्तवन ॥
सर्व व्यवहार वर्तमान । जाणून घेती श्रीदत्त ॥४५॥

म्हणती अधर्मी क्षत्रिय । त्यांचा आला नाशसमय ॥
म्हणून अधर्मी बुद्धि होय । कालपक्व ते झाले ॥४६॥

तुझा पण पूर्ण होईल । तूं मी एकरूप केवळ ॥
करीं अंत्यकर्म सकळ । यथाविधि पूर्णपणें ॥४७॥

भार्गवराम सोडी बाण । सह्यपर्वत फोडून ॥
स्नाना तीर्थें करी निर्माण । सद्गति मिळे जीवांना ॥४८॥

रेणुकादेवीचें घडे स्नान । तिचें जाहलें सहगमन ॥
श्रीदत्त आचार्य होऊन । विधिपूर्ण करविला ॥४९॥

मग दत्तरामा पुसती । जमदग्नि रेणुकासती ॥
सांग कोठें गमन करिती । राम म्हणे मुक्त झालीं ॥५०॥

श्रीदत्त रामास दाखवी । जमदग्नि रेणुकादेवी ॥
क्रीडती स्वानंद वैभवीं । राम नमस्कार करी ॥५१॥

मग झालीं तीं अदृश्य । राम पावला परम हर्ष ॥
वर्तमान भूत भविष्य । चिद्विलांश नित्य घडे ॥५२॥

धन्य धन्य रेणुकामाता । आदि शक्ति रेणुदुहिता ॥
जमदग्नीची सती कांता । चिच्छक्ति ही जागृत ॥५३॥

ऋषि सती राम श्रीदत्त । सर्वांस असो प्रणिपात ॥
सतीआवेश अकस्मात । लोकीं अजून प्रकटतो ॥५४॥

रेणुकादेवी सती निर्मळ । स्मरण करितांच तत्काळ ॥
इडापीडा बाधा सकळ । नष्ट करून सुख देते ॥५५॥

मातापित्याचें दिव्यशरीर । दिसतां केला नमस्कार ॥
त्यांचें आशीर्वचन थोर । रामें तेव्हां मिळविलें ॥५६॥

आणि मग दत्ता स्तवून । उच्चारीतसे मागील पण ॥
त्रि:सप्तपर्यंत करीन । हनन अधर्मी राजांचें ॥५७॥

पणाचें उदक सोडून । चारी दिशांस करी गमन ॥
ज्याचें दिसे दुराचरण । त्याचें कंदन तो करी ॥५८॥

कांहीं राजे रामा दडती । कांहीं त्याला शरण जाती ॥
मित्र होती कांहीं नृपती । ज्ञानी धार्मिक म्हणून ॥५९॥

दैत्य दानव राक्षस । तसे मानवी राजपुरुष ॥
मुलांसम प्रेमें प्रजेस । पाळणें अवश्य म्हणताती ॥६०॥

भरल्या फेऱ्या एकवीस । त्रि:सप्तपर्यंत सर्वांस ॥
धाक रामवीर विशेष । कीर्ति फांकली चहूंकडे ॥६१॥

राजरक्तानें पितृतर्पण । करून सोडी आपुला पण ॥
वंदून श्रीदत्तचरण । सांगे कृतकृत्य झालों ॥६२॥

राम सोमयाग करीत । आचार्यत्व करिती दत्त ॥
कश्यपादि ऋत्विज होत । सकळां संतोष होतसे ॥६३॥

रामानें पृथ्वी जिंकिली । आणि कश्यपा दान दिली ॥
सत्य धर्माचा देव वाली । संतसज्जन आनंदले ॥६४॥



आजवरी पुष्कळ घाले । संतसज्जनांवरती आले ॥
तेव्हां तेव्हां भगवंत ठेले । रक्षण त्यांचें करावया ॥६५॥

भारतभूमि चांगली । मानव दानव तिला पिळी ॥
त्याला मर्दून सर्वकाळीं । भगवंत भारता रक्षिती ॥६६॥

होणार जाणार सदोदित । परी रक्षणार भगवंत ॥
त्याचें स्मरण नित्य मनांत । ठेवून आपण वागावें ॥६७॥

परशुराम चिरंजीव । त्याला कोणाचा नको जीव ॥
अधर्मशास्ता तो सदैव । विष्णुअंश अवतार ॥६८॥

पराक्रमें पृथ्वी जिंकिली । यज्ञ करून दानही दिली ॥
अनासक्ततापूर्ण दिसली । कालकर्म ते करिती ॥६९॥

कश्यपानें भूमि वांटिली । धर्माचारें राजमंडळी ॥
सदोदित वागूं लागली । ईशलीला चिंत्य असे ॥७०॥

भार्गवराम प्रखर वीर । त्याचें मूळ चरुसंस्कार ॥
भृगुमहर्षि दिव्यथोर । त्यांना नमस्कार असो ॥७१॥

कृतकृत्य परशुराम । चोहींकडे स्थापिला धर्म ॥
दाखवून क्षत्रिय कर्म । दत्ताश्रमीं तो राहिला ॥७२॥

भार्गवराम दत्तात्रेय । अेकच ते चैतन्यमय ॥
कश्यपादिक ऋषिवर्य । त्या सर्वांना नमन असो ॥७३॥

अत्रिअनसूयेसहित । श्री दत्तदेव मातापुरांत ॥
रेणुकादेवीही वास करीत । धन्य क्षेत्र हें भूलोकीं ॥७४॥

तीन तीर्थें व कृष्ण धात्री । हीं सर्व मोक्षद असती ॥
त्यांना असो भावें प्रणती । भार्गवराम सुखावले ॥७५॥

आंध्रिक राजपितर । दुर्गतीस गेले दुस्तर ॥
ते उद्धराया नरेश्वर । मातृतीर्थीं स्नान करी ॥७६॥

मग पितर मुक्त झाले । ते राजानें नेत्रीं पाहिले ॥
सर्व तीर्थ समर्थ भलें । तिसरें पद्मतीर्थ असे ॥७७॥



या सर्वांचा महिमा थोर । एकदां दत्त गुरुवर ॥
त्रिपुरा-महात्म्य अपार । भार्गवरामा सांगती ॥७८॥

ब्रह्मदेव प्रजापती । सर्व वेद विसरती ॥
कांहीं सुचेना तेव्हां येती । मातापुरीं त्रिपुरेकडे ॥७९॥

स्तविती वेदमाते त्रिपुरे । सकळ वेद मी विसरें ॥
कृपा कर आई त्रिपुरे । वेदज्ञान स्मरो मला ॥८०॥

त्रिपुरादेवी विश्वकारण । सांगे करीं दत्तस्तवन ॥
नंतर होईल वेदज्ञान । मग ते येती मजपाशीं ॥८१॥

मी सांगितलें विधीसी । ओंकाररूपी त्रिपुरेसी ॥
जी जननी असे सर्वांसी । तिला स्मरतां वेद स्फुरे ॥८२॥

ब्रह्मदेवें केलें स्मरण । सवेद ती देई दर्शन ॥
विधाता संतोष पावून । स्तवी तिला मजलाही ॥८३॥

घेऊन तिचा आशीर्वाद । ब्रह्मदेव जाती समोद ॥
अशी असे ही देवी सुखद । तीच रामा तव जननी ॥८४॥

रेणुराजानें तप करून । केली हिला पूर्ण प्रसन्न ॥
त्याच्या पोटीं जन्म घेऊन । रेणुका नाम पावली ॥८५॥

रेणुकादेवी तुझी माता । जमदग्नि शिवांश पिता ॥
जन्मा येसी अधर्मशास्ता । भार्गवा तूं विष्णुअंश ॥८६॥

करीत जावें तुझें कार्य । पुढें जन्मेल रामराय ॥
क्षत्रिय-तेज त्याला जाय । तुझ्या अंगीं वसतें जें ॥८७॥

विष्णुअंश राम नृपाळ । धर्ममार्ग तो चालवील ॥
मग तूं भार्गवा सुनिर्मळ । तप करीत रहावें ॥८८॥

तूं चिरंजीव अससी । सावर्णी महर्षि बनसी ॥
महाकल्पान्त समयासी । मम रूपीं सायुज्यता ॥८९॥

ऐकून हें दत्तचरण । राम पावला समाधान ॥
वंदीतसे दत्तचरण । भार्गवराम धन्य धन्य ॥९०॥

ब्रह्मचारी परशुराम । पृथ्वी जिंकी पण निष्काम ॥
कालासमान दावी धर्म । श्रीविष्णूला नमन असो ॥९१॥

काल काम परशुराम । त्यांना स्मरतां मिळे आराम ॥
श्री देव भार्गवराम । आशीर्वचन देतसे ॥९२॥

माघ कृष्ण अमावास्येस । सूर्य वळत उत्तरेस ॥
म्हणून होई माधवमास । ज्येष्ठ महिना त्याकाळीं ॥९३॥

पांच वर्षांचें आर्ष पंचांग । वैदिक गणना दावी सांग ॥
कृत्तिकांचा नक्षत्र भाग । सहा कृत्तिका पूर्ण करिती ॥९४॥

मागें चाळीसअंश गगनीं । मेषराशी नक्षत्र अश्विनी ॥
यांचा आरंभ एक धरूनी । निरयण राशी मोजणें ॥९५॥

परशुराम श्रेष्ठ वीर । स्थानें भारतीं पृथ्वीवर ॥
जगाचें दान केल्यावर । पश्चिम समुद्र हटविला ॥९६॥

कांहीं भूमि आली वरती । कांहीं भाग सागरीं बुडती ॥
कोकणांत पहिली वस्ती । परशुराम करीतसे ॥९७॥

पश्चिम समुद्राकडे स्थान । आहे प्रसिद्ध चिपळूण ॥
तेथें आतां तप करून । परशुराम गुप्त वसती ॥९८॥

तेथून सर्वत्र फिरती । भक्तलोकां अभय देती ॥
भक्तांसाठीं कळवळती । श्रीदेव विष्णु परशुराम ॥९९॥

परशुराम दत्तात्रेय । एकमेव ते अद्वितीय ॥
त्यांना अर्पण हा अध्याय । भक्तां देतसे विसावा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय २१ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः॥

ब्रह्ममाया श्रीगुरुदत्त । पुरुष प्रकृतीनें युक्त ॥
देव दत्तस्वरूप व्यक्त । लोकद्धार करावया ॥१॥

शुद्ध पवित्र शुचिर्भूत । निसर्ग देहा नग्न म्हणत ॥
सगुणरूप मायायुक्त । स्त्रीसह दत्त ब्रह्मरूप ॥२॥

ब्रह्ममय जीव होत । तेव्हां त्याची प्रकृति सान्त ॥
तोपर्यंत असतें द्वैत । अद्वैत स्थिति अंतींची ॥३॥

अद्वैतांतून होई द्वैत । तेव्हां विश्वाचा जन्म होत ॥
अखेर ते अद्वैतांत । लीन होईल, काळ दूर ॥४॥

ग्रहताऱ्यांनीं विश्व भरलें । म्हणून मणिद्वीप सगळें ॥
एक चैतन्य शक्ति खेळे । त्रिगुण युक्त सर्व असे ॥५॥

भूगोलीं आपण रहात । त्याला अनुसरून वदत ॥
असें असें ज्ञान निश्चित । पिंडीं ब्रह्मांडीं सर्व एक ॥६॥

पुरुष प्रकृतीनें नटला । सर्व विश्वांत आहे भरला ॥
स्त्रीपुरुष भेद नुरला । परी व्यवहार भेदाचा ॥७॥

विश्व जननीचा कांत । तोच श्रीगुरुदेवदत्त ॥
त्याला करून प्रणिपात । मागुया क्षेम सर्वांचें ॥८॥

देह किती येती जाती । तेथें कशाला कुणाची खंती ॥
लोक वस्त्रें बदलती । देह स्थिति तशी असे ॥९॥

जग प्रकृतीनें निर्मिलें । तिचींच सर्व मुलें बाळें ॥
मातापित्या वंदन केलें । म्हणजे प्रसन्न विशेष तीं ॥१०॥

ज्याप्रमाणें माताजनक । देवीदेव सर्वही एक ॥
व्यवहार पाळून लौकिक । मनीं एकात्मभाव हवा ॥११॥

कुलदेवता कुलाचार । यांचा करून आदर ॥
करावा चोख व्यवहार । जगीं कल्याण होतसे ॥१२॥



सर्व करून दत्तार्पण । करीत जावें असक्त मन ॥
सदोदित दत्तचिंतन । दत्तस्फुरण लाभतसे ॥१३॥

संकर्षण आदित्यमंडळ । फिरवी भोंवतीं हा भूगोल ॥
म्हणून या पृथ्वीवरील । स्वामी सूर्य श्रीविष्णू ॥१४॥

ध्रुव प्रदेशीं अतिशीत । त्या शेषभागीं वस्ती नसत ॥
तेथें सूर्यकिरण शांत । निद्रा घेती श्रीविष्णू ॥१५॥

बर्फ नाहीं वितळत । क्षीरसागर रूप व्यक्त ॥
सूर्यकिरण प्रवेशत । परी प्रखर ताप नसे ॥१६॥

सूर्याचे किरण प्रेरक । तसे वागती येथे लोक ॥
उत्तरायणीं शक्ति अधिक । देवयान मार्ग म्हणती ॥१७॥

विश्वजननीचा खेळ । अनंतकोटी ब्रह्मांडगोल ॥
त्रिगुणांचा सर्वत्र मेळ । ब्रह्मा विष्णु महेश ॥१८॥

श्रीविष्णु पृथ्वीचा पालक । तोच सूर्य प्राणधारक ॥
आधीं मध्यें अंतीं तारक । श्रीगुरुदत्ता नमन असो ॥१९॥

सर्व विश्वीं दत्त भरला । ब्रह्ममाया रूपें नटला ॥
जीव अज्ञानें गुरफटला । ज्ञानी शिव तपी शांत ॥२०॥

एकापासून दुसरें होत । पहिल्याचें कार्य संपत ॥
दुसरा मग विराजत । परंपरा जगीं दिसते ॥२१॥

चालाया सुवंशसातत्य । धर्म पाहिजे जना नित्य ॥
सृष्टीचें निरीक्षण सत्य । नियमें आपण करावें ॥२२॥

उत्तम बीज निवडून । शेतकरी ठेवी जपून ॥
त्याची पेरणी मग करून । धान्योत्पादन तो करी ॥२३॥

खत पाणी काल जमीन । यांचा विचार सूक्ष्म करून ॥
शेताचे करी संजीवन । राखण ठेवी चांगली ॥२४॥

असा लौकिक व्यवहार । तसाच करावा विचार ॥
म्हणजे पटे धर्माचार । धर्मवर्तनीं सौख्य असे ॥२५॥

जगीं नाना लोक असती । त्यांना हवी सुखी वसती ॥
अन्नवस्त्र गृहशांती उन्नति । प्राप्त करावया ॥२६॥

लालन पालन शिक्षण । मग उद्योगीं पदार्पण ॥
पतीच्या घराचें भूषण । सती अशी भार्या हवी ॥२७॥

वडील माणसांचा आदर । करून सांभाळणे इतर ॥
पतिसेवेसाठीं शरीर । शुद्ध पवित्र पत्नीचें ॥२८॥

स्वपत्नीची एकनिष्ठता । सौख्य देतसे पतिचित्ता ॥
हें जाणून घरीं वागतां । सुखी संसार होतसे ॥२९॥

पतीनेंही आपलें चित्त । पत्नीशीं ठेवणें सतत ॥
परस्परांनीं अनुरक्त । एकमेकां असणें शुभ ॥३०॥

अशा जोडप्याची प्रकृति । ठीक राहीनसे विकृति ॥
आरोग्य राहून संतति । सशक्त सुखी होतसे ॥३१॥

इंद्रियेसुखाचे आहारीं । न जातां रहावें संसारीं ॥
भाव ठेवावा जगदीश्वरीं । सौख्यनीतिधर्म सुखा ॥३२॥

मुलांचें करून संगोपन । लालन पालन पोषण ॥
कालानुसार शिक्षण । देऊन संसारीं सोडावें ॥३३॥

आपण आत्मसुखाचा मार्ग । नंतर धरावा साङ्.ग ॥
आसक्ति न ठेवितां जग । उदासीन समजावें ॥३४॥

श्रीगुरुदत्त दिगंबर । सुखाचा देऊन संसार ॥
मग दावितील नश्वर । सुखांत विरक्त असावें ॥३५॥

धन्याची करून चाकरी । बढती मिळे व्यवहारी ॥
एकनिष्ठा दावून पुरी । धन्याचा विश्वास लाभतो ॥३६॥

जन्म झाला या जगतांत । तरी सफल तो होण्याप्रत ॥
स्मरावे सदा श्रीगुरुदत्त । दृढ विश्वास ठेवून ॥३७॥

मग तो होऊं नेदी शीण । आड घालतो सुदर्शन ॥
भक्त कामना पुरवून । अंतीं देई सद्‌गती ॥३८॥



जरी प्रारब्ध अधिक उणें । तरी घटना घडविणें ॥
जीवनांत पूरक होणें । चित्तवृत्ति योग्य करी ॥३९॥

संचित प्रारब्ध क्रियामाण । आवश्यक बदल करून ॥
भक्ता देई सौख्यसोपान । क्षीण पातक होतसे ॥४०॥

पृथ्वीवरचे फेरफार । सदा चालती निरंतर ॥
वेद लोपती ते ईश्वर । युक्त तितके संरक्षी ॥४१॥

वेदव्यासांनीं वेदज्ञान । जमविलें सर्वत्र फिरून ॥
चार शिष्यांस पढवून । वैदिक संस्कृति राखिली ॥४२॥

चार वेदांचें यथासांग । ज्ञान शिकवून यज्ञ साङ्.ग ॥
करून उपनिषदमार्ग । लोकीं उन्नत ठेविला ॥४३॥

सहा शास्त्रें अठरापुराणें । तशीं वेदांगें उपपुराणें ॥
भक्तिज्ञान वैराग्य वचनें । व्यासकृपेनें लाभती ॥४४॥

इतिहास महाभारत । स्पष्ट करी सद्धर्म तत्त्व ॥
त्रिकाळ ज्ञान अबाधित । व्यास लिहून ठेविती ॥४५॥

विराट महाविराट ईश्वर । त्याचा न लागे कोणा पार ॥
अनंतकोटी जगदीश्वर । भगवंता नमन असो ॥४६॥

व्यासांनीं लेखन नसे केलें । असें कांहीं नाहीं उरलें ॥
व्यासोच्छिष्ट असे सगळें । व्यासगुरूंना नमस्कार ॥४७॥

सूर्या सोडून प्रभा नसे । चंद्रा सोडून शोभा नसे ॥
ब्रह्मा सोडून माया नसे । सर्वाधार परमात्मा ॥४८॥

ऐश्वर्य पराक्रम सत्ता । ज्ञान समृद्धि यशस्विता ॥
संपत्तिबल यांची एकता । प्रकृतींत नित्य असे ॥४९॥

म्हणून प्रकृति भगवती । भगवंतशक्ति भगवती ॥
सर्व करी सदा प्रकृति । तिला वंदन प्रेमानें ॥५०॥

आदिमाता विश्वजननी । ती भगवंतानुसारिणी ॥
अष्टगुणी भगरूपिणी । भगवतीस नमन असो ॥५१॥



सर्व गुणैश्वर्य संपन्न । महाविराट भगवान ॥
रोमरंध्रीं ब्रह्मांडस्थान । महाविराट प्रभूच्या ॥५२॥

चौदाभुवनें ब्रह्मांडांत । अशा ब्रह्मांडां नाहीं अंत ॥
प्रत्येकांत श्रीभगवंत । ब्रह्मांडरचना सारखी ॥५३॥

आपल्या पृथ्वीची फिरती । संकर्षण सूर्य घडविती ॥
आदित्यमंडलाची शक्ति । महाविराटापासून ॥५४॥

विश्वकारणाची शक्ति । तीच परमात्म्याची स्फूर्ति ॥
श्रीभगवंत भगवती । अभिन्न नित्य अनादि ॥५५॥

त्यांना असो भावें नमन । नेति नेति विश्वकारण ॥
वेद पाळिती जेथें मौन । तेथें वर्णन कोण करी ॥५६॥

सहस्रमुखीशेष थकला । त्याची कोण जाणेल कळा ॥
एकतत्त्व परब्रह्माला । सदाकाळ नमन असो ॥५७॥

सर्व कांहीं श्रीभगवंत । तो भावाचा भुकी असत ॥
त्याला करून प्रणिपात । शरण जावें सर्वदा ॥५८॥

दीनवत्सला भगवंता । तुला कळत सर्व व्यथा ॥
दु:ख हरून सुखदेता । मायबापा तूंच अससी ॥५९॥

तुला जोडतों दोन्ही पाणी । धांव पावगा चक्रपाणी ॥
श्रद्धा नित्य तुझ्या चरणीं । शुद्धभावें सदा असो ॥६०॥

शरणागताचा तूं आधार । तुजला देवा नमस्कार ॥
तुझें वर्णन करणार । असा भूमंडळीं नाहीं ॥६१॥

तूं अससी त्रिगुणातीत । तुझें वर्णन मग यथार्थ ॥
कोण करी त्रिगुणयुक्त । केल्या कितीसें सार्थ तें ॥६२॥

तूं सांवळा सुकुमार । नेससी अमोल पीतांबर ॥
मुकुट शिरीं मनोहर । सस्मित मुद्रा कशी वर्णू ॥६३॥

गळ्यांत दिसे वनमाळा । कौस्तुभ मणि फार शोभला ॥
भाळीं रेखिला नामटिळा । डोळे प्रेमें पाणावती ॥६४॥

कमरेस शेला बांधिला । अधांतरीं तूं विठ्ठला ॥
पुढ्यांत येऊन मजला । कृपाहस्तें कुरवाळिसी ॥६५॥

असे लेखन चालत । पुढ्यांत देवा तूं भगवंत ॥
ठेविसी तुझा प्रेमळहस्त । शिरीं माझ्या पांडुरंगा ॥६६॥

तुला सूक्ष्म न्याहाळुन । अंत:करण जाई भरून ॥
नाजूक कांति नीलवर्ण । तुला नमस्कार असो ॥६७॥

विष्टरावर उभा विठ्ठल । विष्टर ती वीट मंगल ॥
विठ्ठलाचें मुखकमल । राहो चित्तांत सदा माझ्या ॥६८॥

अनंत जन्मांचें सार्थक । पांडुरंगा तूं अलौकिक ॥
तुझ्या दर्शनें तूं-मी एक । भेद भाव मावळला ॥६९॥

माझे सद्‌गुरु दत्तदयाळ । त्यांच्या पदीं शिरकमळ ॥
त्यांचा आशीर्वाद मंगल । स्वप्न जागृतींत मिळे ॥७०॥

आतां येसी तूं पुढ्यांत । जागृत मी लेखन करीत ॥
भूगोलावर तूं भगवंत । सुकुमार सांवळा दिसतोसी ॥७१॥

जडदेहापरी रूप व्यक्त । तेथें खिळलें माझें चित्त ॥
सगुण परंतु जडातीत । पोटीं धरिसी दयाळा ॥७२॥

क्षुधा तृषा गेली निवून । अखंडपणें गुणलेखन ॥
होऊन तुझ्या पदीं लीन । व्हावें असें वाटतसे ॥७३॥

पंचभूतांचा हा जडदेह । झाला आतां तुझेंच गेह ॥
तव इच्छेचें जीवन इह । काय मागावें तुजपाशीं ॥७४॥

कांतासुत मुली दोन । तुझींच देवा बाळें सान ॥
त्यांना देसी आशीर्वचन । सुखी संसार होईल ॥७५॥

हेंच वचन सद्भक्तांस । दिलेंस देवा तूं लक्ष्मीश ॥
समस्त पूर्वज आणि वंश ।म्हणसी उद्धार होईल ॥७६॥

अखंड माझी भक्ति करावी । रूक्मिणी पांडुरंग मूर्ति ध्यावी ॥
माझी वस्ती नित्य बरवी । तुझ्या वंशांत होईल ॥७७॥



अशी वदसी गोडवाणी । तुला जोडतों दोन्ही पाणी ॥
विठ्ठला तूं समचरणी । भक्ताभिमानी श्रीविष्णू ॥७८॥

वडिलांनीं तुला आळविलें । त्यांच्या पोटीं मला धाडिलें ॥
राधागोपाळ दांपत्य भलें । त्यांना नमस्कार असो ॥७९॥

देवा तुझें स्वरूप पाहिलें । अंत:करण शांत झालें ॥
भूगोलावर तुझीं पाउलें । प्रसन्न विष्णू तूं उभा ॥८०॥

सद्‌गुरुराज दत्तात्रेय । तुझा अवतार ब्रह्ममय ॥
त्यांना जोडून हस्तद्वय । कायसें किती लिहावें ॥८१॥

जिवाशिवाची गाठ सुटली । शिवपार्वती विठू माउली ॥
दत्तात्रेय गुरुसाउली । जीव शिवांत मिळाला ॥८२॥

एकच तुम्ही श्रीभगवंत । आपणां असो प्रणिपात ॥
शिरावर विठ्ठलहात । श्रीपरमेशा नमन असो ॥८३॥

केशरकस्तुरीचा तिलक । देवा दिससी तूं सुरेख ॥
दु:ख संपून झालें सुख । आनंदमय सर्व असे ॥८४॥

ही माझी मानसलहरी । घडवी रामकृष्णहरी ॥
दत्तात्रेयगुरू गिरनारी । सर्व देवता गुरूरूप ॥८५॥

परमात्मा तत्त्व उदेलें । आजवरी नित्य पाहिलें ॥
देवता सान्निध्य राहिलें । परी आज आगळा क्षण ॥८६॥

साठांमधील दक्षदुहिता । विनता कश्यपताक्ष्र्यकांता ॥
गरुडा नमन त्यांच्या सुता । गरुडध्वजा नमस्कार ॥८७॥

गणेश विष्णु सविता । शिव देवी पंचदेवता ॥
सर्व एक गुरुदेवता । दत्तराया नमन असो ॥८८॥

या भूगोलावर आसक्ति । नाहीं ठरत कदा चित्तीं ॥
अनंत ब्रह्मांडींची वस्ती । पृथ्वी तेथें बापुडी ॥८९॥

भूगोलावर नाना देव । संत साधु दिव्य मानव ॥
जगीं कशास कलह सदैव । सर्वांचा एक पंथ असे ॥९०॥



नानाघटीं एक आकाश । तसा असे भूपरमेश ॥
तोच ओळखा मनीं उमेश । सर्वाधार परमात्मा ॥९१॥

जगीं नांदती नारीनर । त्यांचें असावें चित्त स्थिर ॥
म्हणून नाना जगीं आचार । मात्र मत्सर नको तेथें ॥९२॥

भिन्नत्वांत हवें एकत्व । हेंच मानवधर्मतत्त्व ॥
मनीं ठेवून अमरसत्त्व । वागतां समाधान होतें ॥९३॥

या विश्वधर्माचा प्रसार । सुख पावोत नारीनर ॥
या सूत्रांत खरोखर । परम पवित्र विश्वधर्म ॥९४॥

इहपर अखंड उन्नति । तेथें मृत्यूची नसे धास्ती ॥
जन्म मरणें सदा चालती । आत्मोन्नत्तीस बाधा नसे ॥९५॥

कसाही येऊं दे प्रसंग । सदा साह्यास पांडुरंग ॥
श्रीरंगाची शय्या भुजंग । गरुड वाहन जयाचें ॥९६॥

सर्पगरुड सदा वैर । परी विष्णु शांत निर्वैर ॥
शत्रुत्वांस निरंतर । समर्थ विष्णु सुखी असे ॥९७॥

हातीं धरिलें सुदर्शन । योगसंपन्न सदा मन ॥
त्याचें वाईट करील कोण । मेघ वर्ण हा स्नेहाचा ॥९८॥

धर्माचें व्हावया पालन । शक्तीस करावें आवाहन ॥
आठवून समचरण । निश्चित सदा असावें ॥९९॥

श्रीदत्तगुरु योगेश्वर । त्यांच्या चरणीं गोड सुंदर ॥
अध्याय अर्पिला रमावर । अेकविसावा भक्तांचा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय २२ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

ग्रहनक्षत्रें मणिमंडळ । विश्वांत सर्वत्र निर्मळ ।।
परमेश रूप विमल । विलसे नित्य चिदंशे ।।१।।

जें आहे तें सर्वदा राही । जें नाहीं तें कधींच नाहीं ।।
आत्मतत्त्व अमरग्वाही । सर्वात्मका नमन असो ।।२।।

सर्व कांहीं अेक असतां । अरिमित्रत्व तेथें वृथा ।।
पण जगाचा पाहातां प्रथा । जीवनकलह दिसतसे ।।३।।

छोट्यास खाई मोठा जीव । त्यामुळें वाढे वैरभाव ।।
मोठेपणाची सर्वा हांव । परंतु मोठें काय असे ।।४।।

जे असती निरिच्छ यती । सदा परमेश ज्यांचे चित्तीं ।।
समभावें नित्य वागती । त्या मोठ्यांना नमन असो ।।५।।

जगाच्या कल्याणा जन्मती । संतांच्या सर्वदा विभूती ।।
त्यांची परमहंस वृत्ती । जगीं असंग वागणें ।।६।।

चाले जगाचा खेळ सतत । सदा प्रकृति कार्यरत ।।
सर्व कांहीं त्रिगुणयुक्त । आत्मतत्त्वांत सर्व राही ।।७।।

त्रिगुणातीत झाली वृत्ती । मग कोठें नसे आसक्ती ।।
परमहसं पदाची प्राप्ती । निष्काम कर्में लाभतसे ।।८।।

असे साधु संत सज्जन । त्यांचें पहावें आचरण ।।
आणि करावें मनीं चिंतन । सर्व नाशवंत असे ।।९।।

त्याचा कशाला हवा हव्यास । विरक्ति शिकवावी मनास ।।
आळवावें दत्त पदांस । मन:शांति रहावया ।।१०।।

जो ब्रह्मांडे घडी व मोडी । त्याची असे जशी आवडी ।।
तसें वागावें घडी घडी । निष्ठा ठेवून दत्तपदीं ।।११।।

जी परिस्थिति प्राप्त झाली । ती देवाची आवड ठरली ।।
स्मरून भगवंत माउली । संतुष्ट वृत्ति असावी ।।१२।।



रजनीमागून दिनमणी । अशी ईश्वराची करणी ।।
सतत हवी अंत:करणीं । तदनुसार वागावें ।।१३।।

संसारीं सुस्थिति आली । ती ईश्वरकृपा चांगली ।।
मनीं मानून भक्ति भली । करावी अनन्य भावानें ।।१४।।

मग पुण्याई वर्धमान । दुराचरणें पुण्य क्षीण ।।
गोडवाणी निर्मळ मन । ठेवून प्रगति साधावी ।।१५।।

जरी कष्टदशा अपार । तरी स्मरून महेश्वर ।।
सर्व जनांचें निरंतर । कल्याण मनीं ठेवावें ।।१६।।

उन्नति आणि अवनती । या सदा जगीं चालती ।।
परंतु आपली मनोवृत्ती । दत्तचरणीं लीन हवी ।।१७।।

सर्वांचें कल्याण चिंतून । अनुकूलतेंत संवर्धन ।।
अवनतींत संरक्षण । दत्त भगवान करील ।।१८।।

धर्मवृषभाचे चार पाय । अंत:करण दयामय ।।
पवित्रपणा अंतर्बाह्य । सत्य आणि तपाचरण ।।१९।।

असें करितां धर्माचरण । तेथें तिष्ठतो नारायण ।।
सर्वकाळीं तो कल्याण । करील इहपर सारथि ।।२०।।

या भूमीवर आचार । करावयास देववर ।।
देई आपणां जन्म नर । म्हणून कृतज्ञता हवी ।।२१।।

त्याशीं एकनिष्ठ राहून । समाजीं करावें वर्तन ।।
सर्वांचें कल्याण चिंतून । दत्तस्मरणें रहावें ।।२२।।

सगळीकडे पृथ्वीवर । सदाकालीं परमेश्वर ।।
नानारूपांनी देई वर । पुरवी कामना भक्तांच्या ।।२३।।

ब्रह्मा विष्णु महेश्वर । श्रीदत्त श्रेष्ठ योगेश्वर ।।
सर्वां साष्टांग नमस्कार । त्रिगुणात्मका पाव गा ।।२४।।

ज्ञाताकडून अज्ञात । करावयास ज्ञान प्राप्त ।।
प्रतीकपूजा प्रस्थापित । ऋषि मुनींनीं केलीसे ।।२५।।



समाजहिताची वासना । ठेवून सांगती वचना ।।
त्यापरी करितां वर्तना । सुखानें सुख प्राप्त होतें ।।२६।।

विधिपुत्र पुलस्त्यापासून । विश्रवा पुढें वैश्रवण ।।
उत्तरेस राखी देवधन । यक्षराजा नमन असो ।।२७।।

विश्रवा पत्नी कैकसी । संध्याकाळीं प्रार्थी पतीसी ।।
ती वेळ दुष्ट संगमासी । दैवगति गहन असे ।।२८।।

भार्येस विश्रवा सांगत । तुजला होती पुत्र दैत्य ।।
ती प्रार्थी एकतरी सुत । सज्जन मला होऊं दे ।।२९।।

मग तो तथास्तु म्हणत । तसे तिला पुत्र जन्मत ।।
रावण कुंभकर्ण दैत्य । तिसरा भक्त बिभीषण ।।३०।।

कुबेरबंधु हे सावत्र । तपे विधीला तोषवीत ।।
इच्छित वर झाला प्राप्त । रावण कुंभकर्ण मातले ।।३१।।

देवनरां पीडिती उन्मत्त । ते विष्णूस भावें प्रार्थिती ।।
प्रसन्न विष्णु आश्वासिती । तुमच्या सुखा अवतरतों ।।३२।।

सूर्यवंशी दशरथानें । पुत्रकामेष्टि यज्ञ करणें ।।
तेथें येईन आनंदानें । देवीं व्हावें वानरादि ।।३३।।

हें ऐकून देव मनुष्य । आनंदे गेले स्वठायास ।।
दशरथ पावून हर्ष । यज्ञ करिता जाहला ।।३४।।

वसिष्ठ व ऋष्यश्रृंग । यज्ञ करविती यथा सांग ।।
अग्नि नारायण दिव्यांग । प्रकटून पायस देतसे ।।३५।।

दशरथ भार्या मुख्य तीन । त्यांना दिला पायस वांटून ।।
कैकयी-भाग झडपून । घार नेतसे आकाशीं ।।३६।।

वाऱ्यानें तो खालीं पाडिला । अंजनीहस्तीं सांपडला ।।
ती तो भक्षी गर्भ राहिला । प्रसवे पुत्र हनुमंत ।।३७।।

कौसल्या सुमित्रा स्वभाव । विभागून कैकयीस मग ।।
देती म्हणून दोन भाग । कैकयीस मिळाले ।।३८।।

तिघीही झाल्या गर्भवती । शेषशायी विष्णु श्रीपती ॥
कौसल्या-पुत्र रघुपती । सुमित्रे शेष लक्ष्मण ॥३९॥

कैकयीस पुत्र दोन । शंखभरत चक्रशत्रुघ्न ॥
चैत्र शुद्ध नवमीस जन्म । आनंदी आनंद सर्वत्र ॥४०॥

सूर्यवंश पुरोहित । गुरु वसिष्ठ शिकवीत ॥
श्रीरामादि प्रवीण होत । राज विद्येंत उत्तम ॥४१॥

रामा ब्रह्मविद्या शिकविली । श्रीरामें समाधि लाविली ॥
एक सर्वत्र सर्वकाळीं । परमेश्वर नटलासे ॥४२॥

असा घेऊन अनुभव । समाधि उतरी रमाधव ॥
अवतारकार्य केशव । श्रीरामचंद्र आचरिती ॥४३॥

ब्रह्ममंत्र चरु पवित्र । तो गाधिपुत्र विश्वामित्र ॥
यज्ञरक्ष राजपुत्र । नेण्या पातला अयोध्ये ॥४४॥

दशरथ राजा घाबरला । पण वसिष्ठें धीर दिला ॥
धाडी रामलक्ष्मणाला । विश्वामित्र मोदें निघे ॥४५॥

मिळाली ताटिका वाटेंत । श्रीराम दुष्टेला वधीत ॥
रामलक्ष्मण निर्भयचित्त । यज्ञरक्षणा सज्जले ॥४६॥

राक्षस यज्ञविध्वंसक । श्रीराम त्यांचा अंतक ॥
आर्य संस्कृति साधक । यज्ञसंपूर्ण रामबलें ॥४७॥

विश्वामित्रादि ऋषिगण । समाधान पावले पूर्ण ॥
इतक्यांत येई आमंत्रण । जनकाकडून लग्नाचें ॥४८॥

वाचिली पत्रिका सत्वर । असे सीतेचें स्वयंवर ॥
आदरें बोलवी नृपवर । गाधिजमुनि आनंदले ॥४९॥

जानकी सीता स्वयंवर । त्याला निघती ऋषिवर ॥
श्रीरामचंद्र रघुवीर । लक्ष्मणासह ऋषि नेती ॥५०॥

परमेश्वरी माया गहन । योग आणिते घडवून ॥
विश्वामित्र ऋषि महान । रामा नेती अत्याग्रहें ॥५१॥



जनक मिथिलाभूपती । निष्काम ते विदेहस्थिती ॥
त्यांचें घरीं एकदां येती । त्यांचे मित्र परशुराम ॥५२॥

लीलया राजास म्हणाले । मम काळकाम पूर्ण झालें ॥
शिववरदी धनुष्यभलें । तव गृहांत ठेवितों ॥५३॥

तवकन्या सीता कमला । पण लावीं स्वयंवराला ॥
सीता वरील वराला । जो या चापा गुण चढवी ॥५४॥

विष्णु अंश जो राजपुत्र । तो वळवील चाप पवित्र ॥
पुढें रक्षील धर्मछत्र । जनकभूप संतोषले ॥५५॥

स्वयंवरसिद्धतेचा पण । जनका आनंदवी पूर्ण ॥
जानकीकांत नारायण । जाणून मानी धन्यता ॥५६॥

परशुराम धनुष्य ठेवून । व जनकाचा निरोप घेऊन ॥
स्वकार्यास गेले निघून । कृतकृत्य मनीं होती ॥५७॥

जसा काल तसा अवतार । होऊन जगा दे आधार ॥
इहलोकीं नर शरीर । घेऊन वागे देव तसा ॥५८॥

करी आपण अध्ययन । आणि तप तीव्र करून ॥
शस्त्रें अस्त्रेंही मिळवून । शक्ति सामर्थ्य जमा करी ॥५९॥

स्वतः निरिच्छ राहून । धर्मासाठीं श्रीभगवान ॥
व्हावया साधुसंरक्षण । दुष्टहनन तो करी ॥६०॥

हेंच अवताररहस्य । जाणून पुढचें भविष्य ॥
करिती वर्तन अवश्य । प्रकृतिभेदाप्रमाणें ॥६१॥

त्याचे अंतरीं स्फुरें ज्ञान । तसा वागे नर भगवान ॥
त्या नमून संत सज्जन । ज्या त्या कालीं सुखावती ॥६२॥

अधर्महंता परशुराम । परी जनक मित्र परम ॥
जनकगृहीं पुरुषोत्तम । सुखें आरामा जातसे ॥६३॥

जनक ठरवी स्वयंवर । ऋषिमुनी येती नृपवर ॥
पाहुणे व जन इतर । रीघ लागली आनंदें ॥६४॥



जनकाची सर्व सिद्धता । जनकाची सीता दुहिता ॥
जनकाची भाग्यसरिता । उचंबळून येतसे ॥६५॥

स्वयंवरा सभा भरली । ऐके पण राजमंडळी ॥
पण सर्वांचीं तोंडें खालीं । रावणसुद्धां शरमला ॥६६॥

जयविजय द्वारपाल । रावण कुंभकर्ण खल ॥
जानकी कमलांश निर्मळ । पूर्व जन्मांत वेदवती ॥६७॥

सर्व वेद जन्मापासून । तिला पाठ येती म्हणून ॥
वेदवती म्हणती जन । तीव्र तप करी बाला ॥६८॥

रूपयौवन संपन्न । तिला पाही दैत्य रावण ॥
तिच्या आश्रमांत जाऊन । कामपूर्तीस ओढी तो ॥६९॥

तिनें दिला शाप दारुण । वंशासह येईल मरण ॥
विटाळलेला देह त्यजून । पुढें सीता बनली ती ॥७०॥

कोणी न उठे राजपुत्र । मग खुणावी विश्वामित्र ॥
दाशरथि राम पवित्र । उठतां सभा चमकली ॥७१॥

श्रीरामानें चाप घेतलें । वळवितांच तें मोडलें ॥
सीता जन्म सार्थक झालें । जयजयकारें नभ कोंदे ॥७२॥

श्रीराम उत्तम सुंदर । सीता पद्मिणी सुकुमार ॥
जोडा शोभला मनोहर । सर्वजण आनंदती ॥७३॥

लक्ष्मण भरत शत्रुघ्न । यांचेंही झालें तेव्हां लग्न ॥
जनक देई कन्या अन्य । आणि बंधूच्या दोन मुली ॥७४॥

उर्मिला मांडवी श्रुतिकीर्ती । दशरथाच्या सुना होती ॥
चार लग्नांचा थाट अती । मिथिलापुरी हर्षली ॥७५॥

चार जोडपीं सुशोभलीं । अयोध्ये चालली मंडळी ॥
मार्गीं अकस्मात भेटली । स्वारी भार्गवरामाची ॥७६॥

रामास देण्या क्षात्रतेज । मिथ्या क्रोध काढी सहज ॥
आणि म्हणे धनुष्य निज । मोडिलें रामा युद्ध करीं ॥७७॥

शिववरदी माझें चाप । अधार्मिकां दिधला ताप ॥
कां मोडिसी तुझा प्रताप । पाहुं दे मला यावेळीं ॥७८॥

दाशरथी वंदी भार्गवास । आणि लावी बाण चापास ॥
तों क्षात्रतेज मिळे रामास । परशुरामा अंगींचे ॥७९॥

विष्णु अंश उभयराम । तेव्हां दिसती मनोरम ॥
भार्गवास मिळे आराम । रघुराम शास्ता जाहला ॥८०॥

भार्गवराम सांगती । रक्षणें रामा धर्मनीती ॥
मी ब्राह्मण जीवनगती । यापुढें माझी तपकरणें ॥८१॥

दशरथादिक हर्षती । परशुराम तपा जाती ॥
येथें घडली दैवगती । नियतिकार्य पहावें ॥८२॥

क्षात्रतेंज रामास मिळे । दशरथ अयोध्ये आले ॥
रामसामर्थ्य दिव्य भलें । पाहून सर्व संतुष्ट ॥८३॥

वाटमारा कोळीवाल्या । नारदें बोधितां पस्तावला ॥
रामनाम जपूं लागला । बनला ऋषि वाल्मीक ॥८४॥

रची शतकोटी रामायण । त्रिभुवना करी पावन ॥
भक्त वत्सल भगवान । करी आचरण त्यापरी ॥८५॥

दुष्टभार जगीं माजला । मग ये देवा कळवळा ॥
धर्माचरणी सज्जनांला । धीर देतसे श्रीविष्णू ॥८६॥

श्रीविष्णु स्वयं भगवान ।नाना घटना कालासमान ॥
शुभाशुभ द्वंद्व खेळून । सत्त्या विजयी करीतसे ॥८७॥

निसर्गांतही फेरफार । बरे वाईट घडवी फार ॥
ईश्वरी लीला अनिवार । अखंड सूत्रें लक्षावी ॥८८॥

निर्गुण निराकार ब्रह्म । श्री पुराण पुरुषोत्तम ॥
सगुर रूपें दे आराम । निज भक्तांस सर्वदा ॥८९॥

ईश्वरानें जग निर्मिलें । तें त्यानेंच चालविलें ॥
ज्याला जी जी संधि मिळे । ती ती घ्यावी लोकहिता ॥९०॥



देवानें जें आपणां दिलें । तें हाताळणें चांगलें ॥
त्यामुळें चित्तवृत्ति निवळे । सर्वत्र अेक परमात्मा ॥९१॥

कोण कोणाचा नसे कोणी । सर्वच अेक चक्रपाणी ॥
त्याला जोडून दोन्ही पाणी । गोड वाणी उच्चारणें ॥९२॥

दिवसामागून रजनी । पुन्हां उगवे दिनमणी ॥
ही असे निसर्गकरणी । अनादि माया विश्वशक्ति ॥९३॥

खावें प्यावें मजा करावी । इतरांची चिंता मनीं नसावी ॥
ही वासना सदा चालवी । द्वेष मत्सर भांडणें ॥९४॥

परंतु विचार करावा । आहार निद्रा प्रत्येक जीवा ॥
मिळून जोडीचा विसावा । निर्भयानेंच पाहिजे ॥९५॥

आहार निद्रा भय मैथुन । सर्व जीवां असे समान ॥
त्यासाठीं नसावें भांडण । वागावें परस्पर पोषक ॥९६॥

हाच निसर्गाचा नियम । ऋषिमुनी दाविती धर्म ॥
सर्वांसि संधि पुरुषोत्तम । देऊन परीक्षा पहातसे ॥९७॥

त्याला जोडावे दोन्ही हस्त । सांगावें करूं नको मस्त ॥
नाना वासनांचा अस्त । तुझ्या प्रेमांत होऊं दे ॥९८॥

सर्वांना सौख्य मिळावें । हेंच मागणें देवा द्यावें ॥
मिळे त्यांत मन तुष्टावें । अंतीं स्मरण तुझें असो ॥९९॥

श्रीदत्त भार्गवराम । तोच श्री दाशरथिराम ॥
पुरविण्यास भक्तकाम । स्वीकारी अध्यायबाविसावा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय २३ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:॥

आजानुबाहु रामगुण । वर्णिती सदा प्रजाजन ॥
राघवबंधूंचें वर्तन । राम आज्ञेंत प्रेमानें ॥१॥

वृद्धपण दशरथाला । यौवराज्य रघुनाथाला ॥
द्यावयाचा विचार ठरला । पौरजन संमतीनें ॥२॥

अयोध्यापुरी आनंदली । देव मंडळीं चिंतावली ॥
म्हणे राम कोणत्या कालीं । रावणा आता मारील ॥३॥

मत्सरास देव धाडिती । तो प्रवेशे कैकयीचित्तीं ॥
नृपाची ती बहु आवडती । पूर्वीं वर दोन तिला ॥४॥

ते मागितले तिनें आतां । अेकें राज्य द्यावें भरता ॥
दुसऱ्यानें धाडा परता । चौदा वर्षे राम वनीं ॥५॥

हें ऐकून दशरथ । पडला खालीं निचेष्टित ॥
कैकयीहट्ट रामा कळत । राघव म्हणे न चिंता ॥६॥

रामें सर्वा समजाविलें । मातापित्या वंदन केलें ॥
आनंदानें रान गांठलें । सीता गेली रामासह ॥७॥

लक्ष्मणप्रीती रामीं बहुत । तोही वनवासी बनत ॥
कौसल्या सुमित्रादि रडत । सर्व प्रजा हळहळे ॥८॥

दशरथ रामचिंतनीं । प्राणच सोडी तयाक्षणीं ॥
भरत मातुलसदनीं । होता त्यास आणविला ॥९॥

अयोध्या शोकाग्नींत पडे । कैकयीनिंदा चोहींकडे ॥
वसिष्ठ सांगती बोल खडे । भरतशोका न पार ॥१०॥

तो मातेचा धिक्कार करी । रामाकडे निघे सत्वरी ॥
राघवाचे चरण धरी । विनवी यावें अयोध्ये ॥११॥

श्रीराम भरता सांगती । चौदा वर्षे भरल्यावरती ॥
येऊं उगीच नको धास्ती । वसिष्ठ म्हणती हें सत्य ॥१२॥

पितृकार्य करी श्रीराम । पित्या दिली गति उत्तम ॥
चित्रकूटनगीं आराम । रामदर्शनें सर्वजनां ॥१३॥

मी चौदा वर्षानंतर । येईन हें वचन स्थिर ॥
भरता जावें तूं माघार । राम निक्षून सांगती ॥१४॥

रामपादुका घेई भरत । म्हणे या ठेवून गादीप्रत ॥
चौदा वर्षे भरे पर्यंत । राज्यभार चालवीन ॥१५॥

तोंपर्यंत जरी न येसी । हा देह अर्पण तुजसी ॥
श्रीराम पुन्हां भरतासी । सांगती येऊं न चिंता ॥१६॥

मग भरत परतला । नंदीग्रामांत राहिला ॥
शत्रुघ्न अयोध्येंत आला । वागे भरतआज्ञेसम ॥१७॥

ऋषींचा निरोप घेऊन । श्रीराम निघती तेथून ॥
दक्षिणेस केलें गमन । नाना ऋषींस भेटती ॥१८॥

आले अत्रीच्या आश्रमांत । पूर्व मातापित्या नमीत ॥
तींही आशीर्वचन देत । राम दत्तांस वंदिती ॥१९॥

अवतारकार्य करावें । नामभेदें भिन्न स्वभावें ॥
अंतरीं अभेद असावें । दत्त सांगती एक आम्ही ॥२०॥

श्रीदत्तरूपीं सामावून । राम दिसती सुप्रसन्न ॥
त्यांना वारंवार नमन । आमचें असो सद्भावें ॥२१॥

अनुसूया सुचवी सीते । पतिव्रत्य आचरणातें ॥
आणि तयाच्या रक्षणातें । देई शक्ति दिव्यशी ॥२२॥

रामादि अत्रि आश्रमांत । पावले समाधान अमित ॥
खालीं दंडकारण्यांत । राम सावध प्रवेशती ॥२३॥

रानीं सीताराम लक्ष्मण । घेती ऋषींचें आशीर्वचन ॥
दैत्यांस टाकिती वधून । वन्य जनही सुखावले ॥२४॥

श्रीरामास ऋषि अगस्ति । सांगती विविध माहिती ॥
दिव्य बाणादिक अर्पिती । दैत्यनाश करावया ॥२५॥



दंडकारण्यीं गोदातीर । तेथें राही श्रीरघुवीर ॥
नाशिक पंचवटी थोर । तीर्थ पावन झालेंसे ॥२६॥

रावण म्हणे स्वमानसीं । थोर बळिया आपणांसी ॥
बंदींत घातलें देवांसी । मम आज्ञेंत वागती ॥२७॥

पंच महाभूतें राबवून । घेतों माझ्या इच्छे समान ॥
सागरीं असे माझें स्थान । भूमिवरही अजिंक्य मी ॥२८॥

मंत्र तंत्र यंत्रशक्ति । सदा स्वाधीन माझ्या असती ॥
जल स्थळ नभावरती । सत्ता माझी अनावर ॥२९॥

वेदज्ञान माझें अती । तशीच शंकराची भक्ती ॥
अपार ऐश्वर्य संतती । मायिक विद्या पूर्णपणें ॥३०॥

रावण राजा असुरांचा । शत्रु दैवी संस्कृतीचा ॥
जमाव करून दैत्यांचा । दडपी देवनरांस ॥३१॥

दानवी कला सर्व भूतांस । देती सदा विविध त्रास ॥
सर्वभूतहित होण्यास । सात्त्विक विद्या पाहिजे ॥३२॥

सत्त्वें सर्वां सुख होतसे । हीच आर्यसंस्कृति असे ॥
सर्वांची प्रगति होतसे । पूरक एकमेकांस ॥३३॥

पूर्वीपासून लढा होत । सत्त्व रज आणि तमांत ॥
देवसाह्य सत्त्वा करीत । असा अनुभव येतसे ॥३४॥

आसुर असतें दिखाऊ । सात्त्विक असतें टिकाऊ ॥
या दोघांचा असतो मेळु । राजसगुणीं सदैव ॥३५॥

सत्त्वगुणी असती देव । राजस गुणांत मानव ॥
तामसी ते दैत्य दानव । परपीडक नेहमीं ॥३६॥

सत्त्व गुणाची वाढ करून । नर पावती देवपण ॥
तामसाची कास धरून । बनती नर असुरादि ॥३७॥

सत्त्व प्रधान उपायांत । परमेशी अंश शोभत ॥
आत्मिक संतोष सर्वांत । दुर्गुण स्पर्धा न तेथें ॥३८॥



परंतु राक्षस संस्कृति । मोहवीतसे जगाप्रती ॥
तिच्या स्वीकारें ये आपत्ती । नाहीं प्रगति शांतीची ॥३९॥

सर्व जनांच्या हिताप्रती । जे सदा प्रयत्न करिती ॥
सन्मार्ग धरून चालती । त्यांना ईश्वर रक्षितो ॥४०॥

मदें स्वार्थे अन्या छळिती । अन्यायानें सत्य झांकिती ॥
ते अल्पकाल भर भरती । नाश पावती समूळ ॥४१॥

मोठा किंवा असो लहान । त्याचें हवें सदाचरण ॥
सर्वांस संधि दे भगवान । पण गर्वाचें घर खालीं ॥४२॥

रावण क्रूर महादैत्य । सीतेचा अभिलाष धरीत ॥
फारच झाला तो उन्मत्त । त्याचा मृत्यू जवळी ये ॥४३॥

खरादि राक्षस मारिले । लक्ष्मणें नाक कान कापिले ॥
शूर्पणखे विरूप केलें । असुरसंहार होतसे ॥४४॥

शूर्पणखा निंदी रावणा । तो मारीचा सांगे खुणा ॥
योजी उपाय दैत्य रक्षणा । तेच अपाय बनताती ॥४५॥

सुखाची वस्ती काननीं । जे नर नम्र ईशचरणीं ॥
तेच निभती कष्टांतुनी । अन्य संकटीं बुडतील ॥४६॥

राम ज्ञानी एकवचनी । एकबाणी विजयदानी ॥
दक्ष सात्विकरक्षणीं । फडशा पाडी दैत्यांचा ॥४७॥

मायावी राक्षसकपट । श्रीराम जाणती चोखट ॥
सीतेस सांगती संकट । येईल आतां सत्वर ॥४८॥

सत्त्वांशे रहा मम रूपीं । रजोगुणानें अग्निरूपीं ॥
तामसानें शरीर रूपी । आजपासून रहावें ॥४९॥

तुझा माझा घडे वियोग । असा येत असे प्रसंग ॥
जिरवून राक्षसांची रग । होऊं एकत्र सुखानें ॥५०॥

जे ईश्वरी गुणें शोभती । त्यांना होते समयस्फूर्ती ॥
अंतर्ज्ञानें गोष्टी कळती । होतसे प्रगति अखंड ॥५१॥

कांचनवर्णी एक मृग । रामाश्रमा पाशीं सवेग ॥
येतांच त्याचा पाठलाग । करी श्रीराम सीताग्रहें ॥५२॥

तो मायावी मृग मारीच । मरतांना ओरडे नीच ॥
रामासम शब्द खराच । काढून हाकारी लक्ष्मणा ॥५३॥

हें कपट म्हणे लक्ष्मण । पण सीता बोलली खोंचून ॥
लक्ष्मण रेषा ओढून । गेला साह्यास रामाच्या ॥५४॥

इतक्यांत भिक्षुक बनून । भिक्षा पुकारी रावण ॥
लक्ष्मणरेषा ओलांडून । भिक्षा घेऊन ये सीता ॥५५॥

रावणें तिला उचलून । नेतां व्यर्थ सीताप्रयत्न ॥
मागां जटायु पक्षी रण । करी दशमुख संतापे ॥५६॥

कपटें जटायूस मारून । लंकेंत पोंचला रावण ॥
अशोकवनीं दे ठेवून । सीतेस वश करूं पाहे ॥५७॥

आश्रमांत रामलक्ष्मण । येतां सीता नये दिसून ॥
वेडापिसा जणुं होऊन । कांतेसाठीं राम रडे ॥५८॥

वृक्षादिकां दे आलिंगन । ते चालले उद्धरून ॥
परीक्षे उमा सीता बनून । येई पण राम नमी ॥५९॥

ती तुळजापूर भवानी । श्रीराम नव्हते अज्ञानी ॥
श्रीरामचंद्र एक पत्नी । शिवपार्वती स्मरती ज्या ॥६०॥

राम दिसती दिव्य नर । पुढें हनुमंत वानर ॥
झाला शिष्य जोडून कर । सुग्रीवसखा राम बने ॥६१॥

सुग्रीव बंधु वाली वानर । त्यास रामें केलें ठार ॥
सुग्रीवास राज्याधिकार । आणि पत्नी मिळाली ॥६२॥

राम सर्वांचा आवडता । वीर निघती शोधण्या सीता ॥
हनुमंत झाला देखता । लंकेंत सीता तापसी ॥६३॥

रामानें खूण सांगितली । ती मारूतिलागीं पटली ॥
सीतेचीही खुणा घेतली । श्रीरामास समजाया ॥६४॥



हनुमंतास जाळण्यास । रावण त्याच्या शेपटीस ॥
वस्त्रें बांधून दे अग्नीस । कपिनें लंका जाळिली ॥६५॥

सैन्यहि पुष्कळ मारिलें । परतून रामा कळविलें ॥
रीसकपिसैन्य निघालें । युद्धार्थ सीतामोचनीं ॥६६॥

अंगद नळनीळ मारुती । जांबुवंत सुग्रीव निघती ॥
श्रीरामलक्ष्मण पाहाती । दक्षिण सागर आडवा ॥६७॥

तेथें राम स्थापी रामेश्वर । नळास माहीत सागर ॥
रामनामें रीस वानर । सेतु बांधिती नल हस्तें ॥६८॥

रावणबंधु बिभीषण । आला असे रामा शरण ॥
रावणाचें दुराचरण । त्याला पसंत नसेची ॥६९॥

रामास देव समजून । नित्य वागत बिभीषण ॥
राम सैन्य सेतुवरून । लंका बेटांत पोचलें ॥७०॥

वालीपुत्र अंगदास । राम धाडिती शिष्टाईस ॥
ती न रुचे दशभाषीस । सांगे अंगद येऊन ॥७१॥

रावण कुंभकर्ण दैत्य । इंद्रजितादि रावणसुत ॥
युद्ध करिती प्राणान्त । शस्त्रें अस्त्रें मायेनें ॥७२॥

लक्ष्मणादि वीर पडले । मग मारुति मेरू बळें ॥
आणून औषधें त्यावेळे । पुरवीतसे रामपक्षा ॥७३॥

सैन्य सुषेण जिवंत करी । मारुति ठेवून ये गिरी ॥
युद्ध केलें रीस वानरीं । राक्षस मेले अपार ॥७४॥

पाषाण वृक्षादि वानर । घेऊन लढले भयंकर ॥
इंद्रजित माते अनिवार । कपटी पूर्ण मायावी ॥७५॥

चौदा वर्षे ब्रह्मचारी । राहून उपास जो करी ॥
तो लक्ष्मण इंद्राजिता मारी । रावण करी आकांत ॥७६॥

अहीमही पाताळांत । रामलक्ष्मणा नेती गुप्त ॥
बळी देणारा तों हनुमंत । प्रकटून दैत्यां नाशिलें ॥७७॥



रावण कुंभकर्ण खल । जय-विजय द्वारपाल ॥
विरोधी भक्त अमंगल । रामें युद्धांत मारिले ॥७८॥

बिभीषणास राज्य दिलें । सीतेनें अग्निदिव्य केलें ॥
अग्नींत तेज दडविलें । तें मिळून शोभे ती ॥७९॥

देव सुटले बंदींतून । आनंद पावले ऋषिगण ॥
रामा देती आशीर्वचन । सर्व संतुष्ट जाहले ॥८०॥

रणीं रीस वानर मेले । ते रामानें जिवंत केले ॥
पुष्पक विमानीं बैसले । सर्वांसह रघुराम ॥८१॥

मार्गीं ऋषिवरां भेटून । नंदीग्रामीं ये विमान ॥
भरता भेटे रघुनंदन । भरतानंदा न सीमा ॥८२॥

वसिष्ठें मुहूर्त पाहिला । राज्याभिषेक रामा केला ॥
आनंदी आनंद भूमंडळा । सम्राट राजा श्रीराम ॥८३॥

सुग्रीव नलादि वानर । जांबुवंत रीस प्रखर ॥
बिभीषण राक्षस वीर । सन्मानून पाठविले ॥८४॥

हनुमंत परम भक्त । अग्निपायसें जन्मा येत ॥
राजाराम ठेवून घेत । श्रेष्ठ दास तो रामाचा ॥८५॥

वर्णाश्रम धर्म पवित्र । भूवर पाळिती सर्वत्र ॥
अधर्म नसे तिळमात्र । सर्व प्रजा सुखी असे ॥८६॥

सीताराम राज्य पवित्र । पूर्णायुषी जन सर्वत्र ॥
गाती सत्य रामचरित्र । नारी नर उद्धरती ॥८७॥

सीता रावणें नेली होती । तिला घेणें ही अधर्म रीती ॥
रजकबोल रामा कळती । त्रासले मनीं श्रीराम ॥८८॥

जानकी झाली गर्भवती । तिला डोहाळे राम पुसती ॥
सीता म्हणाली ऋषींप्रती । वनीं जाऊन पूजावें ॥८९॥

राम सांगती लक्ष्मणास । रानीं नेऊन मार सीतेस ॥
लक्ष्मण वनीं जानकीस । सोडून आला परतून ॥९०॥

रामास सांगे सीता मेली । राज्यीं अवर्षणें पडलीं ॥
इकडे सीता सांपडली । वाल्मिकींस ईशकृपें ॥९१॥

लवांकुश जानकीपुत्र । बाळलीला चित्र विचित्र ॥
वाल्मिकऋषि कृपापात्र । विद्या शिकून श्रेष्ठ होती ॥९२॥

श्रीराम अध्वमेध करी । शेवटीं लव अश्व धरी ॥
लवांकुश लढती भारी रामासही नाटोपती ॥९३॥

मग सर्वांची खात्री करून । पुत्रांसह जानकी रत्न ॥
वाल्मीक करिती स्वाधीन । राम स्वीकारी आनंदें ॥९४॥

गदाकुश लव कमल । श्रीराम सीता सुनिर्मळ ॥
अश्वमेध यज्ञ विमल । संपूर्ण झाला यथाविधि ॥९५॥

स्वधर्मानुसार निर्भय । प्रजा पावे सदा विजय ॥
पुरुषार्थ साधून त्रय । अंतीं गतीस जातसे ॥९६॥

मथुरापुरी अबूगिरी । इकडे वस्ती नवी धरी ॥
बंधूंस तिकडे राजे करी । श्री रघुपति प्रेमानें ॥९७॥

बहुतकाळ राज्य केलें । दुष्टांलागीं शासन झालें ॥
सज्जन चित्त आनंदलें । धर्माचा मार्ग चालविला ॥९८॥

लक्ष्मण भरत शत्रुघ्न । सीता लवांकुश हनुमान ॥
वसिष्ठशिष्य रघुनंदन । श्रीराम विष्णु भक्तसखा ॥९९॥

श्रीदत्तगुरु ज्ञानानंद । नाना रूपांनी भक्तां मोद ॥
प्रेमें देती विजयानंद । अर्पितां अध्याय तेविसावा ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय २४ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः॥

चंद्रवंशीं श्रीदत्तभक्त । यदुराजा बहु विख्यात ॥
यदुकुलीं श्रीभगवंत ।श्रीकृष्णलीला गाऊ या ॥१॥

मथुराभूप उग्रसेना । राक्षसपुत्र कंसराणा ॥
देवकीपुत्र वधी आपणा । आकाशवाणी कंस अैके ॥२॥

वसुदेवदेवकी दंपत्य । कंस टाकी कारागृहांत ॥
आणि मारी त्यांचें अपत्य । अशीं सहा मुलें मेलीं ॥३॥

वसुदेवाची दुजी पत्नी । राही गोकुळीं नंदसदनीं ॥
गोधनरक्षणा रोहिणी । पतिउद्योगीं लक्ष ठेवी ॥४॥

देवकीचा गर्भ सातवा । अपुऱ्या मासीं नष्ट व्हावा ॥
रोहिणीपोटीं तो वाढावा । दिव्य घटना चिंत्य असे ॥५॥

नंद वसुदेव जाणती। कंसादि गर्भ नष्टला म्हणती ॥
गोकुळांत रोहिणीसती । प्रसवे पुत्र बलराम ॥६॥

देवकीचा गर्भ अष्टम । विष्णुअंश पुरुषोत्तम ॥
देवकी तेज अनुपम । प्रसूतिकाल मध्यरात्रीं ॥७॥

महाविष्णु दर्शन देई । दिव्य पुत्र स्वयेंच होई ॥
मातापित्याचा खोडा जाई । दरवाजाही उघडला ॥८॥

द्वाररक्षक निद्रावश । वसुदेव नेई बालकास ॥
पर्जन्यपूर यमुनेस । श्रावण कृष्ण अष्टमी ॥९॥

चंद्राचा अंधुक प्रकाश । यमुना देई मार्ग विशेष ॥
पैल गोकुळीं कृष्ण परमेश । पोंचले त्यांना नमस्कार ॥१०॥

नंदगृहीं यशोदासती । तेव्हां कन्या प्रसवली होती ॥
तेथें वसुदेव ठेविती । दिव्य बालक आपुला ॥११॥

जणूं ठरविल्यासम प्रसंग । घडवी दैवी योगायोग ॥
कन्येलागीं घेऊन मग । वसुदेव आला स्वस्थळीं ॥१२॥



देवकी कन्या प्रसवली । कंसें आपटाया घेतली ॥
ती वीज बनून म्हणाली । तुझा शत्रु मी नव्हे ॥१३॥

तव रिपु गोकुळांत । असें सांगून झाली गुप्त ॥
कंस म्हणे विधिलिखित । कसें चुकेल कळेना ॥१४॥

दिव्य बाळ लखलखीत । नंदगृहीं असे जन्मत ॥
सुखसोहळा गोकुळांत । घडे नेहमीं कृष्णाचा ॥१५॥

मानवांची प्रगत योनी । विराजते स्वर्गभुवनीं ॥
दुष्टनाश कारस्थानीं । मानवां साह्य करीतसे ॥१६॥

कंसादि मातले असुर । देवां नरां त्रास अपार ॥
विष्णु सात्त्विक देववर । हन्ता आसुरी शक्तीचा ॥१७॥

त्याचा करिती पूर्वी धावा । श्रीविष्णु पावगा देवा ॥
सज्जनांचा प्राण विसावा । माधवा दुसरा नसेची ॥१८॥

नारायण सांगे वचन । मी येतसें अवतरून ॥
दुष्टांस करून शासन । चालवीन मार्ग धर्माचा ॥१९॥

हें ऐकतां विष्णु वचन । देवनरांचें तोषे मन ॥
अेकमेकां साह्य करून । दैत्य पाप वाढविती ॥२०॥

जगीं शक्ति दोन असत । म्हणून जगाचा खेळ होत ॥
दैवी शक्ति करिते हित । आसुरी खोटी नाशाची ॥२१॥

नरा आहे आत्मस्वातंत्र्य । योग्य मार्गानें होई मुक्त ॥
किंवा अनंत काळापर्यंत । जीव अज्ञानी राहीला ॥२२॥

देव योनी प्राप्त होण्यास । धरणें सात्त्विक मार्गास ॥
हाच पंथ भगवंतांस । पूर्णपणें आवडतो ॥२३॥

कठीण प्रसंग भयंकर । जरी येतसे महाघोर ॥
तरी स्मरावा परमेश्वर । तोच तारील सत्य हें ॥२४॥

दृष्टांत वा अन्यप्रकारें । तो सांगतो भक्तांस खरें ॥
तसें वागतां होतसे बरें । यांत संशय असेना ॥२५॥

आजवरी पुष्कळ घाले । वेळोवेळ असती आले ॥
ईश्वरा स्तवितां सगळे । नष्ट होती अनुभव हा ॥२६॥

मारण्या विष्णु श्रीकृष्णास । कंस काढी युक्त्या विशेष ॥
त्यांचा समाचार घेण्यास । कृष्ण प्रभु समर्थ असे ॥२७॥

पूतना नामें राक्षसीण । बाळां दे विषदुग्धपान ॥
स्तनपान मिषें तिला मारून । कृष्ण कृष्णानें टाकिली ॥२८॥

बकादि राक्षस अमित । विविध प्रकार योजीत ॥
पण कृष्णापुढें ते व्यर्थ । प्राणा मुकले दैत्यची ॥२९॥

गोकुळांत गाई पुष्कळ । रामकृष्ण बनती गोपाळ ॥
गुराख्यांचें प्रेम अढळ । कृष्णावर पूर्ण होतें ॥३०॥

कृष्ण गोपाळ खेळती खेळ । यमुनेंत असे डोह खोल ॥
तेथें कालिया सर्प खल । विषारी पाणी करीतसे ॥३१॥

त्यांत कृष्णें उडी मारून । कालियाचें केलें मर्दन ॥
धाडी समुद्रीं करून लीन । यमुनाजल शुद्ध बने ॥३२॥

ब्रह्मदेवें एकदां नेलीं । गोपाळांसह गुरें सगळीं ॥
कृष्ण निर्मी तशीं वेगळीं । विधि शरण येतसे ॥३३॥

इंद्र पाडी पर्जन्य अवखळ । गोवर्धन गिरि ते वेळ ॥
उचलून कृष्णें गोकुळ । रक्षिलें इंद्र शरण ये ॥३४॥

श्रीकृष्ण असे योगेश्वर । उत्तम सुंदर वेणुधर ॥
गोपींचें बसे प्रेम त्यावर । कृष्णीं ध्यान लागलें ॥३५॥

जें जें प्रिय गवळणींस । तें तें पुरवी कृष्ण रमेश ॥
वेगळा कृष्ण प्रत्येकीस । गोपीरंजन तो करी ॥३६॥

बाल आणि तरुण लीला । गोपींसह कृष्ण खेळला ॥
पण ब्रह्मचारीच राहिला । कृष्णलीला योगाची ॥३७॥

कृष्ण असे भारी खट्याळ । जमवी गोपाळांचा मेळ ॥
सदा चालती नाना खेळ । गोरस चोरी नेहमीं ॥३८॥



पण तेथें गोरसवृद्धि । कृष्ण कृपेनें सुख समृद्धि ॥
नंद यशोदा भाग्यसिद्धि । गोकुळ कृष्णीं रंगलें ॥३९॥

नंदराजा गोप गोकुळीं । यादवमित्र गोप गोकुळीं ॥
कंस शत्रु कृष्ण गोकुळीं । राधाकृष्ण वाढतसे ॥४०॥

कंस झाला चिंताक्रांत । म्हणे यज्ञ करावा येथ ॥
संधि साधून वधूं निश्चित । यज्ञार्थ कृष्णा आणूनी ॥४१॥

अक्रूरा गोकुळीं पाठविला । त्यानें विश्वास सांगितला ॥
कृष्णा सह नंद निघाला । गोकुळा कृष्ण आश्वासी ॥४२॥

मथुरेंत कृष्ण पोंचत । कंस कपटे कृष्णा कळत ॥
कृष्ण राम राक्षसां प्रत । यमसदना पाठिविती ॥४३॥

वसुदेवाचा कृष्ण बाळ । चुलत मामाचा असे काळ ॥
कंसा वधी कृष्ण गोपाळ । यादव कुल आनंदलें ॥४४॥

दैत्यलोक झणीं पळाले । मातापित्या लेक भेटले ॥
उग्रसेन राजे शोभले । सत्याचा जय निश्चित ॥४५॥

रामकृष्णांच्या मुंजी झाल्या । विद्येसाठीं उज्जयिनीला ॥
सांदीपनि गुरुगृहाला । रामकृष्ण मग जाती ॥४६॥

राम कृष्ण सुदामा तीन । मोठे होती विद्या शिकुन ॥
गुरुचा मृतपुत्र आणुन । गुरुदक्षिणा दिली कृष्णें ॥४७॥

गुरुजींचें आशीर्वचन । घेऊन गेले रामकृष्ण ॥
कंसमित्र करिती रण । परंतु कृष्ण नाटोपे ॥४८॥

विश्वकर्म्याकडून कृष्ण । करी द्वारका सुनिर्माण ॥
पश्चिम समुद्रीं श्रीकृष्ण । यादवांसह विराजती ॥४९॥

वासुदेव मुरबर्बरारी । दुर्जनां कृष्ण ठार करी ॥
काठेवाडीं जणु भूवरी । द्वारका इंद्रपुरी बने ॥५०॥

वैदर्भ राजकन्या रुक्मिणी । असे कृष्णाची मुख्यगृहिणी ॥
लग्नसमयीं त्यांच्या रणीं । कृष्ण मारी बहु शत्रू ॥५१॥



आणखीही भार्या सात । प्रसंगानें कृष्ण वरीत ॥
नरकासुर माजे अत्यंत । त्यास कृष्ण मारीतसे ॥५२॥

सोळासहस्र स्त्रिया बंदींत । त्यांना कृष्ण सोडून देत ॥
त्यांचें समाजीं व्हावया हित । कृष्ण सनाथ त्यांना करी ॥५३॥

श्रीकृष्ण असे योगेश्वर । बनला प्रत्येकीस वर ॥
सर्व बायकांसह संसार । करी संतति वाढली ॥५४॥

यादव वंश द्वारकेंत । संतति संपत्तीनें युक्त ॥
यादवांचें अैश्वर्य अमित । कृष्ण शत्रूंना न देखवें ॥५५॥

शिशुपाळ व वक्रदंत । जयविजय जन्मा येत ॥
कृष्णास छळिती अत्यंत । त्यांसी मृत्यु जवळी ये ॥५६॥

चंद्रवंशीं शंतनुनृपति । त्यांची गंगा निर्मला सती ॥
त्यांचा पुत्र भीष्म सुमति । हस्तिनापुरीं नांदतसे ॥५७॥

वसिष्ठनातू पराशर । ब्रह्मर्षि फिरती भूवर ॥
भार्येस शापिलें दुस्तर । धीवरकन्या ती झाली ॥५८॥

तिचे पुत्र महर्षि व्यास । आंचवले मातृ सुखास ॥
सत्यवतीचा असे वास । धीवरगृहीं मत्स्यगंधा ॥५९॥

प्रथमपत्नी गंगा गुप्त । शंतनु मनामध्यें झुरत ॥
मृगयेसाठीं जात वनांत । मत्स्यगंधेस पाहिलें ॥६०॥

सुंदर कन्या सत्यवती । आवडली शंतनु चित्तीं ॥
पण धीवर म्हणे नृपती । व्हावा वंश हिचाच ॥६१॥

शंतनूस नाहीं आवडलें । पण भीष्मास तें कळलें ॥
त्यानें घोर व्रत घेतलें । राज्य सोडून ब्रह्मचारी ॥६२॥

मग तो कोळी आनंदून । शंतनूस दे कन्यादान ॥
पिता भीष्मा आशीर्वचन । देई इच्छामरणी हो ॥६३॥

सत्यवतीस दोन सुत । अेक मृत अविवाहित ॥
निपुत्रिक दुसरा मरत । त्याला भार्या दोन होत्या ॥६४॥

भीष्म नियोग नाकारीत । प्रतिज्ञा पाळी तंतोतंत ॥
सत्यवती वंशार्थ सांगत । व्यासा नियोग आचरिण्या ॥६५॥

व्यास महर्षि तेजवान । भोग देतां प्रथम सून ॥
अंबिका राही नेत्र मिटून । अंध धृतराष्ट्र पुत्र जन्मे ॥६६॥

फिकी अंबालिका म्हणून । पुत्र पंडू कर्पूर वर्ण ॥
दासी निःशंक रमून । अव्यंग विदुरा प्रसवली ॥६७॥

धृतराष्टकांता गांधारी । पंडूच्या दोन कुंती माद्री ॥
लहानपणीं कुंती करी । दुर्वाससेवा चांगली ॥६८॥

पुत्रमंत्र ते सहा देती । एक जपे कुमारी कुंती ॥
सूर्य तेजानें गर्भप्राप्ती । कानीन पुत्र कर्ण जन्मे ॥६९॥

नदींत दिला त्या सोडून । सांपडे सूता तोच कर्ण ॥
पांच मंत्र मग पाळून । ठेवी कुंती अत्यादरें ॥७०॥

पुत्राविणें पंडू झुरत । कुंती सांगे मंत्र आहेत ॥
पंडु आज्ञेनें ती जपीत । यम वायु इंद्रमंत्र ॥७१॥

क्रमें धर्म भीम अर्जुन । कुंतीस झाले पुत्र तीन ॥
माद्रीस दिले मंत्र दोन । अश्विनी कुमार देवांचें ॥७२॥

तिला नकुल सहदेव । पंडूस पुत्र पांच पांडव ॥
दिव्य गुणांचे ते मानव । श्रीकृष्णभक्त उत्तमसे ॥७३॥

गांधारीसही गर्भ राहिला । पण ज्येष्ठ धर्म जन्मला ॥
म्हणून क्रोधें ती पोटाला । दडपी तेव्हां गर्भ पडे ॥७४॥

मग त्याचे भाग करून । व्यासकृपें केलें जतन ॥
त्यांत प्रथम दुर्योधन । जन्मतां दुश्चिन्हें जाहलीं ॥७५॥

व्यासादि सांगती द्या फेकून । मग पावाल समाधान ॥
नाहींतरी अति दारुण । वंशक्षय होईल ॥७६॥

परी पुत्राचा कळवळा । दुर्योधना जतन केला ॥
शंभर पुत्र गांधारीला । कौरव त्यांसी म्हणताती ॥७७॥



पंडूराजा मूर्धाभिषिक्त । वनीं त्याला मरण प्राप्त ॥
पुत्र-पालना कुंती रहात । माद्री करी सहगमन ॥७८॥

राज्यधारक धृतराष्ट । भीष्म त्यासी संरक्षित ॥
कौरवपांडवां विद्येप्रत । कृप व द्रोण गुरु होते ॥७९॥

कौरव पांडव विद्या शिकले । अर्जुनें प्रावीण्य दाखविलें ॥
दुर्योधनें पांडवांस छळिलें । अतिक्रोधें अव्याहत ॥८०॥

अर्जुनानें पण जिंकून । मिळविलें द्रौपदी रत्न ॥
वनींच्या आर्ष विधीनें लग्न । तिचें जाहलें पांडवांशीं ॥८१॥

धृतराष्टानें राज्य वांटिलें । इंद्रप्रस्थीं पांडव गेले ॥
हस्तिनापुरांत राहिले । धृतराष्ट भीष्म द्रोणादी ॥८२॥

पांडवयज्ञ राजसूय । कृष्णकृपें तडीस जाय ॥
जरासंधादि दुष्टराय । पांडव हस्तें निमाले ॥८३॥

राजसूय यज्ञ सभेंत । कृष्णाची अग्रपूजा होत ॥
भीष्मादिकही आनंदत । परी शिशुपालें निंदिलें ॥८४॥

त्या मारिलें उत्तर देऊन । म्हणून कृष्णावर खवळून ॥
वक्रदंत द्वारके गमन । करी त्या मर्दी श्रीकृष्ण ॥८५॥

जयविजय शापमोचन । झालें घेऊन जन्म तीन ॥
जयविजयां पूर्व स्थान । विष्णुकृपेनें मिळालें ॥८६॥

दुर्योधनादि दुष्ट दुर्जन । धर्मराज बहु पुण्यवान ॥
त्यांना कौरवांनीं फसवून । जुगारांत नागविलें ॥८७॥

कौरव पांडव-गुरु द्रोण । भीष्मादिक वडीलजन ॥
त्यांच्यासमोर झाला यत्न । लज्जा घेण्या द्रौपदीची ॥८८॥

तेव्हांच द्रौपदी पांचाली । कौरवांस चित्तीं जाळी ॥
वृद्ध म्हणती तया वेळीं । कौरव-शील संपलें ॥८९॥

द्रौपदी करी कृष्ण चिंतन । पांडवसखा कृष्ण भगवान ॥
असंख्य वस्त्रें पुरवून । गुप्तपणानें संरक्षी ॥९०॥



पांडव द्रौपदीसहित । वनवासा निघून जात ॥
हस्तिनापुरीं मग पाळीत । विदुर कुंतीस वगैरे ॥९१॥

वनवास अज्ञातवास । पूर्ण करून कौरवांस ॥
पांडव सांगती स्वराज्यास । देऊन टाका सुखानें ॥९२॥

तें कौरव न मानिती । त्यांना बळाचा गर्व अती ॥
श्रीकृष्ण पांडव सारथी । नेणती मूढ नष्टात्मे ॥९३॥

अठरा दिवस भयंकर । युद्ध करिती रण-वीर ॥
दुर्योधनादि झाले ठार । जयश्री वरी पांडवांना ॥९४॥

धर्मराज सम्राट नृप । घालविण्यास युद्ध पाप ॥
अश्वमेध करी, निष्पाप । होऊन जगीं शोभला ॥९५॥

दुष्टभार फार माजला । म्हणून विष्णु अवतरला ॥
सज्जनांस आनंद दिला । धर्म चालवी धर्मराज ॥९६॥

आपसांतील भारती युद्ध । करण्या पार्था झाला खेद ॥
कृष्ण सांगे गीता-प्रबोध । निष्काम कर्म करावें ॥९७॥

कर्ता करविता ईश्वर । तेथें निमित्त असे नर ॥
लोकसंग्रह धर्म थोर । ईश चिंतनी रहावें ॥९८॥

अनुराधा प्रथमचरणीं । सूर्य वळे विषवु दक्षिणीं ॥
धनिष्ठा चतुर्थ चरणीं । आरंभ उदग यनाचा ॥९९॥

तेव्हां धर्माचें राज्यशासन । श्रीकृष्ण तोच दत्त भगवान ॥
चोविसावा अध्याय पूर्ण । श्रीदत्त घेती भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु

## अध्याय २५ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:।

सूर्याचा प्रकाश अमित । असे भास्कर असंख्यात ॥
मणिद्वीपांत वावरत । ब्रह्ममाया शक्तीनें ॥१॥

चैतन्यांत विश्व समस्त । विश्वांतही चैतन्य असत ॥
चैतन्यमय द्वैताद्वैत । हरिची माया सर्व करी ॥२॥

आत्मज्योति चैतन्यमय । तेथें अन्य कसलें काय ॥
परमात्मा पद अव्यय । सर्वाधारच परमात्मा ॥३॥

सर्वत्र राहिला भरून । देई जन्म करी पालन ॥
भूत भविष्य वर्तमान । काळीं सारखा सदा असे ॥४॥

भूमातेचा आत्मा सूर्य । सूर्य मालेंत करी कार्य ॥
त्याला मानून शिरोधार्य । सृष्टिक्रम चालतसे ॥५॥

त्याची करण्या उपासना । ग्रह घालिती प्रदक्षिणा ॥
शोषून भास्करकिरणा । स्वगृहांत सुखी होती ॥६॥

ग्रह अथवा उपग्रह । जो जो फिरतो पृथ्वीसह ॥
त्याचा त्याचा परिणाम इह । कालत्रयीं चुकत नसे ॥७॥

त्यांचे किरण येथें येती । भूकिरण त्यांचे वरती ॥
एकमेकांत मिसळती । कार्य सदोदित चालतें ॥८॥

तसेच तारकांचे किरण । सर्वांचें होतसे मिश्रण ॥
सर्वांमध्यें एकच प्राण । कार्यरत सदा असे ॥९॥

त्यांचा चालक आत्माराम । श्रीपुराण पुरुषोत्तम ॥
त्याचें सतत घेऊन नाम । भक्तजन सुखी असे ॥१०॥

तो अवतरून पृथ्वीवर । साधुसंतांस देई धीर ॥
दुष्टांचा करून संहार । धर्ममार्ग शुद्ध करी ॥११॥

पृथ्वी समुद्रवलयांकित । कृष्णकृपें धर्म पाळीत ॥
सर्वांचा विश्वास संपादित । आणि रक्षण धर्म करी ॥१२॥



कृष्ण मुरारी गरुडध्वज । द्वारका करी स्थान निज ॥
पश्चिम देशीं अधोक्षज। भक्ति तेव्हां पसरली ॥१३॥

तिकडील राष्टांचा ध्वज । याची साक्ष देई सहज ॥
गरुडांकित त्यांचा ध्वज । श्रीकृष्णमहिमा दर्शवी ॥१४॥

यादव वीर बळवंत । संतति संपत्तीनें युक्त ॥
पश्चिमेस संबंध जडत । कृष्ण देवा नमन असो ॥१५॥

वसुदेवसुत भगवंत । कंस चाणूरादिकां वधींत ॥
देवकी परमानंदयुक्त । वंदन कृष्णा जगद्‌गुरो ॥१६॥

अर्जुना निमित्त करून । सांगे शाश्वत तत्त्वज्ञान ॥
उपनिषद गाईंचें दोहन । करून पार्था दुग्ध पाजी ॥१७॥

जे जे प्राणी आतां दिसत । ते पूर्वींही जगीं असत ॥
पुढेंही ते येती सतत । जन्ममरण नित्य आहे ॥१८॥

आत्मतत्त्व सदा अमर । त्याला न जाळी अग्नि प्रखर ॥
किंवा शुष्क न करी समीर । शस्त्रें त्याला न छेदिती ॥१९॥

पाणी त्याला भिजवीत नाहीं । तें डोळ्यांनीं दिसत नाहीं ॥
बुद्धीच्या पलीकडे राही । म्हणून ज्ञानगम्य असे ॥२०॥

त्याचा नाश कोणी न करी । देहांतही तो निर्विकारी ॥
श्रद्धाभक्तीनें धारणा धरी । तेथें ध्यानीं गवसे तो ॥२१॥

वस्त्रापरी देह असती । किती शरीरें जाती येती ॥
जुनीं टाकून नवीं घेती । तोच मृत्यू आणि जन्म ॥२२॥

तो कोणा नाहीं चुकत । जो जो पुण्यकर्म करीत ॥
तो स्वर्गादि लोकीं जात । नरकांत जाई पातकी ॥२३॥

परमात्मा एक सर्वांत । हें जाणून जे वर्तत ॥
तेच साधु सिद्ध महंत । मानवधर्म श्रेष्ठ त्यांचा ॥२४॥

व्हावें समाजाचें धारण । आणि इहपर कल्याण ॥
यासाठींच धर्म निर्माण । केला असे पूर्वकाळीं ॥२५॥



जो करी धर्माचें पालन । त्याचें धर्म करी रक्षण ॥
कालानुसार आचरण । नित्य परमात्मा मानसीं ॥२६॥

मागें जरी दुष्टाचरण । तरी विवेक उद्भवून ॥
दुष्ट बनती संतसज्जन । धर्ममार्ग चालविती ॥२७॥

नानाविध सुखें जगांत । तीं आपणां व्हावीं प्राप्त ॥
म्हणून देवाकडे चित्त । लावून भजती बहुलोक ॥२८॥

आर्त जिज्ञासु अर्थी ज्ञानी । त्यांना देव आपुले मानी ॥
सर्वही ईश्वराचे प्राणी । देव निष्ठा तारी सदा ॥२९॥

एकदां जरी मनापासून । आठविले हरिचरण ॥
तरी तो दत्त भगवान । महाभयही निवारी ॥३०॥

सगुण दर्शन किंवा ज्ञान । झाल्यास अंतीं लागे ध्यान ॥
अधोगति जाई चुकून । हरिची कृपा होतसे ॥३१॥

जन्म पालन मरण । रज सत्त्व तमोगुण ॥
करिती परंतु भक्तजन । भावें गुणातीत होती ॥३२॥

माती लांकूड सुवर्ण । गोब्राह्मण चांडाल श्वान ॥
यांत समान ज्याचें मन । त्याची बुद्धि स्थिर झाली ॥३३॥

विचारानें आत्मसाधन । किंवा असक्त कर्म करून ॥
दृढ भक्तीनें देवा भजून । ब्रह्मनिर्वाण साधतें ॥३४॥

उत्कर्षाचें वातावरण । भूत भविष्य वर्तमान ॥
तेथें भगवंतअधिष्ठान । प्रकर्षानें वसतसे ॥३५॥

सर्वही कालाच्या स्वाधीन । विश्वरूपी काल भगवान ॥
दिव्य दृष्टीनें अवलोकून । भक्त विनम्र होतसे ॥३६॥

सगुण भक्ति मानवां सोपी । ईश्वरकर्म सर्वव्यापी ॥
स्वत:चे अर्पून त्या निष्पापी । असंग वृत्तींत रहावें ॥३७॥

ईश्वराचें सर्वही काम । जाणून व्हावें स्वयें निष्काम ॥
ईश्वराची कीर्ति परम । गात चिंतींत रहावी ॥३८॥

व्हावें ईश्वरपरायण । निर्वैर ज्याचें अंतक:रण ॥
त्याचें शाश्वत ठिकाण । पुरुषोत्तमांत निश्चित ॥३९॥

जेव्हां येई प्राण्या मरण । देवयानीं सूर्याकर्षण ॥
पितृयाणीं चंद्राकर्पण । होऊन पुन्हां येत येथें ॥४०॥

कल्याणकारी ज्याचें काम । मेल्यावर त्या मिळे आराम ॥
असक्त नरास पुरुषोत्तम । नेतसे स्थानीं आपुल्या ॥४१॥

अनंत कोटी ब्रह्मांड नाथ । त्याचे भक्त नाहीं अनाथ ॥
सज्जनांस करी सनाथ । दत्तात्रेय नमन असो ॥४२॥

स्मरण ज्ञान विस्मरण । सर्व करी रमारमण ॥
स्वभावें घडे आचरण । अशी जेव्हां वृत्ति बने ॥४३॥

तो असतो त्रिगुणातीत । जरी शरीर कार्यरत ॥
कर्मयोगी लोकीं म्हणत । पण ज्ञानांत कर्म संपे ॥४४॥

सिद्धांचा व्यवहार सिद्धांस । व्हावें विनम्र त्यांचे पदांस ॥
मायेकडून सृष्टिकार्यास । जगन्नायक चालवी ॥४५॥

ज्याकालीं जें कर्तव्याचरण । तें आठवून समचरण ॥
लावून कार्यीं अंत:करण । अभिरत मनें करावें ॥४६॥

यशापयशीं सम राहून । चित्त ठेवावें समाधान ॥
कोणतें ही काम घडून । येण्यास पांच कारणें ॥४७॥

अधिष्ठान कर्ता साधन । विविध घटना भिन्न भिन्न ॥
उत्तरोत्तर तीं बलवान । पांचवें दैव दुस्तर ॥४८॥

असतां अनुकूल हीं पांच । कार्य होतसे नित्य साच ॥
अपयशीं नको मना जाच । सर्व सत्ता श्रीहरिची ॥४९॥

यश मिळतां येथें सुख । कर्तव्यीं मरण स्वर्गीं सुख ॥
मनास नको कधींच दु:ख । करितो सर्व परमेश्वर ॥५०॥

यंत्रारूढ प्राणिमात्र । तेथें कसलें आत्मतंत्र ॥
ईश्वरी प्रेरणेचें सत्र । सदाकाळ चालतसे ॥५१॥



धर्माचार स्थिर होण्यास । चमत्कृति करी रमेश ॥
भक्ताची पुरवून आस । समत्व राखी भक्त सखा ॥५२॥

ईश्वराची प्रेरणा होत । तसा मनुष्य असे वागत ॥
आसुरी अहंकार धरीत । बुद्धि भ्रष्टता नाशाची ॥५३॥

सर्वांस हवा गोड ग्रास । त्यांत हवेत सहा रस ॥
तर आरोग्य मिळतें सरस । ईश्वरकरणी लक्षावी ॥५४॥

खारट आंबट तिखट । गोड कडू तसा तुरट ॥
रसाळ स्निग्ध हृद्य पिष्ट । तुष्ट गृहांत सौख्य असे ॥५५॥

जाणून योग्यता कालमान । राज्यीं पाहिजे समाधान ॥
मग सर्वां आनंदसदन । मधूर घांस मिळे तेथें ॥५६॥

तपाचरणें सत्ता मिळते । अनीतीनें भंग पावते ॥
मानवता जेथें वसते । तेथें सत्य सदा विजयी ॥५७॥

कृष्ण भगवान मायातीत । मायायुक्त अवतार घेत ॥
मानवी शरीर जरी गुप्त । तरी तो भक्तांजवळ वसे ॥५८॥

कृष्णाचा उद्धव परम भक्त । म्हणे तूं देवा जरी अव्यक्त ॥
भक्तांसाठीं होतोस व्यक्त । तुला नमन प्रेमभरें ॥५९॥

तुझे ऐकावे मधुरबोल । अशी मना सदा तळमळ ॥
आत्मोद्धार मार्ग प्रेमळ । दयार्द्र दृष्टीनें सांगावा ॥६०॥

उद्धवाचा प्रश्न ऐकून । सांगती श्रीकृष्ण भगवान ॥
दहा इंद्रियें आणि मन । नित्य ठेवा माझ्याकडे ॥६१॥

बुद्धिपूर्वक करणें काम । किंवा घडे स्वभावकर्म ॥
तें मानून ईश्वरीकर्म । त्यालाच अर्पण करावें ॥६२॥

मोक्ष प्राप्तीचें साधन । सर्व करावें कृष्णार्पण ॥
सर्वच असे नारायण । अशी भावना दृढ हवी ॥६३॥

सर्वही वासना सोडून । मुनी पावती ब्रह्मस्थान ॥
उद्धव म्हणे सत्यवचन । पण सोपा मार्ग सांगा ॥६४॥



उद्धव आवडता भक्त । पुन्हां सांगती भगवंत ॥
पूर्वज यदु दत्तभक्त । अवधूतगुरु प्रसिद्ध ॥६५॥

प्रत्यक्ष आणि अनुमान । विचारें करावें वर्तन ॥
भक्तांसाठी श्री भगवान । भक्तवरद बनतसे ॥६६॥

अवधूत सिद्धप्रसाद । होतां सदूस परमानंद ॥
दृढ भावानें ब्रह्मानंद । लाभून भक्त मुक्त होई ॥६७॥

सर्व विश्वांत परमेश्वर । त्याचीच लीला निरंतर ॥
अंत:करण त्याचेवर । ठेवनू भक्त सदा तरे ॥६८॥

सहज व्हावया विरक्त । मानावें माझे नसे किंचित ॥
सर्व घडवी श्रीभगवन्त । त्याचेंच दास्य करावें ॥६९॥

सेवका स्वामीची आज्ञा मान्य । तसें करावें धर्मपालन ॥
समाज धारणावर्तन । धर्माचरण होतसे ॥७०॥

संसारी जीव तरण्यास । देव चरित्रें देह मनुष्य ॥
तीं चिंतून श्री परमेश । भक्तीचे मनीं राहातसे ॥७१॥

जागृतीं स्वप्नीं व निद्रेंत । भक्तीचे मनीं श्री भगवंत ॥
ईश्वरमय होई चित्त । ब्रह्मनिर्वाण अखेर ॥७२॥

संसारांत प्रिय विषय । त्यांत मन गढून जाय ॥
तसें मन ईश्वरमय । अभ्यासानें बनतसे ॥७३॥

देवावर असावा भाव । मग तेथें उभा मी देव ॥
हें ऐकून भक्त उद्धव । कृष्णपदीं रंगतसे ॥७४॥

यदुवंशांत योगेश्वर । कृष्ण अवतरे देववर ॥
त्याला साष्टांग नमस्कार । दास मागे तव सेवा ॥७५॥

द्वारकेंत नांदे श्रीकृष्ण । पंढरपुरांत श्रीकृष्ण ॥
प्रत्येकाच्या मनांत कृष्ण । कृष्णमयच सर्व असे ॥७६॥

पुंडलीक भक्तवरद । विठ्ठल पांडुरंग पद ॥
समचरण भक्त सुखद । भक्तांस नित्य तारिती ॥७७॥

त्याचे पदीं असो मन्मन । पांडुरंग दत्त भगवान ॥
श्री पांडुरंग दयाघन । मंदस्मित मनीं माझ्या ॥७८॥

भूक नसे नाहीं तहान । त्याचे दर्शनें मन तल्लीन ॥
रुक्मिणी पांडूरंग ध्यान । लक्ष्मीश दत्त उभा मनीं ॥७९॥

भक्तांकडे दृष्टि द्रवून । प्रेमें करी अवलोकन ॥
त्यामुळें भक्त समाधान । होई नरजन्म सार्थक ॥८०॥

दत्तकृपेचा अगाध महिमा । यदुवंशांत पुरुषोत्तम ॥
पाहून तेथें रमे रमा । भक्तकल्याण होतसे ॥८१॥

इहपर होतसे क्षेम । योग्यवेळीं निर्गुण ब्रह्म ॥
देव चालवी योगक्षेम । अनन्य भक्ताचा सर्वदा ॥८२॥

पुण्याचरणें स्वर्गस्थान । स्वर्गांत होतां पुण्य क्षीण ॥
श्रीमंत कुलांत जनन । किंवा समदर्शी गृहांत ॥८३॥

मग पुन्हां पुण्याचरण । जीव मिळवी स्वर्गस्थान ॥
किंवा असक्तता धरून । स्थितप्रज्ञ गति मिळवी ॥८४॥

नरकांत पाप भोगून । पुन्हां घडे येथें जनन ॥
स्वर्गनरक ब्रह्मस्थान । नर जन्मांतीं लाभतसे ॥८५॥

कौरवपांडव बांधव । दोघांसही राज्य वैभव ॥
कौरवीं नसे असा भाव । दुष्टकर्मी दुर्योधन ॥८६॥

जो विध्वंसक कार्य करी । त्याचा पृथ्वीस भार होई ॥
त्याचा नाश नियति करी । मागें आतां पुढें तसा ॥८७॥

सात्त्विक राजस तामस । गुणाचा जेथें अतिवास ॥
मध्यरात्र मध्यदिवस । मग उतारा लागतसे ॥८८॥

जेथे अधिक सत्त्वगुण । तेथें उत्तम पोषण ॥
कर्ता एक नारायण । हें जाणून भजा त्यासी ॥८९॥

तीव्र वासना संसारांत । मरतां भूत पिशाच्च प्रेत ॥
समंध सर्पादि योनी प्राप्त । जन्म स्वकुलीं वा आप्तेष्टीं ॥९०॥



जेथें आवड वैर दंश । तेथें सुखवी पीडी नाश ॥
परंतु सर्वाचा परमेश । न्याय निवाडा करीतसे ॥९१॥

जर कोणाचा कांहीं भाग । दडपून घेतलासे भोग ॥
ज्ञानें अज्ञानें कसाही मग । त्याचा झाडा होत राही ॥९२॥

दत्त देवाची करून भक्ति । मिळवावी पापांतून मुक्ति ॥
ज्याचें त्याला अर्पून शांति । करणें मार्ग उत्तम ॥९३॥

अनुकूल अवस्था नसे । दत्तसेवा दृढ विश्वासें ॥
करितां सांगेल दत्त तसें । वागून दुःखमुक्त व्हावें ॥९४॥

दत्त भक्ति  दृढ करावीं । दुसऱ्याची इच्छा नसावी ॥
वासना सरळ धरावी । मग प्रसन्न दत्त त्वरें ॥९५॥

दुष्टात्म्याचें छलन संपे । दुर्भाग्य आपोआप लपे ॥
निरसून मागील पापें । सन्मार्गानें सुख होई ॥९६॥

गृहा दारा धन गोधन । विद्या संतति कीर्ति मिळून ॥
उपद्रव पीडा ग्रह टळून । पूर्णायुष्य लाभे सुखें ॥९७॥

भूत प्रेत पिशाच्च साप । आणि कोणाचा असेल शाप ॥
निरसून सर्व जाई ताप । आईबाप कृपा करिती ॥९८॥

पितृगण कुलदेवता । साधुसंत इष्ट देवता ॥
सर्वांची लाभे कृपासरिता । संसारीं सुख अंतीं गतीं ॥९९॥

हें दत्तांचें आशीर्वचन । पंचविसावा अध्याय पूर्ण ॥
दत्तचरणीं समर्पण । दत्त प्रसन्न भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय २६वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।

अवधूत दत्तचिंतन । करावें सदा मनापासून ॥
संसारीं सर्व सुखभोगून । विरक्ति उत्पन्न होतसे ॥१॥

दत्तसेवा दृढ करावी । मग लागे सोय बरवी ॥
सर्व प्राणिमात्रांत हवी । आपणांसम मनोवृत्ति ॥२॥

सर्वांवर ममता धरून । सर्व क्षेम मनीं चिंतून ॥
शक्यतेप्रमाणें वर्तन । संसारांत करावें ॥३॥

आवडावें स्वावलंबन । त्यामुळें चित्तीं समाधान ॥
कोणी करूं नये छलन । विधायक वृत्ति हवी ॥४॥

विरोध भक्ती इच्छूं नये । सर्वजनां ती कामा नये ॥
सरळ वृत्ति अंगांत ये । मग देव सखा बने ॥५॥

देवाचें स्मरण करून । संसारांत हवें वर्तन ॥
मग निर्मळ होऊन मन । नि:शंक काम चालतें ॥६॥

देवावर निष्ठा परम । इहपर मना आराम ॥
सतत देव मनोरम । वाटून मन उल्हासतें ॥७॥

यदूस सांगती श्रीदत्त । पृथ्वी माझा गुरु असत ॥
तिच्यापासून क्षमा शिकत । सर्वांची दया अंतरीं ॥८॥

नदी वृक्ष लता पर्वत । सदा परोपकार करीत ॥
तसें हवें सत्त्व मनांत । पृथ्वी थोर गुरु असे ॥९॥

स्वमार्गे पृथ्वी करी गमन । तसें करावें स्वयें वर्तन ॥
जाऊं नये मार्ग सोडून । उपदेश पृथ्वी देतसे ॥१०॥

प्राणरक्षणवृत्ति बरवी । इंद्रियआवड न पहावी ॥
ही प्राणवायूची थोरवी । अंतरीं माझ्या वसतसे ॥११॥

बाह्य वायु सर्वत्र शिरे । गंधादिक त्यांत भरे ॥
पण वारा अलिप्त ठरे । तसा निर्लेप फिरतों मी ॥१२॥

सर्व असतें आकाशांत । पण नभ असंग असत ॥
सर्वांतर्यामी आत्मतत्त्व । घेत नि:संग । गुण त्याचा ॥१३॥

जळ निर्मळ स्निग्ध मधुर । पवित्र तसें हवें अंतर ॥
सर्वा पाणी जीवनाधार । गुण घेतला उदकाचा ॥१४॥

अग्नीचें पोट भक्षणपात्र । सर्वभक्षक पण पवित्र ॥
आहुतिभस्मही पवित्र । वस्तुआकार घे अग्नि ॥१५॥

शीत नाशक अग्नि अजित । केव्हां प्रकट केव्हां गुप्त ॥
पापनाशका भजती भक्त । सदा तेजस्वी तो असे ॥१६॥

दीपाशिखा अग्निज्वाळा । नित्य मानणें हा भ्रम सगळा ॥
तसा दाखला या विश्वाला । अग्नि गुरु शिकवी हें ॥१७॥

चंद्र कला कला वाढून । दावीं जन्म वृद्धि तारुण्य ॥
क्षीण होऊन वृद्धत्त्व मरण । अस्तित्वही कळे त्याचें ॥१८॥

देहाचे हे सहा विकार । आत्मा अज अव्यय अमर ॥
हें चंद्र दावी निरंतर । म्हणून त्याला गुरु केला ॥१९॥

किरणांचा पति भास्कर । गोपति करी जल स्वीकार ॥
आणि परत करी नीर । जलीं सूर्य भिजत नसे ॥२०॥

ढग येऊन सूर्यावर । सूर्य दिसे विविधाकार ॥
परंतु असंग निर्विकार । तसा आत्मा सदा असे ॥२१॥

भोग मिळतां नको मोद । नष्टतांही नसावा खेद ॥
सेवीत जावा परमानंद । सूर्यापासून शिकलों मी ॥२२॥

पाहिली कपोत कपोती । परस्पर आसक्त असती ॥
पिलांवरही माया अती । सुखी संसार होतसे ॥२३॥

मातापिता बाहेर जाती । घरट्यांत पिलें असती ॥
अन्नासाठीं वाट पहाती । बाहेर डोकीं काढून ॥२४॥

पारध्यानें जाळें टाकिलें । त्यांत अडकलीं तीं पिलें ॥
घरीं येतां सर्व दिसलें । कपोतीस परम दु:ख ॥२५॥



जाळ्यामध्यें उडी टाकिली । कपोत म्हणे बायको गेली ॥
पिलेंही मला अंतरलीं । जीवन व्यर्थ हें माझें ॥२६॥

भार्या मुलांची फार प्रीती । संसारांत बहु आसक्ति ॥
पत्नी मुलें धडपडती । कपोतचिंता वाढली ॥२७॥

तोही जाळ्यांत उडीं मारी । पारधि आनंदे अंतरीं ॥
कुटुंबाचें पोषण करी । जीवो जीवस्य जीवनम् ॥२८॥

मोक्षमार्गाचें उघडे द्वार । असें लाधलें नरशरीर ॥
परी गृहस्थाश्रमी नर । कुटुंबपाशांत सांपडे ॥२९॥

त्याचा जन्म व्यर्थ होतसे । असें मनांत माझ्या ठसे ॥
कपोत जोडी गुरु होतसे । विरक्ति चित्तांत उदेली ॥३०॥

स्वर्ग किंवा असो नरक । इंद्रियसुखदु:ख दायक ॥
सुखदु:खाची जोडी अेक । दैवें आपोआप मिळे ॥३१॥

इंद्रियसुखाची वासना । टाकून स्वस्थता द्यावी मना ॥
अजगर वृत्ति गहना । रहावें मिळे न मिळे तसें ॥३२॥

मागील कर्मांचें मिळे फळ । तेंच प्रारब्ध सबळ ॥
ईश्वरी माया करी खेळ । प्राण्या सुखदु:ख भोगवी ॥३३॥

परंतु त्याला असे अंत । आत्मानंद सुख शाश्वत ॥
अजगर मला शिकवीत । तसा वागतों यदुराया ॥३४॥

सर्वदा प्रसन्न सागर । अपार अनंत दुस्तर ॥
इंद्रियां अगोचर गंभीर । निर्विकार शांत असे ॥३५॥

नदीजलानें न फुगत । नदीजलाविना न आटत ॥
आपुली सीमा न सोडीत । पुष्ट रोड न होतसे ॥३६॥

समुद्र शिकवी असे गुण । मनांत नित्य नारायण ॥
धैर्यहीन वा नसे मीपण । मोह सोडून प्रसन्न ॥३७॥

दीपज्योति सतेज सुंदर । पाहून पतंग त्यावर ॥
उडी घालितां तो पामर । मरून जातो पाहिलें ॥३८॥



स्त्रीसौंदर्य हावभाव । पाहून कामुक मानव ॥
भुलुन फसतो सदैव । फसूं नये पतंग शिकवी ॥३९॥

करून नाना फुलांचा शोध । मधमाशी जमवी मध ॥
फुलां दुखवूं नये बोध । देई सार सदाघ्यावें ॥४०॥

भविष्यकालार्थ मक्षिका । मध सांठवी प्राण फुका ॥
जाई म्हणून संग्रह टाका । असा विचार उद्धवे ॥४१॥

धनसंग्रह करी कृपण । चोर वगैरे नेती लुटून ॥
प्रसंगीं रक्षितां जाई प्राण । व्यर्थ शीण हा आशेचा ॥४२॥

गृहस्थाचें उत्तम अन्न । अतिथीला मिळे भोजन ॥
भिल्लास मक्षिका जाळून । आयता मध मिळतसे ॥४३॥

योगक्षेम दैवानुसार । चालतो जगीं निरंतर ॥
भिल्ल पाहुणा दैव थोर । असें मना दर्शविती ॥४४॥

लांकडी हत्तीण रानांत । ठेवून गजा मोहवीत ॥
स्त्रीमोहानें हत्ती फसत । स्त्रीसंबंध नको वाटे ॥४५॥

स्त्रीचे अन्य प्रियकर । संधि साधून करिती ठार ॥
असला असार संसार । आसक्ति व्यर्थ मना पटे ॥४६॥

रानांत हरणें बागडत । पारधी गाई ग्राम्य गीत ॥
नादलुब्ध हरिण फसत । मनास मोह नको वाटे ॥४७॥

गळा लागुन मरे मासा । जिभेचा नादी फसे तसा ॥
सर्व इंद्रियांत उत्तमसा । जिव्हाजय खरा हवा ॥४८॥

पिंगला विदेह नगरींत । वेश्या वृत्तीनें संसारांत ॥
सुखी असतां उद्धवत । विवेक बुद्धि भाग्य तिचें ॥४९॥

एके दिवशीं नाहीं रमण । म्हणून बनली उदासीन ॥
नाहीं रति न मिळे धन । व्यर्थ जीवन गेलें म्हणे ॥५०॥

मिळेल त्यांत समाधान । अशी व्हावी वृत्ति उत्पन्न ॥
म्हणून यत्न योगीजन । सुद्धां नित्य करिताती ॥५१॥

संतुष्ट बुद्धि वैराग्य परम । पिंगलामनीं घेई जन्म ॥
चित्तीं आनंद मनोरम । आत्माराम म्हणे माझा ॥५२॥

निराशेचें पर्यवसान । आत्मसुखांत ती तल्लीन ॥
विरक्तबुद्धि दयाघन । भगवान विष्णू देतसे ॥५३॥

आत्मा देतसे सर्वसुख । त्या लोटून घेतलें दुःख ॥
मर्त्य मानव माझें सुख । घेई मीही रमतसें ॥५४॥

हे सर्वही दुःख अपार । आतां पटलें बरोबर ॥
आत्मदेवांत निरंतर । रमेन सौख्यसागरीं ॥५५॥

रमणसुखाला विटली । पिंगला वेश्या महाभली ॥
आशा सदा दुःखमाऊली । संतोषवृत्तिमध्यें सुख ॥५६॥

हीच वृत्ति मना सांवरी । न करी भक्तीनें बावरी ॥
नरजन्माचें सार्थक करी । विष्णुपदीं संतुष्टता ॥५७॥

विश्वांतील विषयभोग । त्यांचा मनापासून त्याग ॥
घडवी नैराश्य यथासांग । वासनाजय मोक्ष देतो ॥५८॥

वृत्ति होतसे सुप्रसन्न । शांति सुख समाधान ॥
आत्मनिष्ठबुद्धि करून । स्थितप्रज्ञता लाभते ॥५९॥

जें जें आपणां अत्यंत प्रिय । त्याचा संग्रह सहज होय ॥
परंतु त्याचे पासून भय । टिटवा मला दाखवी ॥६०॥

टिटव्यापाशीं होतें मांस । इतर जमले तें खाण्यास ॥
टिटव्यास देती फार त्रास । मग टाकुन सुखावला ॥६१॥

बालक रमतें खेळतें । संसाराची चिंता नसते ॥
सदा आनंदी वृत्ति दिसते । मानापमान लोपती ॥६२॥

परमानंदसागरांत । सदा राहातो गुणातीत ॥
चिंता नसते त्या दोघांत । बालबोध मनीं आला ॥६३॥

वडील माणसें घरीं नसतां । एक कुमारी घरीं असतां ॥
पाहुणे मंडळी अजाणतां । वधू पाहण्या पातली ॥६४॥



ती कुमारी होती चतुर । योग्य करी पाहुणचार ॥
साळीभात मग सत्वर । कांडितां माझे लक्ष गेलें ॥६५॥

हातीं होती तिच्या कंकणें । आवाज ऐकतील पाहुणे ॥
म्हणून तीं काढून ठेवणें । राखणें एक एक हातीं ॥६६॥

तिची कृति अवलोकून । जर होऊं नये भांडण ॥
तर एकाकी स्वस्थ होऊन । रहावें पटे मना त्वरें ॥६७॥

प्राणवायु जर स्वाधीन । तर होतसे एकाग्र मन ॥
आत्मनिष्ठ त्या ठेवून । प्रारब्धकर्म क्षीण होतें ॥६८॥

झाल्यावर वासनात्याग । सत्त्वगुण वाढे सवेग ॥
उन्मनी स्थिति यथासांग । परमात्म्यांत अैक्यता ॥६९॥

वृत्ति व्हावया तदाकार । गुरु जाहला बाणकार ॥
स्वकार्यांत तो शरकार । मग्न होऊन बाण करी ॥७०॥

वाजत गाजत जवळून । राजस्वारी गेली निघून ॥
स्वकार्यीं गुंग त्याचें मन । नृपतिस्वारी नेणे तो ॥७१॥

आयत्या बिळांत नागराज । गुप्त जागीं सुखी सहज ॥
तशी असावी वृत्ति निज । सर्पगुण घेतला मी ॥७२॥

तंतू काढून नाभीतून । कोळी जाळे करी उत्पन्न ॥
आणि स्वतःच टाकी गिळून । हें पाहून बोध मिळे ॥७३॥

परमात्मा मूळ स्वरूप । त्यापासून मायासंकल्प ॥
त्रिगुणक्षोभ कालरूप । त्रिगुणी माया प्रकृति ॥७४॥

मायेपासून महत्तत्त्व । त्रिगुणकार्यशक्ति असत ॥
त्रिगुणमय विश्व समस्त । म्हणून सूत्र तें असे ॥७५॥

सूत्रापासून अहंकार । ब्रह्मांडकार्य निरंतर ॥
तरुन जाण्या हें दुस्तर । शुद्धचित्त समर्थ असे ॥७६॥

गुद शिस्न मुख पाय हात । पांच कर्मेंद्रियें असत ॥
त्वचा जीभ कर्ण नाक नेत्र । ज्ञानेंद्रियें आणि मन ॥७७॥



नभ वायु तेज जल भू सिद्ध । शब्द स्पर्श रुप रस गंध ॥
पंचवीस तत्त्वें हीं प्रसिद्ध । जीव साकार ब्रह्मरूप ॥७८॥

ईश्वर जग निर्माण करी । आणि त्याचा संहार करी ॥
त्याचा बोध कळे अंतरीं । कोळी कार्य पाहुनियां ॥७९॥

त्रिगुण कार्य शांत झालें । तेव्हां प्रकृति कार्य संपले ॥
सच्चिदानंद रूप राहिलें । नारायण नारायण ॥८०॥

भिंगुरटी कीटक धरी । तिचें कीटक ध्यान करी ॥
भयानें अेकाग्रता खरी । पावून किडा बने तसा ॥८१॥

स्नेह भय त्रास मत्सर । करवी ध्यान तीव्रतर ॥
या देहींच होतसे नर । ध्यानासम मना पटे ॥८२॥

असें ज्याचें लागलें ध्यान । तेथें प्राणी करी गमन ॥
देहांतर स्थिति गहन । परंतु शंका फिटे माझी ॥८३॥

असे माझे चोवीस गुरु । माझा देहही माझा गुरु ॥
विरक्ति विवेक आचारु । शिकवून मोक्ष देतसे ॥८४॥

जर देहाची प्रीती धरिली । सुखदुःखे येती सगळीं ॥
देह सोडून अंतकाळीं । जातां दुःख होतसे ॥८५॥

मग कसला माझा देह । हा विचार उद्भवे इह ॥
पंचवीस तत्त्वांचा समूह । जाणून वैराग्य बाणतसे ॥८६॥

अन्वय आणि व्यतिरेक । यांच्या साह्यानें आत्मविवेक ॥
करण्यास हे सहाय्यक । गुरु जाहले यदुराया ॥८७॥

वैराग्य उत्पन्न होऊन । बुद्धींत प्रकाशे ब्रह्मज्ञान ॥
सर्व संग त्याग करून । सर्वत्र यदो फिरतों मी ॥८८॥

हें ऐकून यदुशरण । दत्तावधूत सुप्रसन्न ॥
यदु पावला समाधान । मोक्ष मिळवी गुरुकृपें ॥८९॥

यदु जाहला शुद्धचित्त । म्हणून तेथें जाती दत्त ॥
पटवून त्याला आत्मतत्त्व । ब्रह्मरूपीं सामाविती ॥९०॥

त्याच्या वंशांत दयाघन । जगद्गुरु कृष्ण भगवान ॥
अवतरून अभयदान । देती भक्तांस शाश्वत ॥९१॥

स्वप्नांत जें दिसतें सत्य । तें जागृतींत भासे असत्य ॥
या देहाचे व्याप असत । अनित्य स्वप्नाप्रमाणें ॥९२॥

देहाचें सुखदुःख म्हणून । शाश्वत नाहीं हें जाणून ॥
पाहुण्यासम ठेवून मन । हर्ष खेद करूं नये ॥९३॥

दुर्लभ हें नर-शरीर । मानवता ठेवून स्थिर ॥
सरळ मार्गांत निरंतर । देवनिष्ठेनें वापरावें ॥९४॥

उपकारक हवा विचार । तसा मुखांतून उच्चार ॥
परोपकारांत हें शरीर । वागवावें स्वच्छमनें ॥९५॥

जगाचा धनी परमेश्वर । वागवी प्राण्या निरंतर ॥
त्यालाच सांगून अंतर । मनास संतुष्ट ठेवावें ॥९६॥

सर्व भूतहित इच्छावें । शक्य तसें करीत जावें ॥
देवा आळवून भावें । निर्भय-चित्तें वर्तावें ॥९७॥

प्रारब्ध क्रियमाण संचित । ईश्वरार्पण करून चित्त ॥
अचल श्रद्धेनें सतत । दत्तपदीं दृढ ठेवणें ॥९८॥

मग कर्माची गति खुंटत । संतुष्ट मनांत भगवंत ॥
स्थिर राहून सर्व देत । संसारीं सुख अंतीं गति ॥९९॥

त्याला करून प्रणिपात । हा अध्याय झाला समाप्त ॥
सव्विसावा अर्पितां दत्त । भक्तहिता मुदें घेती ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु